सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित




सोलापूर | शनिवार, १७ ऑक्टोबर २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक ३१९ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# तिरंगा मार्चचा प्रयत्न हाणून पाडला

## अभिजित दीपके-नेहा बोराला पोलिसांनी घेतले ताब्यात

**नवी दिल्ली, १६ ऑक्टोबर**

राजधानी दिल्लीच्या कॅनॉट प्लेस परिसरातील सेंट्रल पार्कमध्ये तिरंगा फडकवा आंदोलनात सहभागी होण्याच्या आधीच दिल्ली पोलिसांनी सावधगिरीचा उपाय म्हणून कॉक्रोच पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांना ताब्यात घेतले. या परिसरात तिरंगा मार्च काढण्याचा प्रयत्न पोलिसांनी हाणून पाडला.



कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनामुळे कॅनॉट प्लेस परिसरातील रस्त्यावर झालेली गर्दी आणि खोळंबलेली वाहतूक

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी अभिजित दीपके यांनी शुक्रवारी कॅनॉट प्लेसच्या सेंट्रल पार्कमध्ये तिरंगा फडकवा आंदोलनाचे आवाहन केले होते. कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनाचा आधीचा अनुभव लक्षात घेऊन पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी नाकारत परिसरात भारतीय न्याय संहितेचे १६३ कलम लागू केले.

कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनाच्या पृष्ठभूमीवर एनडीएमसीने सेंट्रल पार्क परिसर प्रशासकीय कारणावरून १६ आणि १७ ऑक्टोबर असा दोन दिवसांसाठी बंद केला होता.

या आंदोलनासाठी दीपके एकटेच हातात तिरंगा घेत कॅनॉट प्लेस परिसराच्या दिशेने निघाले. सायंकाळी पाच वाजता या ठिकाणाहून मार्च निघणार होता. आप आणि अन्य संघटनांनी या तिरंगा मार्चला पाठिंबा दिला होता. त्यामुळे मोठ्या संख्येत तरुण-तरुणी परिसरात दाखल झाले होते. सेंट्रल पार्कमध्ये पोहोचण्यापूर्वीच दिल्ली पोलिसांचे एक पथक दीपके यांच्यापर्यंत पोहोचले आणि प्रतिबंधात्मक आदेशामुळे या परिसरात मार्चला अनुमती नसल्याचे त्यांना सांगितले. मी काय केले, मी एकटा जात आहे, असे दीपके म्हणत होते. पण, मार्च काढण्याच्या भूमिकेवर ठाम असल्यामुळे पोलिसांनी दीपके यांना पोलिस ताब्यात घेतले. यावेळी समर्थकांनी घोषणाबाजी केली. मंडी हाऊस परिसरात आंदोलन करणाऱ्या ऑल इंडिया स्टुडंट असोसिएशनच्या (आयसा) अध्यक्ष नेहा बोरा यांना पालिसांनी ताब्यात घेतले. घोषणाबाजी करत सेंट्रल पार्कच्या दिशेने जाण्याचा नेहा बोरा आणि कार्यकर्त्यांनी प्रयत्न केला होता.

### दीपकेंचा मुक्काम अनिश गावंडेंकडे

शुक्रवारी सकाळी दिल्ली पोलिसांचे एक पथक दीपके यांच्या दिल्लीतील निवासस्थानी दाखल झाले आणि आंदोलन न करण्याबाबतची नोटीस बजावली. प्रतिबंधात्मक आदेश डावलून आंदोलन केल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा या नोटिशीतून देण्यात आला होता. दिल्लीत अभिजित दीपके यांचा मुक्काम राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रवक्ते अनिश गावंडे यांच्या निवासस्थानी आहे.

### व्यापाऱ्यांची निदर्शने

कॅनॉट प्लेस परिसरातील पालिका बाजारमधील व्यापाऱ्यांनी कॉक्रोच पार्टीच्या तिरंगा यात्रेच्या विरोधात निदर्शने केली. हे व्यापारी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या समथनार्थ घोषणाबाजी करत होते. 'मोदी-मोदी'च्या घोषणाही यावेळी ऐकू येत होत्या. व्यापाऱ्यांनी दिल्ली पोलिसांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवला. कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनामुळे अनेक दिवसापासून कॅनॉट प्लेस परिसर बंद आहे. त्यामुळे आमचा व्यवसाय ठप्प झाला, आर्थिक नुकसान होतस्सल्याचा आरोप व्यापाऱ्यांचा आहे. या मुद्यावरून व्यापाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्रही पाठवले आहे. (वृत्तसंस्था)

# सतीश वाघोले एमपीएससीचे अध्यक्ष

## सोपविला अतिरिक्त प्रभार | सौरभ कटियारांकडे सचिवपदाचा प्रभार

**मुंबई, १६ ऑक्टोबर**

अन्न व औषध प्रशासनाच्या औषध निरीक्षक भरती परीक्षेतील पेपरफुटीमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगात (एमपीएससी) राज्य सरकारने मोठे प्रशासकीय फेरबदल केले आहेत. एमपीएससीच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार आयोगाचे विद्यमान सदस्य सतीश वाघोले यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. या संदर्भातील अधिकृत आदेश सामान्य प्रशासन विभागाने जारी केला आहे.

आयोगाच्या सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. पेपरफुटीच्या आरोपांनंतर स्पर्धा परीक्षा परीक्षार्थीनी पुण्यात पुकारलेले तीव्र आंदोलन आणि वाढता रोष लक्षात घेता, विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर गेले आहेत.

एमपीएससीमार्फत आयोजित अन्न व औषध प्रशासनाच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेचा पेपर फुटल्याचे उघडकीस आल्यानंतर राज्यभरातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संतापाची तीव्र लाट पसरली. विद्यार्थ्यांनी आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी करत पुण्यामध्ये सलग १० दिवस आंदोलन केले.

विद्यार्थ्यांच्या या आंदोलनामुळे निर्माण झालेला पेच सोडवण्यासाठी राज्य सरकारतर्फे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी पुण्यातील आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा केली. अखेर विद्यार्थ्यांचा रोष आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत भीमनवार यांनी तपासाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत रजेवर जाण्याचा निर्णय घेतला, त्यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले. वादात सापडलेल्या एमपीएससी सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे देण्यात आला आहे. विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार रजेवर गेल्याने अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य सदस्याकडे सोपविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

## विमान कंपन्यांकडून सौदीची उड्डाणे रद्द

**नवी दिल्ली :** येमेनच्या हुथी बंडखोरांकडून सौदी अरबमध्ये सातत्याने हल्ले केले जात असल्याने भारतीय विमान कंपन्यांनी रियाध, दम्माम आणि जेद्दाहसाठीची विमानसेवा २० ऑक्टोबरपर्यंत रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. सौदीतील नागरी विमानतळे आणि विमान वाहतूक पायाभूत सुविधांवर झालेल्या अलीकडील हल्ल्यांच्या पृष्ठभूमीवर एअर इंडिया, इंडिगो आणि इतर कंपन्यांनी हा निर्णय घेतला. आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेच्या परिषदेने सौदी अरबमधील नागरी विमानतळे, विमाने आणि विमान वाहतूक पायाभूत सुविधांवरील हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला.

# सोलापूर-मुंबई हवाई मार्गाची 'उडान' योजनेत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या सुधारित 'उडान' योजनेअंतर्गत सोलापूर-मुंबई-सोलापूर हवाई मार्गाची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे या हवाई मार्गासाठी सातत्याने केलेल्या



मागणीला यश आले आहे. 'उडान' योजनेअंतर्गत नव्याने सुरु होणाऱ्या विमानसेवांना पुढील पाच वर्षांसाठी अनुदानही मिळणार आहे.या हवाई मार्गामुळे सोलापूर जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी, विद्यार्थी, पर्यटक आणि वैद्यकीय सेवांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. अक्कलकोट, तुळजापूर, पंढरपूर या तीर्थक्षेत्रांच्या पर्यटनाला चालना मिळण्यासोबतच उद्योग, व्यापार, रोजगार आणि जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठीही नव्या संधी निर्माण होऊ शकतात, असे सांगण्यात येते.

# पितळ उघडे पडले; सर्व काही सत्तांतरासाठी

## प्रशांत भूषण यांच्यावर मुख्यमंत्री फडणवीसांचा हल्ला

**मुंबई, १६ ऑक्टोबर**

'इट्स डन ब्रो, एव्हरीथिंग इज एक्स्पोज्ड!! आफ्टरल, इट वॉज ऑल अबाऊट रिजीम चेंज' (आता बस झाले भावा, सगळे पितळ उघडे पडले आहे. हे सर्व काही फक्त सत्तांतरासाठीच सुरू होते). विरोधकांच्या मनात दडलेली हीच गोष्ट अखेर त्यांच्या ओठांवर आली असून, या आंदोलनामागील मूळ हेतू आता संपूर्ण देशासमोर उघड झाला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार घणाघात केला.

देशभरात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार आणि निवडणूक आयोगाविरोधात 'इंडिया' आघाडीने रान उठवले असतानाच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधक आणि त्यांच्या आंदोलनावर अत्यंत बोचऱ्या शब्दांत निशाणा साधला आहे. विरोधकांच्या एका पत्रकार परिषदेनंतर ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांचा एक व्हिडीओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर (ट्विटर) शेअर करीत मुख्यमंत्र्यांनी विरोधकांचे आंदोलन केवळ राजकीय स्वार्थासाठी सुरू असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

विरोधकांच्या पवित्र्यावर ताशे ओढताना मुख्यमंत्री पुढे म्हणाले की हा संपूर्ण बनाव केवळ कोणत्याह मार्गाने सत्ता मिळवण्यासाठीच सुरु आहे. मग त्यासाठी निष्पा विद्यार्थ्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्य भावना भडकवणे असो, जाती-धर्म आणि भाषेच्या नावावर समाजात वि कालवणे असो, किंवा देशातील सर्वोच्च घटनात्मक संस्थांची बदनामी करणे असो; विरोधक कोणत्याह थराला जाऊ शकतात. आंदोलनाच्य आडून केवळ देशात अराजकत आणि अशांती पसरवणे हाच विरोधकांचा मुख्य अजेंडा असल्याच स्पष्ट झाले आहे. (तभा वृत्तसेवा

## विचारपुष्प



ज्या आचरणाने नेहमी सर्वांचे हित साधले जाते, तो 'धर्म' होय. एखादी व्यक्ती जन्माने कुणीही असली तरी, तिच्या आचरणामुळे सर्व समाजबांधवांना आनंद आणि समाधान मिळत असेल, तर तोसुद्धा 'धर्म' मानला जाईल.

**स्व. हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात तेजी

मुंबई : शुक्रवारी सलग दुसऱ्या सत्रात भारतीय शेअर बाजारात तेजीचे वातावरण पाहायला मिळाले. आयटी, मीडिया आणि मेटल क्षेत्रातील समभागांमध्ये झालेल्या खरेदीमुळे बाजाराला मोठा पाठबळ मिळाले. जागतिक बाजारातून कमकुवत संकेत तसेच सुरुवातीच्या सत्रात विक्रीचा दबाव असतानाही, दिवसभरात बाजाराने टप्प्याटप्प्याने पुन्हा पकड मिळवली. निफ्टीने दिवसभरात २३,१४९.८५ या उच्चांकी पातळीला स्पर्श केला आणि अखेर दिवसाच्या उच्चांकाजवळच बंद झाला, ज्यामुळे खरेदीचा कल कायम असल्याचे स्पष्ट झाले. व्यवहाराच्या अखेरीस, सेन्सेक्स ४१३.६६ अंकांनी वाढून ७४,७२९.२७ वर बंद झाला. तर निफ्टी १४८.८० अंकांनी वधारून २३,१४६.१५ या पातळीवर पोहोचला. सलग दुसऱ्या आठवड्यात दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी आपली वाढ कायम ठेवली. या आठवड्यात बीएसई सेन्सेक्समध्ये ३.१ टक्के आणि निफ्टी५० मध्ये २.७ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली.

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**









CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सांगोला लायन्स क्लबकडून अन्नदान

**सांगोला, दि. १६ ऑक्टोबर-**

लायन्स प्रांत ३२३४-ड १ चे प्रांतीय सभापती प्रा.धनाजी चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून क्लबच्या हंगर या उपक्रमांतर्गत मातोश्री वृद्धाश्रम, सांगोला येथे अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी प्रांतपाल प्रा. प्रबुध्दचंद्र झपके, सांगोला विद्यामंदिरचे पर्यवेक्षक काकासो नरूटे, उपविभागीय सभापती उन्मेश आटपाडीकर, सांगोला लायन्स क्लबचे खजिनदार निलेश नागणे, मातोश्री वृद्धाश्रमचे प्रमुख राहुल जाधव उपस्थित होत्या.



### अँटिबायोटिक रेझिस्टन्सविरोधात फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा जनजागृती जागर

**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

औषधांचा विवेकी वापर, सुरक्षित आरोग्यसेवा आणि अँटिबायोटिक रेझिस्टन्सच्या वाढत्या धोक्याबाबत जनजागृती करण्यासाठी डी. एस. टी. एस. मंडळाच्या कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये राष्ट्रीय फार्मसी सप्ताह २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. 'स्वस्थ भारत : Combating Antimicrobial Resistance' ही सप्ताहाची मध्यवर्ती संकल्पना होती. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया आणि नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन यांच्या सहकार्याने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये फार्मा रॅली, पथनाट्य, सायंटिफिक कार्टून, माहितीपत्रक निर्मिती, फार्मा प्रश्नमंजुषा, पोस्टर सादरीकरण आणि सोशल मीडिया रील स्पर्धांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत औषधांच्या योग्य वापराचा संदेश दिला. या स्पर्धांमधील विजेत्यांची ४ नोव्हेंबर रोजी पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धांसाठी निवड झाली आहे. या उपक्रमासाठी डॉ. गणेश गजेली, दीपक भोसले, डॉ. उत्कर्षा शिवशरण, डॉ. योगेश थोरात, मनोज मडकी, मंजूषा बंडी, प्रतीक डांगे, नीलांबरी खानापूरे, अनुप ढंगे, वैष्णवी गजुल आणि मीनल भांजे यांनी परिश्रम घेतले. सप्ताह समन्वयक म्हणून डॉ. वर्षा तेगेळी यांनी काम पाहिले. संस्थेचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे आणि प्राचार्य डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांचे मार्गदर्शन लाभले.



### मंदिर समितीच्या गोशाळेतील पशुखाद्यासाठी एक लाखाची देणगी

**पंढरपूर, दि.१६ ऑक्टोबर-**

बीड येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सीम भक्त रविंद्र रामचंद्र साखरे यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या गोशाळेतील गाई व वासरांच्या पशुखाद्यासाठी एक लाखाची देणगी अर्पण केली. मंदिर समितीच्या 'गोशाळा पशुखाद्य कायम ठेव' या योजनेसाठी सदर देणगी देण्यात आली आहे. या देणगीतून मंदिर समितीच्या गोशाळेतील गाई व वासरांसाठी चारा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीची गोशाळा पंढरपूर नगरपरिषद हद्दीतील यमाई तलाव परिसरात असून, या गोशाळेमध्ये लहान-मोठ्या मिळून २५५ गाई व वासरे आहेत. या देणगीबद्दल मंदिर समितीच्या वतीने देणगीदार यांचा मंदिर समितीचे सदस्य हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर व मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार साखरे यांचे कुटुंबीय उपस्थित होते. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या गोशाळेतील गाई व वासरांच्या संगोपनासाठी तसेच पशुखाद्य व चाऱ्याच्या व्यवस्थेसाठी देणगी देऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी मंदिर समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर समितीच्या वतीने ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतींनी देणगी देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मंदिर समितीने विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून तसेच मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरूनही भाविकांना देणगी देता येते.




### शहा-कोठारी हायस्कूलमध्ये अभिजात मराठी भाषा संवर्धन सप्ताह समारोप

**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूलमध्ये अभिजात मराठी भाषा संवर्धन सप्ताह संपन्न झाला. या सप्ताहामध्ये कविता गायन, शुद्धलेखन, हस्ताक्षर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, कथावाचन घेण्यात आल्या व आज व्याख्यानाने समारोप करण्यात आला. अभिजात मराठी भाषा या विषयावर व्याख्यान देण्यासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून पत्रकार प्राध्यापक विजय साळवे उपस्थित होते. या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रमेश यादवाड उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन एस. एम. बगले तर आभार बी.एस. पाटील मानले.

# महिला सक्षमीकरणात जिल्ह्यात माळीनगर अग्रेसर

## महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीत सहाय्यक कृषी अधिकारी सारिका एकतपुरे अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या महिला सक्षमीकरण अधिनियम २०२६ अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणी आणि वाटप या उपक्रमाद्वारे विभागांमध्ये अकलूज मंडळ विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या सहाय्यक कृषी अधिकारी सारिका एकतपुरे या सोलापूर जिल्ह्यामध्ये नोंदणी आणि वाटपामध्ये अग्रक्रमावर आहेत.

सहाय्यक कृषी अधिकारी एकतपुरे यांनी माळीनगर गावामध्ये १३६५, सवतगव्हाण येथे १५२ आणि बिजवडी गावात १७० अशा १६८७ महिला शेतकऱ्यांची उच्चांक नोंदणी करून त्याच्या प्रमाणपत्राचे वितरण केलेले आहे. यासाठी त्यांनी विविध वस्त्यांवर, ग्रामपंचायतमध्ये, मंदिरांमध्ये गावातील महिला वर्गासाठी जनजागृती करण्यासाठी, कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी, विशेष कॅम्पचे आयोजन केले होते.



एकतपुरे यांनी दिलेल्या माहितीमुळे, महिला शेतकरी प्रमाणपत्राचे भविष्यात होणारे फायदे, सवलती यावर विशेष प्रकाश टाकल्याने महिलांनी शासनाच्या या योजनेस चांगला प्रतिसाद दिला. हा उपक्रम राबवण्यासाठी त्यांना तालुका कृषी अधिकारी अभिजीत रुपनवर, मंडळ कृषी अधिकारी सतीश कचरे, उप कृषी अधिकारी राहुल शेळके यांचे मार्गदर्शन तर क्षीरसागर, सुरज फुले यांचे साह्य लाभले. महिला शेतकरी प्रमाणपत्रामुळे, महिला शेतकरी म्हणून त्यांना अधिकृत ओळख निर्माण होणार असून, त्यामुळे महिलांना कृषी योजनांचा लाभ घेण्यास सुलभता, कृषी कर्ज व विमा सुविधांसाठी मदत आणि स्वतःच्या नावावर जमीन नसली तरी उज्वल भविष्यासाठी कृषी क्षेत्रामध्ये उद्योग उभारणीस चांगल्या संधी उपलब्ध होणार आहेत. हा उपक्रम १५ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रीय शेतकरी महिला दिवसाचे औचित्य साधून कृषी विभागाद्वारे साजरा करण्यात आला. या उपक्रमामध्ये शेतकरी महिलांची पोर्टलमध्ये सर्वप्रथम नोंदणी करण्यात आली, ग्रामसभेमध्ये महिलांच्या नोंदणीची मंजुरी घेण्यात आली, यानंतर प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. माळीनगर गावात उच्चांक नोंदणी करण्यासाठी महिला सरपंच अनुपमा एकतपुरे, भक्ती जोशी, अनिता गिरमे, निवेदिता कदम यांचे सहकार्य लाभले.




### चंदेले शैक्षणिक संकुलात मुलींच्या एचपीव्ही लसीकरणाबाबत जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ ऑक्टोबर-**

गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षणासाठी एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी जुन्या विडी घरकुल परिसरातील चंदेले शैक्षणिक संकुलात गुरुवारी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. बालाजी अमाइन्सच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत वाडिया हॉस्पिटल आणि उद्योगवर्धिनी यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

भाई छन्नुसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालय, राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक शाळा आणि देशभक्त भाई छन्नुसिंह चंदेले माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात डॉ. अभिजित जिरगे यांनी एचपीव्ही लसीकरणाची माहिती दिली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष हेमूजी चंदेले, अनिल विपत, प्रसाद सांजेकर, अमोल गुंड, प्राचार्य एस. बी. गायकवाड, महादेव तोळणुरे, राहुल चंदेले, अमृतदत्त चिन्नी उपस्थित होते. ह्युमन पॅपिलोमाव्हायरस या विषाणूमुळे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग आणि इतर आजारांचा धोका संभवतो. लसीकरणामुळे या संसर्गापासून संरक्षण मिळण्यास मदत होते. नऊ ते चौदा वयोगटातील मुलींसाठी हे लसीकरण महत्त्वाचे असून, पालकांची संमती आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बालाजी अमाइन्सच्या वतीने वाडिया हॉस्पिटलमध्ये ही लस मोफत उपलब्ध करून दिली जाते.चंदाराणी गुंड यांनी स्वागत व सूत्रसंचालन केले.

### चैतन्य देवढे माऊली यांच्या सुरेल स्वरांनी चैतन्य निर्माण



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ ऑक्टोबर-**

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने आयोजित श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवात प्रसिद्ध गायक रोहित पुजारी आणि सारेगमप विजेते ख्यातनाम गायक चैतन्य देवढे माऊली यांच्या सुरेल गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले.

नवरात्री संगीत महोत्सवात मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. पहिल्या सत्रात रोहित पुजारी यांनी 'आता कोठे धावे मना', 'भाग्यदा लक्ष्मी बारम्मा', 'दत्तगुरू माऊली' आणि 'माझे माहेर पंढरी' यांसारख्या रचना सादर करून भक्तिरसाची अनुभूती दिली. दुसऱ्या सत्रात चैतन्य देवढे माऊली यांनी 'जय जय राम कृष्ण हरी' या नामघोषाने सुरुवात करत 'सूर निरागस हो', 'कानडा राजा पंढरीचा', 'अबीर गुलाल उधळीत रंग' आणि 'अवघे गरजे पंढरपूर' यांसारख्या लोकप्रिय अभंगांनी रसिकांच्या हृदयात चैतन्य निर्माण केले. त्यांना ज्ञानेश्वर दुधाणे, मयूर मोरे, सारंग भोळे, संकेत देहाडे, माऊली पिसे आणि वैभव केंगार यांनी सुरेल वाद्यसंगत केली. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ज्ञानेश्वर दुधाणे यांनी केले. आगामी तीन दिवसांत महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक-गायिकांचे कार्यक्रम होणार असून, रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संगीत महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



### 'सह्याद्री' मध्ये आरोग्यविषयक जनजागृती कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १६ ऑक्टोबर-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथे स्टे फाईन मल्टिव्हेंचर पीव्हीटी एलटीडी, मुंबई या संस्थेमार्फत महिलांच्या आरोग्यविषयक जनजागृतीसाठी, कॅन्सरमुक्त महिला, प्लास्टिक मुक्त महिला या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

त्यास विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा अनिता दिलीपकुमार इंगवले यांनी दिली.

प्रमुख वक्त्या व स्टे फाईन मल्टिव्हेंचर कल्याण, मुंबईच्या ब्रॉन्झ डायरेक्टर स्वाती महानूर यांनी महिलांमधील वाढती कॅन्सरची समस्या, त्यामागील कारणे व उपाययोजना याबद्दल माहिती दिली. महिलांनी, विद्यार्थिनींनी मासिकपाळीमध्ये प्लास्टिक नॅपकिनचा वापर टाळावा. त्याऐवजी कॉटनयुक्त, केमिकल मुक्त ओनियन सॅनिटरी नॅपकिन वापरावे. तसेच त्यांनी बाजारातील उपलब्ध असलेले सामान्य दर्जाचे नॅपकिन व केमिकल मुक्त ओनियन सॅनिटरी नॅपकिन यातील फरक प्रात्यक्षिकासहित सादर करून माहिती दिली.

मासिक पाळीमध्ये महिलांना होणार त्रास व त्याचा शरीरावर होणारे दुष्परिणाम व संसर्गजन्य आजार याबद्दल जागरूकता असावी असे मत त्यांनी व्यक्त केले.सूत्रसंचलन व आभार डॉ. एम.आय.मुजावर यांनी मानले.

### आदर्श शिक्षक गौरव पुरस्कारासाठी शाफियाकौसर शेख यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

अनुदान सेवा सोसायटीच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार २०२६ साठी शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल शाफिया कौसर शौकत अली शेख यांची निवड करण्यात आली आहे.



या पुरस्काराचे वितरण रविवार, १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता शिवस्मारक ऑडिटोरियम (ए.सी.), गोल्डफिंच पेठ येथे होणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजक म्हणून डॉ. ए. ए. विजापूरकर आणि डॉ. व्ही. एस. जमादार कार्यरत आहेत.

## 'स्वेरी'मध्ये राष्ट्रीय औषधनिर्माण सप्ताह साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ ऑक्टोबर-**

येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित फार्मसी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय औषधनिर्माण सप्ताह-२०२६ चे औचित्य साधून 'स्वस्थ भारत: प्रतिजैविक प्रतिरोधावर मात (अँटीमायक्रोबियल रेजिस्टन्स)' या राष्ट्रीय महत्त्वाच्या संकल्पनेवर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.




या सप्ताहात १७ विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. सप्ताहात रांगोळी स्पर्धा, मार्गिका सजावट स्पर्धा, लघुचित्रमालिका निर्मिती स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, वस्तुसंग्रहालय तयारी, दोरीउड्या स्पर्धा, रस्सीखेच स्पर्धा, १०० मीटर धावण्याची शर्यत, ४ बाय १०० मीटर रिले शर्यत, प्रश्नमंजुषा, भित्तीपत्रक सादरीकरण आणि खजिना शोध अशा एकूण १७ स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. प्रश्नमंजुषा, भित्तीपत्रक सादरीकरण, वादविवाद आणि वस्तुसंग्रहालय तयारी या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडून संशोधन, सादरीकरण आणि तर्कशुद्ध विचार करण्याचे कौशल्य विकसित झाले. संस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.




### हिंगुलांबिका शाळेत रोटरीतर्फे नेशन बिल्डिंग अवॉर्ड प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

हिंगुलांबिका शाळेत रोटरी क्लब ऑफ युजतर्फे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाच्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी नेशन बिल्डिंग अवॉर्ड २०२६ या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. नेशन बिल्डिंग अवॉर्ड २०२६ या पुरस्कारासाठी शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल हिंगुलांबिका प्राथमिक शाळेच्या शिक्षिका बीना बुगले, लिटिल फ्लॉवर शाळेचे शिक्षक अंबादास अशोक जाधव, डी.बी.एफ. दयानंद महाविद्यालयाचे प्राध्यापक अमोल काळे यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रोटरी आदिशक्तीच्या जिल्हा अध्यक्षा रोटेरियन पारुल जयेश पटेल यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुण्या पारुल जयेश पटेल यांचा सत्कार हिंगुलांबिका देवी देवालयाचे ट्रस्टी श्रीकांत अंबुरे, विजय पुकाळे, शशिकांत रंगदळ यांच्या हस्ते करण्यात आला. रोटरी क्लबचे पदाधिकारी रोटेरियन वंदना कोपकर, संजू मेंथे, अजय डोईजोडे, डॉ. ज्योती चिडगुपकर, सत्यम दुधनकर आणि हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांची उपस्थिती लाभली. रोटेरियन रोटरी क्लब ऑफ सोलापुर युजचे अध्यक्ष किरणकुमार मुसळे आणि सचिव रोटेरियन हिंदुराव गौरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.



### जळीतग्रस्त कोळी कुटुंबाला महादेव कोगनुरे यांचा मदतीचा हात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

बंकलगी येथील बसवराज गोविंद कोळी यांच्या घराला गॅस सिलिंडरच्या स्फोटामुळे आग लागून संपूर्ण घर जळून खाक झाले. या दुर्घटनेमुळे कोळी कुटुंबावर मोठे संकट ओढवले. या घटनेची माहिती मिळताच एम. के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सागर सिमेंटचे महाराष्ट्र हेड महादेव कोगनुरे यांनी तातडीने दखल घेत संबंधित कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला. एम. के. फाउंडेशनचे बंकलगी येथील काही सहकाऱ्यांनी दूरध्वनीद्वारे या घटनेची माहिती महादेव कोगनुरे यांना दिली. यावेळी बंकलगी येथील रेवणसिध्द कोणदे, राजशेखर सगरे, काशप्पा गुरुजी, मंत्रीशे गुरुजी, भाग्यांण्णा दुषवंत, चंदू कोणदे, नागनाथ कोणदे उपस्थित होते.



### वाचन प्रेरणा दिनानिमित्त लोकसेवा विद्यालयाला १८० पुस्तकांची भेट

**सेवानिवृत्त प्राचार्य अशोक सावळे यांचा उपक्रम**

**बार्शी, दि. १६ ऑक्टोबर-**

भारताचे माजी राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून सेवानिवृत्त प्राचार्य अशोक सावळे यांनी लोकसेवा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आगळगाव या विद्यालयाला विविध विषयांवरील १८० पुस्तकांची भेट दिली. या पुस्तकांमध्ये कथा, कादंबऱ्या, थोर व्यक्तींची चरित्रे, आत्मचरित्रे आणि प्रेरणादायी गोष्टींचा समावेश आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यालयाच्या ग्रंथालयातील पुस्तकसंपदेत भर पडली आहे. मोबाईलच्या वाढत्या वापराच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी हा उपक्रम विशेष महत्त्वाचा आहे.वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने पुस्तकाचे प्रदर्शन शाळेत भरविण्यात आले होते. यावेळी प्रशालेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व पुस्तके हाताळली आणि पुस्तक वाचण्याचा निर्धार केला.




### 'लोकमंगल' मध्ये वाचन प्रेरणा दिन

**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृतींना उजाळा देत वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात आधुनिक भारताचे शिल्पकार आणि महान वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. प्रास्ताविक राजनंदिनी कात्रे यांनी केले. यावेळी सानिका केमदरणे, गायत्री कांबळे आणि सायली घाडगे या विद्यार्थिनींनी ओघवत्या वाणीत आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या मनोगतानंतर प्रा. किरण माळी यांनी डॉ ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रावर मनोगताद्वारे प्रकाश टाकला. प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन हजारे शामल आणि हत्तली अक्षता यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन डॉ. अक्षय शिंदे आणि प्रा. संकेत बिराजदार यांनी यशस्वीरीत्या पार पाडले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### पंतप्रधान मोदींचा द्विदिवसीय कॅनडा दौरा

**ओटावा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी ११ आणि १२ डिसेंबर रोजी कॅनडाला भेट देणार आहेत, अशी माहिती ओटावा येथील भारतीय उच्चायुक्तालयाने दिली आहे. गुरुवारी सकाळी कॅलगरीमधील एका स्थानिक रेस्टॉरंटमध्ये उपस्थितांशी संवाद साधताना कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनीही या भेटीच्या तारखेला दुजोरा दिला. त्यांची नुकतीच मोदींशी चर्चा झाली असून, ही भेट टोरंटो आणि ओटावा येथे होणार आहे, असे कार्नी यांनी सांगितले. आम्ही या भेटीची व्याप्ती वाढवता येईल का, ते पाहू, असे ते म्हणाले. मोदी ११-१२ डिसेंबर रोजी कॅनडाचा दौरा करतील. पंतप्रधान मार्क कार्नी यांच्याशी झालेल्या अलिकडील संभाषणात, दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांमधील सकारात्मक गती कायम राखण्यावर आणि व्यापार, ऊर्जा, तंत्रज्ञान, सुरक्षा तसेच दोन्ही देशांतील नागरिकांमधील संबंधांच्या क्षेत्रात ठोस परिणाम साध्य करण्याच्या दिशेने काम करण्यावर सहमती दर्शवली आहे, असे गुरुवारी समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये भारतीय उच्चायुक्तालयाने स्पष्ट केले. कॅनडाच्या पंतप्रधानांशी त्यांची सौहार्दपूर्ण आणि फलदायी चर्चा झाली असून, दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांमधील सकारात्मक गती अधिक दृढ करण्यावर सहमती दर्शवली आहे, असे मंगळवारी मोदींनी सांगितले.

### कर्जबाजारी पाकिस्तानकडे आयएमएफचे अध्यक्षपद

**इस्लामाबाद :** पाकिस्तानची २०२७ साठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक समूहाच्या 'बोर्ड ऑफ गव्हर्नन्स'चे अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. १९५३ नंतर प्रथमच पाकिस्तानकडे ही जबाबदारी आली आहे, अशी माहिती पाकिस्तानच्या आर्थिक व्यवहार मंत्रालयाने शुक्रवारी दिली. बँकॉक येथे सुरू असलेल्या जागतिक बँक समूह आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या २०२६ च्या वार्षिक बैठकीदरम्यान, पाकिस्तानचे आर्थिक व्यवहार मंत्री आणि जागतिक बँकेतील पाकिस्तानचे गव्हर्नर, अहद खान चीमा यांची आगामी अध्यक्ष म्हणून अधिकृत घोषणा करण्यात आली.

### एफबीआयकडून 'मोस्ट वॉन्टेड'चे प्रत्यार्पण

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या सरकारी योजनांमध्ये अनियमितता केल्याचा आरोप असलेल्या 'मोस्ट वॉन्टेड' आरोपीला भारताने अमेरिकेच्या ताब्यात दिले आहे, असे न्याय विभागाने म्हटले आहे. मनजीत सिंग बेदी याला मागील महिन्यात भारतात अटक करण्यात आली होती आणि बुधवारी रात्री त्याला अमेरिकेत परत आणण्यात आले, असे अमेरिकेचे कार्यवाह अॅटर्नी चार्ल्स नील फ्लॉइड यांनी सांगितले. बेदीला शुक्रवारी वॉशिंग्टन स्टेटच्या वेस्टर्न डिस्ट्रिक्ट कोर्टात हजर करण्यात येईल. मनजीत सिंग बेदीची अटक आणि त्याला परत आणणे, ही एफबीआयच्या 'मोस्ट वॉन्टेड फ्रॉडस्टर्स' या ऐतिहासिक कार्यक्रमातील आणखी एक महत्त्वाची घटना आहे, असे एफबीआय संचालक काश पटेल म्हणाले. एफबीआय सिएटल तसेच अमेरिका आणि भारतातील आमच्या उत्कृष्ट कायदा अंमलबजावणी भागीदारांचे आभार, ज्यांनी बेदीला परत आणण्यासाठी मदत केली, असे ते म्हणाले.

### शाळेची इमारत कोसळली; एफआयआर दाखल

**पेशावर :** पाकिस्तानच्या वायव्य प्रांतातील खैबर पख्तूनख्वा येथे एका खाजगी शाळेचे छत कोसळल्याने ३४ मुले आणि एका शिक्षकाचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी पोलिसांनी शुक्रवारी शाळेचे मालक, भागधारक आणि कंत्राटदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, प्रशासनाने या घटनेची चौकशी सुरू केली आहे. गुरुवारी घडलेल्या या घटनेत ३५ जणांचा मृत्यू झाला, तर ५२ जण जखमी झाले. या प्रकरणी पेशावरच्या आगा मीर जानी शाह पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. एफआयआरनुसार, ही शाळा वाहीद आणि जावेद यांच्या मालकीच्या १६ मरला जमिनीवर बांधण्यात आली होती. बांधकाम सुरू होण्यापूर्वी, २०२४ मध्ये ही जमीन भाड्याने घेण्यात आली होती. ■

# बांगलादेशसारखी परिस्थिती निर्माण करण्याचा कट

**राजनाथसिंह यांचा काँग्रेसवर आरोप**

## घटनात्मक संस्थांना कमकुवत करून अराजकता पसरविण्याचे प्रयत्न

**लखनौ, १६ ऑक्टोबर**

राजकीय स्वार्थासाठी देशातील तरुणांचा वापर करून बांगलादेशसारखी परिस्थिती निर्माण करण्याचे कारस्थान काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील पक्षांनी रचले आहे. विरोधकांचा छुपा आणि विघातक अजेंडा आता स्पष्टपणे देशासमोर आला आहे. तरुणांना भडकवणे, घटनात्मक संस्थांना जाणीवपूर्वक कमकुवत करणे आणि देशात अराजकता पसरवणे हाच विरोधकांचा उद्देश असल्याची टीका संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी शुक्रवारी येथे पत्रपरिषदेत केली.



एका पत्रपरिषदेत नेहा बोराने उघडपणे बांगलादेशचा आदर्श समोर ठेवण्याचे विधान केले होते. याचा समाचार घेत राजनाथसिंह यांनी म्हटले की, विरोधकांचा छुपा आणि विघातक अजेंडा देशासमोर आला आहे. बांगलादेशच्या धर्तीवर त्यांना अराजकता पसरवून देशात सत्तांतर करायचे आहे. गेल्या काही दिवसांपासून राजधानी दिल्लीत जे काही घडत आहे त्यामागे काँग्रेस आणि त्यांचे मित्रपक्ष थेट सहभागी आहेत. तरुणांचा वापर राष्ट्रनिर्माणाकडे वळवण्याऐवजी राजकीय संघर्ष आणि अराजकता निर्माण करण्यासाठी केला जात आहे. त्यांचा एकमेव अजेंडा लोकशाही संस्था उद्ध्वस्त करणे आणि देशाला आगीच्या ज्वाळांत लोटणे हाच आहे. सत्तापालट यासारख्या शब्दांचा वापर हेच दर्शवत आहे की, त्यांचा संघर्ष निवडणुकीच्या सुधारणांबाबत किंवा एसआयआरबाबत किंवा ज्ञानेश कुमारांच्या विरोधात नाही. त्यांची लढाई देशात अराजकता निर्माण करून सत्ता हस्तगत करण्यासाठी आहे.

### आंदोलनाचे खरे स्वरूप उघड : नितीन नवीन



राष्ट्रीय हित, व्यवस्था सुधारणा आणि विद्यार्थ्यांच्या हिताच्या नावाखाली सुरू झालेल्या या आंदोलनाचे खरे स्वरूप जनतेसमोर आल्याची टीका भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी केली. सत्तापालटची उघड चर्चा आणि बांगलादेशातून प्रेरणा घेणे, हे स्पष्टपणे दर्शवते की विद्यार्थ्यांच्या नावाखाली अराजकता पसरवण्याचा आणि राजकीय व्यवस्था अस्थिर करण्याचा हेतुपुरस्सर कट आहे. जे परकीय शक्तींच्या मदतीने सत्तेवर येण्याचे स्वप्न पाहतात, त्यांनी हे समजून घेतले पाहिजे की भारतातील सत्तांतर केवळ लोकशाही प्रक्रियेद्वारेच ठरवले जाते. देशातील जनता त्यांचा डाव कदापि यशस्वी होऊ देणार नाही. ■

**राहुल गांधींकडून जनादेशाचा अनादर**

राहुल गांधी यांच्याकडून वारंवार जनतेच्या जनादेशाचा अनादर केला जात आहे. विघातक राजकारणात गुंतण्याऐवजी त्यांनी आपल्या राजकीय भूमिकेचे आत्मपरीक्षण करायला हवे. १९७५ मध्ये इंदिरा गांधींनी लोकशाही कैद केली होती. आज राहुल गांधी संविधान खिशात ठेवून अराजकता पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. १९९३ मध्ये काँग्रेस सरकारने निवडणूक आयोगात अचानक बदल केले. रातोरात दोन नवीन निवडणूक आयुक्तांची नियुक्ती केली. उत्तरप्रदेशात काँग्रेस ३७ वर्षांपासून सत्तेबाहेर आहे. ◂ (वृत्तसंस्था)



बंगळुरूमधील भीमनाकुप्पे-रामोहल्ली परिसरातील डोड्डा अलादमारा रोड येथे शुक्रवारी 'आसाम भवन'चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आसामी वेशभूषा परिधान केलेले सहभागी कलाकार हातात पारंपरिक 'जापी' (टोपी) घेऊन बिहू नृत्य सादर करताना.

# आम्ही स्पर्धेला घाबरत नाही

**रिलायन्सचे एलन मस्कला रोखठोक उत्तर**

**मुंबई, १६ ऑक्टोबर**

भारतात सॅटेलाईट इंटरनेट सेवा (उपग्रह इंटरनेट) सुरू करण्यावरून अब्जाधीश एलन मस्क यांच्या बाळबोध आरोपांना रिलायन्स इंडस्ट्रीजने चोख उत्तर दिले आहे. एलन मस्क यांनी भारतातील स्टारलिंकच्या विलंबाचे खापर रिलायन्सचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्यावर फोडत समाज माध्यमावर चिथावणीखोर विधाने केली होती. या उतावीळ आणि नैराश्यपूर्ण विधानांवर अखेर रिलायन्सने मौन सोडत, 'आम्ही कोणत्याही स्पर्धेला घाबरत नाही' अशा शब्दांत मस्क यांना उघड आव्हान दिले आहे.

रिलायन्सने 'एक्स'वर स्पष्टपणे म्हटले की, बाजारातील खरी स्पर्धा ही सेवेच्या गुणवत्तेवरून ठरते, कोणाच्या सनसनाटी आरोपांवरून नाही. मस्क यांनी सत्तेचा गैरवापर केल्याचा खोटा दावा करत भारताच्या लोकशाही आणि व्यवसाय संस्कृतीचा अवमान करण्याचा प्रयत्न केला होता. ◂ (तभा वृत्तसेवा)

# संजय राऊत, वागळेंना अवमानना नोटीस

## वादग्रस्त टिप्पणीवर सरन्यायाधीशांची नाराजी

**नवी दिल्ली, १६ ऑक्टोबर**

सरन्यायाधीशांसंदर्भात वादग्रस्त विधानांप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने उबाठा नेते संजय राऊत आणि ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांना शुक्रवारी फौजदारी अवमाननेची नोटीस बजावली. न्यायव्यवस्थेवर टीका करणे सध्या 'फॅशन' बनली अशा शब्दांत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी नाराजी व्यक्त केली.

फौजदारी अवमाननेची कारवाई का केली जाऊ नये, असे स्पष्ट करीत वागळे आणि राऊत यांना न्यायासनाने थेट कारणे दाखवा नोटीस बजावली. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्य बागची यांच्या न्यायासनाने सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी केली. लोक नेहमी न्यायव्यवस्थेवर जाहीरपणे टीका करतात, घटनात्मक संस्थांना बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. पण, स्वतःच्या वैयक्तिक मूलभूत हक्कांचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा न्यायालयाचेच दरवाजे ठोठावतात, असा संताप सरन्यायाधीशांनी व्यक्त केला. ◂ (वृत्तसंस्था)

### दोघांचीही जाहीर माफी

सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनने न्यायालयात धाव घेतल्यावर निखिल वागळे यांनी 'एक्स'नप सरन्यायाधीशांची बिनशर्त माफी मागितली. ती माझी भावनिक प्रतिक्रिया होती, मी ती पोस्ट डिलीट केली असे वागळे त्यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे संजय राऊत यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत वक्तव्याबद्दल खेद व्यक्त करत म्हटले की, माझ्या विधानामुळे सर्वोच्च न्यायालयाचा अवमान झाला असेल तर, मी दिलगिरी व्यक्त करतो. ■

# सगळेच पत्रकार बनले तर अधिकार, ओळखीवर प्रश्नचिन्ह

**सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण** | **बदनामीकारक वृत्ताची दखल** | **अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराची तपासणी करणार**

**नवी दिल्ली, १६ ऑक्टोबर**

अनेक जण पत्रकार असल्याचा दावा करत आंदोलनस्थळी वृत्तांकनासाठी येतात. परंतु जेव्हा स्वतंत्र पत्रकार, डिजिटल कन्टेंट बनवणारे आणि मान्यताप्राप्त माध्यम संस्थेचे वार्ताहर कुठल्याही आंदोलनस्थळी रिपोर्टिंग करायला जातात, तेव्हा त्यांचे अधिकार आणि ओळखीवर प्रश्नचिन्ह उभे राहते. यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकाला पत्रकार बनण्याचा अधिकार देते की नाही, हे सविस्तरपणे तपासणे आवश्यक असल्याचे निरीक्षण शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.

जंतर मंतरवर झालेल्या कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनाचे व्हिडीओ आणि मजकूर समाज माध्यमावरून प्रसारित करण्यात आला. यातील काही व्हिडीओ आणि मजकूर न्यायालय, सरकारची बदनामी करणारे होत. यावर आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्य बागची यांच्या न्यायासनाने सुनावणी घेतली.



पत्रकारितेच्या नावावर विशेष सुरक्षा देण्याच्या नियमांचा विस्ताराने विचार करायला हवा, असे मत न्यायासनाने व्यक्त केले. केंद्र सरकारची बाजू मांडताना महान्यायाभिकर्ता तुषार मेहता म्हणाले, डिजिटल युगात मोबाईल असणारा कुणीही व्यक्ती स्वतःला स्वतंत्र पत्रकार म्हणवतो. काही लोक पत्रकारिता करण्याऐवजी समाज माध्यमांवर लोकप्रियता आणि कमाई करण्यासाठी घटनांना एकतर्फी आणि खळबळजनक प्रकारे प्रसिद्ध करतात. मुख्य मुद्दा वास्तविक पत्रकारिता, व्यक्तिगत विचार आणि मनोरंजनासाठी बनवलेले व्हिडीओ यातील फरक कसा ओळखावा हा आहे. मात्र, केवळ समाज माध्यमांवर व्हिडीओ प्रसारित केल्याने पत्रकारांना आपोआप विशेष मान्यता किंवा अतिरिक्त संरक्षण मिळत नाही.

**पोलिसांसाठी राष्ट्रीय शिष्टाचार असावा**

याचिकाकर्त्या ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी युक्तिवादात सांगितले की, पोलिस आंदोलनांचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांच्या कामात अडथळा आणतात. पोलिसांसाठी एक राष्ट्रीय शिष्टाचार असावा, जेणेकरून ते संस्थेचे ओळखपत्र असलेल्या कोणत्याही पत्रकाराच्या व्यावसायिक कामात अडथळा आणणार नाहीत. त्यावर जर प्रत्येक जण पत्रकार झाला, तर इतरांसाठी अडचणी निर्माण होऊ शकतात, असे सरन्यायाधीशांनी म्हटले. ◂ (वृत्तसंस्था)

### पत्रकारांची ओळख करणे गरजेचे

अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकाला पत्रकार बनण्याचा अधिकार देते की नाही, हे सविस्तरपणे तपासणे आवश्यक आहे, असे न्या. जॉयमाल्या बागची यांनी सांगितले. यावर याचिकाकर्त्यांच्या वकिलाने मान्यताप्राप्त पत्रकार, माध्यम संस्थांमध्ये काम करणारे, स्वतंत्र पत्रकार आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स यांच्यातील फरकाचा मुद्दा उपस्थित केला. यावर न्यायासन म्हणाले, पत्रकारांची ओळख करणे हा मुख्य मुद्दा असून, याची तपासणी आणि अधिकारांची निश्चितता आवश्यक आहे. केंद्र सरकार आणि याचिकाकर्त्यांनी पुढील सुनावणीवेळी अभ्यास करून यासंदर्भात भूमिका स्पष्ट करावी, असे निर्देश न्यायासनाने दिले. ■

# सरकारी ऑनलाईन सेवा चार दिवस बंद

**मुंबई, १६ ऑक्टोबर**

राज्य शासनाच्या विविध विभागांच्या ऑनलाइन सेवांना शुक्रवारपासून तात्पुरता ब्रेक लागला आहे. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित मार्फत विकसित आणि देखभाल करण्यात येणाऱ्या शासकीय संकेतस्थळे, पोर्टल्स, ॲप्लिकेशन्स तसेच नागरिक आणि व्हीएलई सेवा १६ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजल्यापासून तात्पुरत्या स्वरूपा बंद ठेवले. डेटा सेंटर स्थलांतर आणि प्रणाली अद्ययावतीकरणाच्या कामामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

डिजिटल सेवांची कार्यक्षमता वाढविणे, तांत्रिक पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे आणि ऑनलाईन सेवा सुरक्षित व विश्वासार्ह बनविणे, हा या प्रक्रियेचा मुख्य उद्देश आहे. या कामाच्या कालावधीत संबंधित सर्व सेवा पूर्णपणे अनुपलब्ध राहणार असल्याने नागरिकांसह ऑनलाईन सेवा वापरणाऱ्यांना गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. ◂ (तभा वृत्तसेवा)

# तुळजाभवानी मातेची सहाव्या माळेला मुरली अलंकार महापूजा

## दिव्य स्वरूपाच्या दर्शनाने भाविक मंत्रमुग्ध; रात्री राजहंस वाहनावरून छबिना मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**तुळजापूर, दि. १६ ऑक्टोबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सवात शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी सहाव्या माळेनिमित्त देवीची मुरली अलंकार महापूजा विधिवत मांडण्यात आली. देवीच्या या मनमोहक स्वरूपाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मंदिरात उपस्थिती लावली. विविध धार्मिक विधी आणि अलंकार महापूजांमुळे तुळजापूर नगरीत भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

शारदीय नवरात्रोत्सवातील प्रत्येक माळेला धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. सहाव्या माळेनिमित्त मांडण्यात आलेल्या मुरली अलंकार महापूजेतून देवीच्या दिव्य स्वरूपाचे दर्शन घडविण्यात आले. देवीच्या या रूपातून संकटाच्या काळातही धैर्य, सकारात्मकता आणि आशावाद टिकवून ठेवण्याचा संदेश मिळतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

धार्मिक आख्यायिकेनुसार, महिषासुराशी युद्ध सुरू असताना देवीने मुरलीधर स्वरूप धारण करून मुरलीवादनाच्या माध्यमातून भयभीत देव-देवता आणि ऋषीमुनींना धीर दिला. त्यांच्या मनात आनंद, उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण केला, अशी मान्यता आहे. शक्ती आणि भक्तीचा संगम असलेल्या या महापूजेमुळे नवरात्रोत्सवातील धार्मिक वातावरण अधिक भक्तिमय झाले.

यावेळी तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, महंत तुकोजीबुवा, महंत वाकोजीबुवा, पुजारी, सेवेकरी आणि भाविक उपस्थित होते. नवरात्रोत्सवातील विविध अलंकार म हापूजा, धार्मिक विधी आणि वाहनांवरील छबिना मिरवणुकांमधून तुळजापूरच्या समृद्ध धार्मिक परंपरेचे दर्शन घडत आहे. सहाव्या माळेच्या मुरली अलंकार महापूजेने भाविकांच्या श्रद्धेला आणि भक्तिभावाला नवी अनुभूती दिली.

### छबिना मिरवणूकीमुळे भक्तीमय वातावरण

दरम्यान, गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी रात्री श्री तुळजाभवानी मातेची छबिना मिरवणूक राजहंस वाहनावरून काढण्यात आली. नवरात्र महोत्सवातील पारंपरिक धार्मिक विधीनुसार ही मिरवणूक पार पडली. यावेळी मंदिरातील पुजारी, सेवेकरी आणि भाविक उपस्थित होते. देवीच्या छबिना मिरवणुकीमुळे मंदिर परिसरातील भक्तिमय वातावरणात आणखी भर पडली.




# चला ताडोबाला !.. आयआरसीटीसीचे विशेष 'वनदर्शन' पर्यटन पॅकेज

## महाराष्ट्रातील पाच वन्यजीव पर्यटन सहलींची घोषणा ● १९ नोव्हेंबरपासून प्रारंभ ● रेल्वे प्रवासासह जंगल सफारीची संधी

**मुंबई, १६ ऑक्टोबर**

वाघांच्या दर्शनासाठी प्रसिद्ध असलेल्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या जंगल सफारीचा आनंद आता नियोजनबद्ध रेल्वे पर्यटनातून घेता येणार आहे. भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाच्या (आयआरसीटीसी) पश्चिम विभागाने महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या सहकार्याने 'वनदर्शन-निसर्ग जाणून घ्या, वन्यजीव ओळखा' या विशेष वन्यजीव पर्यटन उपक्रमाची घोषणा केली आहे.



या उपक्रमांतर्गत १९ नोव्हेंबर २०२६ पासून मुंबईहून पाच विशेष पर्यटन सहली सुरू होणार आहेत. यामध्ये ताडोबा व्याघ्र प्रकल्पाचा चार पर्यटन पॅकेजमध्ये समावेश असून, पाचव्या पॅकेजमध्ये पेंच व्याघ्र प्रकल्पाचा समावेश आहे. प्रत्येक सहल चार रात्री आणि पाच दिवसांची असून, रेल्वे प्रवास, निवास, स्थानिक वाहतूक आणि जंगल सफारी यांचा समावेश असलेली पर्यटन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे ताडोबाच्या जंगलातील वन्यजीव, जैवविविधता आणि नैसर्गिक अधिवास जवळून अनुभवण्याची संधी वन्यजीवप्रेमी, निसर्गप्रेमी, छायाचित्रकार आणि कुटुंबांना मिळणार आहे. रेल्वे प्रवासासोबत सफारीचे नियोजन एकाच पॅकेजमध्ये केल्यामुळे पर्यटकांचा प्रवास अधिक सुलभ होणार आहे.

**ताडोबासह पाच पर्यटन पॅकेज**

'वनदर्शन' उपक्रमात पाच वेगवेगळ्या पर्यटन सहलींचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये ताडोबा व्याघ्र प्रकल्पासोबत बोर व्याघ्र अभयारण्य, ताडोबासोबत नवेगाव-नागझिरा व्याघ्र अभयारण्य, पेंच व्याघ्र प्रकल्पासोबत उमरेड-पवनी-करांडला वन्यजीव अभयारण्य, ताडोबासोबत उमरेड-पवनी-करांडला अभयारण्य आणि ताडोबासोबत टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य अशा पाच सहलींचा समावेश आहे. या पर्यटन कार्यक्रमांमधून पर्यटकांना ताडोबासह विविध वनक्षेत्रांतील जैवविविधता अनुभवता येणार आहे. प्रत्येक पॅकेजसाठी चढण्याची आणि उतरण्याची रेल्वे स्थानके स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येणार आहेत.

**रेल्वे तिकीट आणि सफारी परमिट**

या पर्यटन पॅकेजचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पॅकेजच्या अटींनुसार रेल्वे तिकीट आणि जंगल सफारीसाठी प्रवेश परवाना उपलब्ध करून देण्याची व्यवस्था. रेल्वे प्रवास, निवास, स्थानिक वाहतूक आणि सफारीचे नियोजन एकत्रित केल्यामुळे पर्यटकांना अधिक सुलभ आणि आरामदायी अनुभव मिळणार आहे. प्रत्येक फेरीसाठी वातानुकूलित तृतीय श्रेणीत (थ्री एसी) सहा बर्थ आणि वातानुकूलित द्वितीय श्रेणीत (टू एसी) सहा बर्थ उपलब्ध असतील. जागा मर्यादित असल्याने इच्छुक पर्यटकांनी बुकिंगपूर्वी संबंधित पॅकेजच्या अटी आणि उपलब्धता तपासणे आवश्यक आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

### रेल्वे प्रवासाचे वेळापत्रक

**प्रस्थान :** दर गुरुवारी मुंबईहून विदर्भ एक्स्प्रेस (गाडी क्रमांक १२१०५).
**परतीचा प्रवास :** दर रविवारी गोंदिया येथून विदर्भ एक्स्प्रेस (गाडी क्रमांक १२१०६).
**सहलीचा कालावधी :** चार रात्री, पाच दिवस.
**सहलींचा प्रारंभ :** १९ नोव्हेंबर २०२६ पासून.

# विजय खैरनारला फाशीची शिक्षा

**मालेगाव बलात्कार प्रकरण**

**मालेगाव, १६ ऑक्टोबर**

अवघ्या महाराष्ट्राच्या काळजाचा ठोका चुकवणाऱ्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील अवघ्या साडेचार वर्षांच्या चिमुकल्या बालिकेवरील अमानुष लैंगिक अत्याचार आणि निर्घृण हत्या खटल्यात न्यायालयाने ऐतिहासिक निकाल सुनावला आहे. मालेगाव अप्पर जिल्हा व सत्र न्यायालयाने या विकृत गुन्ह्यातील दोषी नराधम आरोपी विजय ऊर्फ शेखर खैरनार याला फाशीची शिक्षा ठोठावली आहे. पीडितेच्या कुटुंबीयांना शासनाकडून १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा आदेशही न्यायालयाने दिला आहे, अशी माहिती ज्येष्ठ विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी दिली.

अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश के. जी. पालदेवार यांच्या न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निकाल जाहीर केला. न्यायालयाने आरोपी खैरनार याला अपहरण, बलात्कार, पुरावे नष्ट करणे आणि निर्घृण हत्या या सर्व कलमांखाली दोषी ठरवले होते. शिक्षेच्या मुद्यावर झालेल्या युक्तिवादानंतर शुक्रवारी दोषीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. उज्ज्वल निकम यांनी न्यायालयात सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निवाड्यांचे दाखले देत युक्तिवाद केला. डोंगराळे गावातील लहान मुले आरोपी विजय खैरनारला 'दादा' संबोधायचे. खेळणाऱ्या लहान मुलांमध्ये पीडिता ही एकुलती एक निष्पाप मुलगी होती. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर **तरुण भारत**
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# अगतिकतेचा गैरफायदा घेणारी बांडगुळे

प्रत्येक व्यक्ती ही व्यापारी नसते, पण प्रत्येक व्यक्ती ग्राहक नक्कीच असते. सर्व व्यापारीही एकप्रकारे ग्राहकच असतात. त्यांना आपल्या दैनंदिन जीवनात इतर काही वस्तूंची खरेदी करावीच लागते. असे असले तरी व्यापारी हा कधीच ग्राहकाच्या बाजूने विचार करत नाही, अशी परिस्थिती भारतात तरी आहे. व्यापारी आपल्याच नफ्या-तोट्याचा विचार सदैव करीत असतो. सन्माननीय अपवाद वगळता बहुतांश व्यापारी ग्राहकांचे शोषण करतात, भरमसाट नफा घेतात, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करतात, कमी दर्जाचा वा भेसळयुक्त माल विकतात, असे आरोपही केले जातात. या पृष्ठभूमीवर औषधांच्या महागड्या किमतींवरून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अभिप्रायावर औषधी उत्पादक क्षेत्रात खळबळ उडणे स्वाभाविक आहे. कर्करोगाच्या उपचारात आवश्यक असलेल्या एका औषधाचा उत्पादन खर्च फक्त २७०० रुपये असताना त्याची विक्री तब्बल २७ हजार म्हणजे दहापट अधिक दराने होते, हे समोर आल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली, हे योग्यच झाले. औषध उत्पादक क्षेत्रात सर्वांत जास्त नफेखोरी होते. पण, त्या क्षेत्रातली लूटमार रोखायला कुणीही तयार नाही. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने त्यात लक्ष घातले हे उत्तमच.

सर्वोच्च न्यायालयाने कान पिरगाळल्यानंतर केंद्र सरकारने कर्करोगाच्या औषधावर व्यापारी आणि विक्रेत्यांना जास्तीत जास्त ३० टक्के नफा घेता येईल, असे आदेश काढले, अशी माहिती सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयाला दिली. यामुळे देशातील जनतेची वर्षाला २५०० कोटींची बचत होईल, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. हा आकडा विचारात घेतला तर आतापर्यंत या औषध कंपन्यांनी किती प्रचंड लूट केली असेल, याची कल्पना करता येते. हा विषय फक्त कर्करोगाच्या औषधापुरता आहे आणि तरीही हा आकडा एवढा मोठा! वैद्यकीय क्षेत्रात विशेषतः खाजगी रुग्णालयातून होणारी लूट हा आधीपासूनच चर्चेचा विषय. खाजगी डॉक्टर इस्पितळ चालवितात आणि औषधाचे दुकानही. एखाद्याकडे औषधाचे दुकान नसेल तर त्याचे बाहेरचे दुकान मात्र ठरलेले असते. सगळीकडे सेटिंग आणि नफेखोरी. यात मरण होते सामान्यांचे. घरातला कुणीही रुग्णालयात दाखल झाला घर अस्वस्थ होते. त्याला वाचवण्यासाठी काहीही करण्याची त्यांची तयारी असते. आयुष्यभराची पुंजी ते खर्च करायला तयार असतात. ती संपल्यावर कर्ज काढायला ते मागेपुढे पाहत नाहीत. आणखी गरज पडली, तर घरदार आणि शेतजमीन विकायलाही ते विचार करीत नाहीत. फक्त आपला माणूस जगावा, एवढीच त्यांची अपेक्षा असते. सर्वसामान्य माणसाच्या याच अगतिकतेचा गैरफायदा खाजगी रुग्णालये आणि औषध कंपन्या घेत असतात. वैद्यकीय विमा असेल तर यातून काही प्रमाणात दिलासा मिळतो, हे खरे. पण, असा विमा असलेल्यांची संख्या अद्यापही मर्यादितच आहे. वैद्यकीय विमा असला तरी दुर्धर आजाराच्या प्रसंगी कितपत आर्थिक मदत मिळते, हा आणखी एक मुद्दा. बहुतांश विमा कंपन्यांचा कल कोणतेही छोटे-मोठे कारण सांगून दावा फेटाळण्याकडे वा कमीत कमी भरपाई देण्याकडे असतो. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे दोन्हीकडून मरण होते.

हे सारे लक्षात घेता, कर्करोगाच्या औषधांवर ३० टक्के नफा ठरवला तर अन्य औषधांवर का नाही, असा अतिशय योग्य प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने सरकारला विचारला. कर्करोगाच्या औषधातून औषधी कंपन्या जशी नफेखोरी करतात, तशीच ती अन्य सर्व औषधांतूनही करतातच. ११ रुपयांच्या सलाईनची बाटली बाजारात २७० रुपयांना विकली जाते, तर ५ हजारांचा कार्डियाक स्टेंट २५ हजारांत विकला जातो, याकडे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनीच लक्ष वेधले. कर्करोगाच्या औषधांच्या किमती नियंत्रणात ठेवल्या तर वार्षिक २५०० कोटी रुपयांची बचत होईल. सर्व प्रकारचे आजार व उपचारांवर लागणाऱ्या औषधांच्या किमती सरकारने नियंत्रणात आणल्या तर दरवर्षी एखाद्या छोट्या राज्याच्या अर्थसंकल्पाएवढी बचत होऊ शकेल. अनेकांचे प्राण वाचू शकतात. गेली कित्येक दशके ही लूट सुरू आहे. पण, सामान्य नागरिकांचा कुणीही वाली नाही. सरकारी इस्पितळांची व्यवस्था पुरेशी नाही. तेथेही औषध खरेदीची दलाली होते, याची उदाहरणे आहेत. महागड्या उपचारांच्या वेळी जनतेला दिलासा देण्यासाठी सरकारने आयुष्मान योजना आणली. औषधावर कराव्या लागणाऱ्या खर्चासाठी अशीच एखादी योजना सरकारने आणण्याची गरज आहे. आपल्या औषधांची विक्री वाढावी म्हणून औषध उत्पादक कंपन्या, औषधी विक्री प्रतिनिधींच्या माध्यमातून डॉक्टरांना महागड्या भेटवस्तू देत असतात. पंचतारांकित हॉटेलातील मुक्कामापासून परदेश दौऱ्यापर्यंतचे आमिष डॉक्टरांना दाखवत असतात. याचे कारण सर्वसामान्य माणसांच्या डॉक्टरांवरील विश्वासात दडले आहे. डॉक्टरने औषधे लिहून दिली की रुग्ण आणि त्याचे नातलग डॉक्टरवर डोळे मिटून विश्वास ठेवतात. डॉक्टर काही चुकीचे करणार नाही, आपल्या हिताचाच निर्णय घेतील, अशी त्यांची खात्री असते. डॉक्टरने लिहून दिलेले औषध कोणत्या कंपनीचे आहे, किती महाग आहे, याच्याशी त्यांना काही देणेघेणे नसते. मोदी सरकारने काही वर्षांपासून जनऔषधी केंद्रे सुरू केली आहेत. बाजारात ५०० रुपयांना मिळणारे औषध तेथे शंभर रुपयांत मिळते. विशेष म्हणजे महागडे औषध आणि या ठिकाणी मिळणारे औषध यांच्या दर्जात आणि गुणवत्तेत फरक नसतो. पण, ब्रँडेड माल विकून प्रचंड नफेखोरी करू पाहणारे लोक त्यातही श्लेष काढतात. त्यामागे नफेखोरीच असते. मुळात हा प्रश्न फक्त औषधांचाच नाही, तर सर्व जीवनावश्यक आणि अन्य वस्तूंच्या किमतीचा आहे. नफेखोरी सर्वच बाबतीत होते. आपल्या देशात अनेक वर्षांपासून एमआरपी म्हणजे कमाल किरकोळ विक्री किंमत अस्तित्वात आहे. ही अतिशय चुकीची पद्धत आहे. मुळात कोणत्याही वस्तूचा विक्री दर निश्चित करताना तिचा उत्पादन खर्च, त्यावरील राज्य आणि केंद्र सरकारचा कर, वाहतूक खर्च आणि योग्य नफा यांचाच विचार केला पाहिजे. आता तर जीएसटी आला आहे. सीजीएसटी आणि एसजीएसटी म्हणजे केंद्र सरकारला मिळणारा आणि राज्य सरकारला मिळणारा असे दोन वेगवेगळे कर स्पष्टपणे नमूद असतात. उत्पादकाकडून कोणतीही वस्तू घाऊक विक्रेत्याकडे येते आणि तेथून ती किरकोळ व्यापाऱ्याला मिळते. या सर्व प्रक्रियेत उत्पादकाचा, घाऊक व्यापाऱ्याचा तसेच किरकोळ व्यापाऱ्याच्या नफ्याची टक्केवारी जाहीर का केली जात नाही? एमआरपी म्हणजे मॅक्झिमम रिटेल प्राईसऐवजी ॲक्च्युअल रिटेल प्राईस (एआरपी) सरकार का जाहीर करत नाही? औषधासह प्रत्येक वस्तूचा उत्पादन खर्च जाहीर करावा, अशी मागणी ग्राहक संघटना अनेक वर्षांपासून करीत आहेत. प्रत्येक स्तरावरील नफ्याची मर्यादा निश्चित झाली पाहिजे. उत्पादकाने-विक्रेत्याने वाजवी नफा घेतलाच पाहिजे. व्यापारी मग तो घाऊक असो की किरकोळ, तोही ग्राहक असतोच. त्याला वाजवी नफा मिळालाच पाहिजे, याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. त्यालाही जगायचे असतेच. नफा घ्यायला कोणाचा विरोध नाही, तर प्रचंड नफेखोरीला विरोध आहे. औषधांच्या किमतीबाबतची पुढील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात २७ ऑक्टोबरला आहे आणि यावेळी अन्य औषधांच्या किमती नियंत्रणात आणण्यासाठी आपण काय उपाययोजना केली, हे सरकारला सांगावे लागणार आहे. न्यायालयाने सामान्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या विषयात लक्ष घातले, याबद्दल त्याचे अभिनंदन केले पाहिजे. सरकारने देशातील जनतेच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आपण आतापर्यंत कोणकोणत्या उपाययोजना केल्या आणि भविष्यात करणार आहोत, हे सांगितले पाहिजे. सामान्यांच्या अगतिकतेचा गैरफायदा घेणारे सर्व प्रकारचे घटक देशाच्या अर्थकारणावरील बांडगुळे आहेत. त्यांना वठणीवर आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून काही तरी ठोस निघावे आणि केंद्र सरकारने त्यावर ठोस अंमलबजावणी करावी, अशीच सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे. ■

## यंगिस्तान

# हाच आहे का आदर्श?

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

आज भारतात एक विचित्र फॅशन आली आहे. स्वतःच्या देशाची परंपरा, इतिहास, संघर्षांकडे डोळेझाक करायची आणि शेजारच्या अयशस्वी आणि हिंसक प्रयोगांना आदर्श म्हणायचे असे धंदे काही लोकांनी चालवले आहेत. काही दिवसांपूर्वीपासून काही तथाकथित पुरोगामी, नागरी हक्कांच्या नावाखाली दुकान चालवणारे लोक उघडपणे म्हणत आहेत की बांगलादेश आमचा आदर्श आहे. ज्या बांगलादेशात गेल्या वर्षभरात सत्ताबदलाच्या नावाखाली जे घडले, ते संपूर्ण जगाने पाहिले. निवडून आलेल्या सरकारला रस्त्यावर हिंसा करून पाडले गेले. त्यानंतर सूडाचा नंगानाच सुरू झाला. घरे जाळली गेली, अल्पसंख्यक हिंदूंवर अमानुष अत्याचार झाले, मंदिरे फोडली गेली, महिलांची अब्रू लुटली गेली, कारखाने लुटले गेले, देशाची अर्थव्यवस्था रसातळाला गेली. हा आहे का तुमचा आदर्श? हेच मॉडेल तुम्हाला भारतात राबवायचे आहे का?

कॉक्रोच जनता पार्टी ही कधीच न्यायासाठी लढणारी चळवळ नव्हती. हा एक अजेंडा आहे. वर्षानुवर्षे या विचारधारेने एकच काम केले आहे, ते म्हणजे भारताच्या प्रत्येक व्यवस्थेला बदनाम करणे. न्यायव्यवस्था सांप्रदायिक आहे, पोलिस खुनी आहेत, निवडणूक आयोग विकला गेला आहे, सैन्य अत्याचारी आहे. देशात काहीच चांगले नाही, असा सततचा प्रचार हे लोक करत आहेत. कॉक्रोच जनता पार्टी हा त्यांचा नवा मुखवटा आहे. मात्र यामागील चेहरे तेच आहेत. एक गंमत पाहा, जेव्हा याच लोकांना विचारले जाते की तुमच्याकडे पर्याय काय आहे, तेव्हा त्यांच्याकडे उत्तर नसते. त्यांचा पर्याय म्हणजे अराजकता. त्यांचा पर्याय म्हणजे रस्त्यावरची गर्दी... हीच तर विकृती आहे. कायद्याच्या राज्यावर विश्वास असल्याचे नाटक करायचे आणि प्रत्यक्षात कायदाच मानायचा नाही. गुजरातपासून ते आजपर्यंतचा त्यांचा इतिहास पाहिला तर लक्षात येते की त्यांना न्याय नकोय,



त्यांना निकाल हवा आहे तोही फक्त त्यांच्या सोयीचा. या संपूर्ण विकृतीला वैचारिक खतपाणी घालण्याचे काम प्रशांत भूषण यांच्यासारखे लोक करत आहेत. हे लोक आता उघडपणे रक्तरंजित क्रांतीची भाषा करू लागले आहेत. लोकशाही मार्गाने, मतपेटीतून बदल होऊ शकत नाही, रस्त्यावर उतरावे लागेल, व्यवस्था उलथवून टाकावी लागेल, असे बेजबाबदार उद्गार ते काढतात. हे अत्यंत धोकादायक आहे. त्यात कॉक्रोच जनता पार्टीची नेता नेहा बोराला भारतात क्रांती घडवण्यासाठी बांगलादेशचा आदर्श घ्यावासा वाटतो. त्यांना थेट प्रश्न विचारावासा वाटतो - नेहा बोरा, बांगलादेशचा आदर्श घ्यावासा वाटतो म्हणजे नेमके काय हवे आहे तुम्हाला? भारतातही बांगलादेशसारखीच रक्तरंजित क्रांती हवी आहे का तुम्हाला? भारताच्या संसदेवर, विधानसभांवर जमावाने हल्ला करावा असे वाटते का? इथेही हिंदूंची घरे जाळली जावीत, मंदिरे फोडली जावीत, हे तुमचे स्वप्न आहे का? तुम्ही आदर्श कोणाचा घेता यावरून तुमची मानसिकता कळते. त्यामुळे ही चळवळ आता उघडपणे हिंसक गोष्टींना पाठिंबा देऊ लागली आहे.

मात्र एक चांगली गोष्ट घडत आहे. आता कॉक्रोच जनता पार्टीला विरोध वाढतो आहे. पूर्वी पत्रकार त्यांना प्रश्न विचारत नव्हते. त्यांच्या एका आरोपावर दिवसभर प्राईम टाईम चालायचा. कारण विद्यार्थ्यांच्या आडून ते आंदोलन करत होते. आता त्यांना सत्तापालट हवा आहे, असे ते स्पष्ट म्हणत आहेत. दीपकेचाही खरा चेहरा लोकांसमोर आला आहे. म्हणून आता चित्र बदलत आहे. सामान्य जनता त्यांना उत्तर देतेय. सोशल मीडियावर, विमानात, रस्त्यावर लोक त्यांच्या प्रामाणिकपणावर संशय घेत आहेत, जाब विचारत आहेत. पत्रकारही आता उलट प्रश्न विचारू लागलेत. आधी एकतर्फी मुलाखती घेतल्या जायच्या. मात्र आता बांगलादेशच्या हिंसेला तुम्ही क्रांती म्हणता का? भारताच्या निवडणुकीवर तुम्हाला विश्वास नाही का? १४० कोटी लोकांनी निवडून दिलेल्या सरकारला तुम्ही हिंसा करून पाडणार का? असे प्रश्न त्यांना विचारल्यामुळे त्यांची बोलती बंद होत आहे आणि त्यांचा विद्रूप चेहरा आणखी समोर येत आहे.

लक्षात घ्या, जर तुमचा आदर्श बांगलादेश असेल, अराजकता, जाळपोळ करणे, मंदिरे फोडणे, अल्पसंख्यकांना मारणे यावर तुमची श्रद्धा असेल, तर तुम्ही औरंगजेबाचे वंशज आहात. त्याचे शासन हे असेच होते. त्याने भारतावर प्रचंड अत्याचार केले. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवत, मराठ्यांच्या पराक्रमाने औरंगजेबाला याच महाराष्ट्रात हताश होऊन जीव गमवावा लागला आहे. आमचे आदर्श हे छत्रपती शिवाजी महाराज आहेत. शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले. आमचा आदर्श हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. ज्यांनी आम्हाला संवैधानिक मार्ग शिकवला. ज्यांना बांगलादेशचा आदर्श घ्यायचा आहे, त्यांनी ठरवावे - तुम्हाला शिवाजी महाराजांच्या विचारांचा भारत हवा आहे की औरंगजेबाच्या विचारांचा? तुम्हाला मतपेटीतून बदल हवा आहे की रक्ताच्या नद्या वाहून क्रांती करायची आहे? भारताची जनता सुज्ञ आहे. तिने औरंगजेबाला नाकारले आहे आणि शिवाजी महाराजांना हृदयात ठेवले आहे. हीच जनता कॉक्रोच जनता पार्टीसारख्या रक्तरंजित क्रांतीचे स्वप्न पाहणाऱ्यांना देखील त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. ■

writerjayeshmestry@gmail.com

## श्री नवरात्र उत्सव

दीपक गो. देशमुख

# ज्ञानमाता सरस्वती

**सातवी माळ**



नवरात्रीच्या नवव्या दिवशी मातेची विविध रूपे श्रद्धेने आणि भक्तिभावाने पूजली जातात. आज मातेचे रूप काळेकुट्ट असून तिचे केस विस्कटलेले असतात. अतिशय भयंकर असे हे रूप असले, तरी माता आपल्या भक्तांना शुभ वरदान देणारी आहे, अशी भाविकांची धारणा आहे. प्रत्येक घरी आपापल्या रीतिरिवाजानुसार मातेची पूजा केली जाते. आज विशेषतः सप्तशती पाठ, जप, हवन अशा विविध धार्मिक विधींद्वारे मातेची भक्ती केली जाते. या भक्तीतून नैराश्य, भूत-प्रेतादी विषयांची भीती दूर होऊन भक्त आत्मनिर्भर होतो, अशी श्रद्धा आहे. काम, क्रोधादी षडरिपूंपासून मुक्ती मिळवून भक्ताला एक वेगळाच पारमार्थिक आनंद प्राप्त होतो.

आजपासून बुद्धीची देवता माता सरस्वती हिचे पूजन पुढील तीन दिवस केले जाते. या उत्सवाला शारदीय नवरात्र असेही म्हटले जाते. ज्ञान, विद्या आणि बुद्धीची अधिष्ठात्री म्हणून माता सरस्वतीला विशेष महत्त्व आहे. तिच्या कृपेने मनुष्याला ज्ञानाचा प्रकाश प्राप्त होतो आणि जीवनाला योग्य दिशा मिळते. तेलंगणातील निर्मल जिल्ह्यात गोदावरी नदीच्या काठी महर्षी व्यासांनी आत्मिक ज्ञान आणि तपश्चर्या साधण्यासाठी वाळूपासून माता सरस्वतीची भव्य मूर्ती निर्माण करून तिची बासर क्षेत्री स्थापना केली, अशी आख्यायिका आहे. भारतातील माता सरस्वतीच्या मंदिरांपैकी एक प्रमुख मंदिर म्हणून या मंदिराचा लौकिक सर्वदूर पसरलेला आहे. येथे ‘अक्षराभ्यास’ नावाचा एक महत्त्वाचा विधी मानला जातो. मुला-मुलींना शाळेत शिक्षणासाठी पाठवण्यापूर्वी येथे विद्यारंभ म्हणजेच अक्षराभ्यासाचा विधी केला जातो. पाटी किंवा कोरी वही घेऊन त्यावर मंदिरातील पुजारी त्या मुलांकडून अक्षर लिहून घेतात. त्यानंतर ती वही देवीच्या चरणांना स्पर्श करून पुन्हा मुलांना दिली जाते. माता सरस्वतीचे हे भव्य मंदिर असून येथे महालक्ष्मी, महाकाली आणि महासरस्वती अशा तिन्ही देवतांचे दर्शन होते. मंदिराजवळच एक उंच टेकडी असून तिच्यावरील एका गुहेत बसून महर्षी व्यासांनी काही काळ तपश्चर्या केली आणि नंतर गणाधीश गणपतीकडून महाभारत लिहून घेतले, अशी आख्यायिका सांगितली जाते. महर्षी वाल्मीकि यांनीही रामायण लिहिण्यापूर्वी याच देवतेचा आशीर्वाद घेतल्याची आख्यायिका येथे मोठ्या श्रद्धेने सांगितली जाते. श्रीगुरुचरित्राच्या चौदाव्या अध्यायाचा लेखनप्रसंगही या पवित्र भूमीशी जोडला जातो. श्री दत्तात्रेय प्रभूंच्या आशीर्वादाने सायंदेव नावाच्या ब्राह्मणाने याच भूमीत थांबून श्रीगुरुचरित्राचा चौदावा अध्याय लिहिला, अशी श्रद्धा आहे. नागपूरचे धर्मभास्कर आणि अभ्यासक श्री सद्गुरुदास महाराज, पूर्वाश्रमीचे विजयराव देशमुख यांनी हे स्थान शोधून येथे दत्तमंदिर उभारले, असे सांगितले जाते.

माहूरच्या पावन भूमीत येण्यापूर्वी संतकवी श्री विष्णुदास महाराज काही काळ याच मंदिरात वास्तव्याला होते. माता सरस्वतीचा कृपाशीर्वाद प्राप्त झाल्यानंतर तिच्या प्रेरणेने ते माहूरला माता रेणुकेच्या सान्निध्यात आले. पुढे माता रेणुकेचे भक्त म्हणून त्यांचा लौकिक सर्वदूर पसरला. माता रेणुकेने त्यांना पूर्ण स्वरूपात दर्शन देऊन त्यांच्या भक्तीला अधिक बळ दिले, अशी भक्तांची श्रद्धा आहे. या प्रसंगाचे सुंदर आणि भावपूर्ण वर्णन कवी विष्णुदास स्वामी यांनी आपल्या भक्तिरचनेत केले आहे -

**माझी रेणुका माऊली, कल्पवृक्षाची सावली ।**
**जशी वासरासाठी गाय, तैशी अनाथांची माई ॥**
**हाके सरशी घाईघाई, वेगे धावतची पायी ।**
**आली तापल्या उन्हात, नाही आळस, मनात**
**माझी रेणुका माऊली ।**
**खाली बैस, घे आराम, मुखावरती आला घाम ।**
**विष्णुदास आदराने, वारा घाली पदराने ॥**

अशी ही करुणामयी, ज्ञानदायिनी आणि भक्तवत्सल माता सरस्वतीची महती आहे. ज्ञान, विद्या आणि भक्तीचा संगम घडविणाऱ्या या पवित्र क्षेत्राचे महत्त्व केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर भारतीय ज्ञानपरंपरेच्या दृष्टीनेही अनन्यसाधारण आहे. ■

उमरखेड. ९४०३६०८११५

## मुंबई वार्तापत्र

# लाचार बाहुले!

नागेश दाचेवार

महाराष्ट्राच्या राजकारणात ढोंगाला आणि दुटप्पीपणाला कधी नव्हे एवढा महापूर आला आहे. स्वतः सत्तेवर असताना ज्यांनी महाराष्ट्राच्या बळीराजाच्या तोंडाला सलग अडीच वर्षे पाने पुसली, तिजोरीत खडखडाट असल्याचा कांगावा करत मंत्रालयाच्या वातानुकूलित दालनातून बाहेर पडण्याचेही कष्ट घेतले नाहीत, तेच महाभाग आज विरोधी पक्षाच्या बाकांवर बसून शेतकरीहिताचा पुळका दाखवत थयथयाट करत आहेत. रोज सकाळ झाली की महायुती सरकारवर तोंडसुख घ्यायचे, शब्दांचे फुगे हवेत सोडून स्वतःचा पराक्रम सिद्ध करायचा आणि प्रत्यक्षात शेतकरी जेव्हा संकटात होता तेव्हा मात्र हात चोळत बसायचे, ही उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कंपूची जुनीच सवय आहे. ‘लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण’, या म्हणीचे मूर्तिमंत रूप आज उघडेनागडे झाले आहे.

संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला दिलासा मिळावा, ऐन दिवाळीच्या सणात बळीराजाच्या घरात अंधार राहू नये, त्याच्या चूल आणि दिव्याची चिंता मिटावी म्हणून महायुती सरकारने, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने पाच हजार रुपयांची रक्कम जमा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. पण या निर्णयाने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहताच या कंपूच्या पोटात असा काही पोटशूळ उठला आहे की, जणू शेतकऱ्याला मिळालेली ही मदत म्हणजे यांच्या काळजावर झालेला वार आहे. ज्यांनी स्वतःच्या अडीच वर्षांच्या कारकीर्दीत शेतकऱ्यांच्या पदरात एक नवा पैसा टाकला नाही, ज्यांनी केवळ पोकळ घोषणांच्या हवेत शेतकऱ्यांना झुलवत ठेवले, ते आज पाच हजार रुपयांच्या मदतीला तोकडी म्हणून हिणवत आहेत. हा केवळ सरकारचा अपमान नसून, संकटाच्या काळात मिळालेल्या घासात समाधान मानणाऱ्या लाखो स्वाभिमानी शेतकऱ्यांच्या कष्टाचा आणि भावनांचा घोर अपमान आहे. इतिहासाची पाने फार जुनी नाहीत, केवळ पाच-सहा वर्षांपूर्वीचा काळ आठवला तरी या महाभागांचे ढोंग सहज उघडे पडते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधी आणि नंतर जेव्हा राज्यात अतिवृष्टीचे संकट आले होते, तेव्हा याच उद्धव ठाकरेंनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कॅमेऱ्यांसमोर मोठमोठ्या गर्जना केल्या होत्या. हेक्टरी ५० हजार रुपये मदत मिळालीच पाहिजे, शेतकऱ्यांना तत्काळ ५० हजार द्या, अशा मागण्या करून त्यांनी तत्कालीन देवेंद्र फडणवीस सरकारला धारेवर धरण्याचा आव आणला होता. विशेष म्हणजे सरकारमध्ये सत्तेत असताना, त्यानंतर अनैतिक युत्या आणि आघाड्या करून सत्तेच्या सिंहासनावर स्वतः उद्धव ठाकरे विराजमान झाले. स्वतःकडे मुख्यमंत्रिपदाची सूत्रे आली, तिजोरीच्या चाव्या हाती आल्या. मग त्या वेळी त्या ५० हजार रुपयांच्या घोषणेचे काय झाले? सत्तेवर बसल्यावर ती हेक्टरी ५० हजारांची भाषा कोणत्या अडगळीत जाऊन पडली? सलग अडीच वर्षांहून अधिक काळ मुख्यमंत्रिपदाचा उपभोग घेणाऱ्या ठाकरेंना आपल्या संपूर्ण कार्यकाळात शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजार सोडाच, साधा दमडीचाही थेट दिलासा देता आला नाही. आपत्तिग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी यांच्या सरकारकडे इच्छाशक्ती नव्हती की शेतकऱ्यांविषयी ती कणव केवळ निवडणुकीपुरतीच पुळक्याची ठरली होती? स्वतः मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांच्या खात्यात फुटकी कवडी न टाकणारे, उठसूठ केंद्र सरकारकडे बोटं दाखवणारे हे लोक आज सरकार शेतकऱ्यांना पाच हजार रुपये देत असताना कोणत्या तोंडाने प्रश्न विचारत आहेत? नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याची मोठी डिंग मारली गेली होती, पण त्या घोषणेचा कागद मंत्रालयाच्या फाईलींमध्येच धूळ खात पडून राहिला. एक रुपयाही बळीराजाच्या खात्यात जमा झाला नाही. उलट शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणि तोंडावर नैराश्य पसरवून हे महाशय शेतकऱ्यांनी ‘वर्क फ्रॉम होम’ करावे असा अत्यंत बिनडोक सल्ला देत राज्याचा कारभार हाकत असल्याचा आव आणत होते. त्यानंतर जेव्हा महायुतीचे सरकार सत्तेवर आले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूत्रे हाती घेतली, तेव्हा त्यांनी ठाकरे सरकारने केवळ हवेत सोडलेली ५० हजारांच्या प्रोत्साहन अनुदानाची योजना शिंदे-फडणवीस सरकारने तत्काळ अमलात आणली. आज नैसर्गिक आपत्तीच्या काळात, दुष्काळ आणि नापिकीच्या चक्रात अडकलेल्या बळीराजाला दिवाळी साजरी करता यावी यासाठी किमान ५ हजार रुपये तरी त्यांच्या हाती पडत आहेत. ज्याच्याकडे काहीच नाही त्याच्यासाठी ही रकमदेखील मोठी आहे. पण कुठलाही धंदा नसताना मातोश्री दोन बांधणाऱ्यांना पैशाची किंमत थोडी कळणार आहे.

शेतकऱ्याला मिळणारा प्रत्येक रुपया हा त्याच्या जगण्याला आधार देणारा असतो, हे वातानुकूलित बंगल्यात बसून राजकारण करणाऱ्याला कसे कळणार? महाराष्ट्रात पाच हजार रुपयांना तुटपुंजे म्हणणारे हे नेते कर्नाटकातील काँग्रेस सरकारच्या निर्णयावर मूग गिळून गप्प का बसतात? कर्नाटकातील काँग्रेस सरकारने तेथील संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना अवघे दोन हजार रुपये देऊन बोळवण केली आहे. तिथे काँग्रेसने शेतकऱ्यांची केलेली ही थट्टा यांना दिसत नाही काय? दोन हजार रुपयांत शेतकरी काय अगरबत्ती लावणार आहे का, असा सवाल कर्नाटक सरकारला विचारण्याची हिंमत यांच्यात का नाही? स्वतःला मर्दाची अवलाद म्हणवून घेणाऱ्यांनी काँग्रेसच्या या लाजिरवाण्या मदतीवर एकदा तरी जाहीरपणे थुंकले पाहिजे होते. पण नाही, दिल्लीत जाऊन सोनिया गांधींसमोर आणि राहुल गांधींसमोर लोटांगण घालणाऱ्या, लाचारीची परिसीमा गाठणाऱ्या या गुलामांची तिकडे तोंड उघडायची लायकी नाही. दिल्लीच्या हायकमांडसमोर मान तुकवून लोटांगण घालायचे आणि महाराष्ट्रात येऊन डिंगा हाकायच्या, हीच यांची एकूण राजकीय लायकी आहे.

आता महायुती सरकारने ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ सुरू करून राज्यातील कोट्यवधी माता-भगिनींना दरमहा १५०० रुपयांचा आर्थिक आधार दिला. बहिणींच्या खात्यात थेट पैसे जमा होऊ लागताच यांच्या पोटात असा काही गोळा आला की, यांनी ही योजना कशी बंद पाडता येईल यासाठी न्यायालयात धाव घेण्यापर्यंतचे कारनामे केले. १५०० रुपयांवरून छाती बडवणारे, ही रक्कम कमी असल्याचा कंठशोष करणारे हे महाभाग शेजारच्या कर्नाटकातील काँग्रेसच्या गृहलक्ष्मी योजनेबाबत का बोलत नाहीत? कर्नाटकात महिलांना दरमहा दोन हजार रुपये दिले जातात, तेव्हा यांना काँग्रेस फार मोठी दाता वाटते का? तिथे दोन हजार चालतात, मग महाराष्ट्रात भगिनींच्या खात्यात सन्मानाने जाणारे पैसे यांच्या डोळ्यात का खुपतात? काँग्रेसला जाब विचारण्याची धमक यांच्यात उरलेली नाही. मर्दाची अवलाद असेल तर त्यांनी थेट बंगळुरूकडे बोट दाखवून विचारले पाहिजे प्रश्न विचारले पाहिजे ना.

तेलंगणात शेतकऱ्यांची सर्रास फसवणूक केली जात आहे, बँका शेतकऱ्याच्या दारात जप्तीच्या नोटिसा चिकटवत आहेत आणि तेलंगणातील शेतकरी आक्रोश करत आहेत. पण तिकडे ढुंकूनही न पाहणारे हे महाभाग महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचे तारणहार बनण्याचा आव आणत आहेत. काँग्रेसच्या या लबाडीवर बोलायला यांच्या जीभा टाळूला चिकटतात, कारण सत्तेच्या लालसेपोटी यांनी स्वतःचे स्वाभिमान आणि विचार आधीच दिल्लीच्या चरणी गहाण टाकले आहेत.

घरात बसून शब्दांचे बुडबुडे फोडणाऱ्यांनी आधी आपल्या अडीच वर्षांच्या पापांचे प्रायश्चित्त करावे, काँग्रेसच्या लाचारीतून बाहेर पडून कर्नाटक आणि तेलंगणातील शेतकऱ्यांच्या हक्कांवर बोलण्याची हिंमत दाखवावी. अन्यथा, या दांभिक बडबडीला महाराष्ट्रातील बळीराजा असा सडेतोड तडाखा देईल की, कागदी वाघ कायमचे इतिहासजमा होतील. ■

९२७०३३३८८६

### धरणातील पाणीचोरी थांबवा

राज्यात पुढील दहा महिने पुरेल एवढा पिण्याच्या पाण्याचा साठा हवा आहे. तसे नियोजन शासनाने करण्याची नितांत गरज आहे. आजच महाराष्ट्रात सर्वत्र पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई दिसत आहे. मात्र राज्यात ज्या धरणात थोडे फार पाणीसाठे आहेत त्या पाणीसाठ्यांची चोरी मोठ्या प्रमाणात होत आहे. धरणाच्या आजूबाजूला असलेले शेतकरी या धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी चोरून आपल्या पिकांना देत आहेत. राज्यातील प्रत्येक धरणात जवळपास ५०० ते १००० विजेच्या मोटारी बसवून पाणी उचलत आहेत. ही उचल अशीच राहिली तर डिसेंबर महिन्यात राज्यातील सर्व छोटी व मोठी धरणे कोरडी पडतील. माणसांना व प्राण्यांना पिण्यासाठी पाणी मिळणार नाही. शासनाने राज्यातील प्रत्येक धरणातील शेतकऱ्यांच्या इलेक्ट्रॉनिक मोटारी जप्त करून त्या ठिकाणी २४ तास पहारा बसवावा आणि ही पाणीचोरी त्वरित थांबवून हे पाणीसाठे राखून ठेवावे. हे पाणीसाठे पुढील उन्हाळ्यात उपयुक्त ठरणार आहेत. पाणी संपले तर पाणी कोठून आयात करणार? त्यापेक्षा आज धरणातील पाणी राखून ठेऊन ते उद्या उद्भवणाऱ्या पाणीटंचाईवर जालीम उपाय ठरू शकतात. शासनाने राज्याच्या धरणातून होत असेलेल्या पाणीचोरीला त्वरित थांबविण्याची नितांत गरज आहे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

■■■

### रस्त्यांवरील पाळीव जनावरांचा प्रश्न सुटेना

‘‘रस्त्यांवरील मोकाट जनावरे होणार दिसेनाशी’’ या तरुण भारतात दि. १६ ऑक्टोबरच्या बातमीनुसार नियोजित वाठोडा येथील नंदग्राम प्रकल्पाने शहरातील निराधार भटक्या जनावरांचा प्रश्न सुटणार असल्याचे दिसते. परंतु आजही भर वस्त्यांमधील पाळीव गायी नागपुरातील गजबजलेल्या रामनगर, गोकुळपेठ बाजार, शिवाजी नगर, गांधी नगर या भागात मुक्तपणे वावरत असल्याचे चित्र आहेच. आता ही जनावरे निश्चितच निराधार नाहीत कारण ती गोठे मालकांची जबाबदारी आहे. राहत्या वस्तीतील किंवा लगतच्या

## वाचक पत्रे

परिसरातील असे गोठे बाहेर हलविण्यात आल्याशिवाय हा प्रश्न प्रलंबितच राहील. ‘नंदग्राम’ प्रकल्पाने पाळीव जनावरांचाही प्रश्न सुटेल का? यावर नागपूर महानगरपालिकेने स्पष्टीकरण दिले तर बरे होईल. सध्या बेजबाबदार गोठे मालकांवर काय कारवाई होते आहे हे काही नागरिकांना कळत नाही. जनावरांचे गोठे अन्यत्र हलविल्याशिवाय अपघातास निमंत्रण देणाऱ्या पाळीव जनावरांचा उपसर्ग कमी होणार नाही हे निश्चित.

**राम राजे**/९४२१७७९९४५

■■■

### निष्ठेचे मूल्य : समृद्ध नाती आणि राष्ट्राचा आधारस्तंभ

आजच्या वेगवान, तांत्रिक आणि स्वार्थी युगात ‘निष्ठा’ या मूल्याचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. निष्ठा ही केवळ एक भावना नसून ते एक पवित्र कर्तव्य आहे, जे कठीण प्रसंगीही माणसाला ध्येयमार्गावरून विचलित होऊ देत नाही. व्यक्ती, समाज, संस्था किंवा देशाप्रति असलेली अढळ श्रद्धा, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीचे भान म्हणजेच निष्ठा.

कुटुंबात परस्पर निष्ठा असेल तर नात्यांमध्ये विश्वासाची समृद्धी येते. आजच्या डिजिटल युगात, जिथे आभासी जगामुळे कौटुंबिक संवाद कमी होत चालला आहे, तिथे एकमेकांप्रतिची निष्ठा आणि गोपनीयता जपण्याची बांधिलकी नाती घट्ट ठेवते. संवाद, निष्ठा आणि गोपनीयता हेच आज कौटुंबिक नाती टिकवून ठेवण्याचे मुख्य आधारस्तंभ आहेत. समाजात जेव्हा निष्ठावंत लोक एकत्र येतात, तेव्हा असंवैधानिक विचारांना व अफवांना तिलांजली मिळून सामाजिक सलोखा आणि न्याय प्रस्थापित होतो.

केवळ वैयक्तिक आयुष्यातच नव्हे, तर नोकरी आणि व्यवसायाच्या क्षेत्रातही निष्ठेचे मूल्य तितकेच अनन्यसाधारण आहे. आपण ज्या संस्थेत, संघटनेत किंवा कंपनीत काम करतो, ती संस्था आणि तिची ध्येयधोरणे याच्याशी प्रामाणिक राहणे, कामाची गोपनीयता पाळणे आणि कठीण काळातही संस्थेला साथ देणे हीच खरी व्यावसायिक निष्ठा होय. जागतिक क्रीडाक्षेत्रात देशाला सुवर्णपदक मिळवून देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या खेळाडूंच्या त्यागात असो, सीमेवर अहोरात्र रक्षण करणाऱ्या जवानांमध्ये असो, की हवामान बदलाच्या काळात निसर्गाचे रक्षण करण्यासाठी पुढे येणाऱ्या स्वयंसेवकांच्या कृतीत असो, हीच राष्ट्रनिष्ठा दिसून येते. अगदी अवकाशात व आकाशात कर्तव्याची पराकाष्ठा करताना, फ्लायदुबईच्या विमानावरील कठीण प्रसंगात स्वतःचा जीव धोक्यात घालून १७७ प्रवाशांचे प्राण वाचवणारे कॅप्टन स्मित मच्छार यांच्या धाडसी कृतीतही हीच कर्तव्याप्रतिची निष्ठा दिसून येते.

निष्ठावंत व्यक्तींचा त्याग, समर्पण, परिश्रम आणि ध्येयासक्ती यामुळेच समाज व देशाचा विकास शक्य होतो. निष्ठा टिकवून ठेवणे आव्हानात्मक असले, तरी सकारात्मक आणि समृद्ध भविष्यासाठी प्रत्येक क्षेत्रात निष्ठा बाळगणे ही काळाची गरज आहे. ■

**संजय शरद श्रौती**/९८६०४५१८४०

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### सुरवसे बालक मंदिरात भोंडला कार्यक्रम

**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

सुरवसे बालक मंदिरामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी भोंडला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुरवसे बालक मंदिरमध्ये भोंडला हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेचे विश्वस्त राखी सुरवसे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शुभांगी लोखंडे यांची उपस्थिती होती. प्रथम राखी सुरवसे व लोखंडे यांनी सरस्वती पूजन करून गजगौरीची पूजन केले. शाळेतील विद्यार्थिनींनी भोंडल्याची पारंपरिक गाणी म्हणत उत्साहाने फेर धरला. मुलांनी टिपऱ्यांचा खेळ खेळत नृत्याचा मनमुराद आनंद लुटला. सर्व बालचमू आनंदाने झुलताना दिसत होता. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले

### सौर ऊर्जेच्या प्रसारासाठी 'सौर संवाद २०२६' यात्रा आज सोलापूरात

**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

सौर ऊर्जेबाबत जनजागृती करण्यासह या क्षेत्रातील उद्योजकता आणि रोजगाराच्या संधी ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यासाठी गोपाल काबरा फाउंडेशन आणि जीके एनर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सौर संवाद २०२६'



यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १२ ते १८ ऑक्टोबर २०२६ यादरम्यान होणारी ही यात्रा शनिवारी (ता. १७) सोलापूरमध्ये येत आहे. हॉटेल द फर्न रेसिडेन्सी, होटगी रोड, सोलापूर येथे सकाळी ९.३० वाजता मेळावा होणार आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांत सौर ऊर्जेचा वापर वाढवण्याच्या उद्देशाने ही यात्रा काढण्यात आली आहे. केंद्र व राज्य सरकारने सौर ऊर्जेच्या वापरासाठी प्रोत्साहनपर अनेक योजना हाती घेतल्या आहेत. या यात्रेमुळे या योजना लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. घरगुती छतावरील (रुफटॉफ) सौर यंत्रणा, व्यावसायिक सौर प्रकल्प, सौर कृषिपंप, ऊर्जा साठवण, यंत्रणा बसविणे, देखभाल आणि वितरण अशा विविध क्षेत्रांतील संधींची माहिती यात्रेदरम्यान दिली जाणार आहे. जीके एनर्जी लिमिटेडचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक गोपाल काबरा मार्गदर्शन करणार आहेत.

### उसाच्या शेतात गांजाची ४४४ झाडे; ३४.७१ लाखांचा मुद्देमाल जप्त; दोघांना अटक

**पंढरपूर, दि.१६ ऑक्टोबर -**

तालुक्यातील आंबे गावात उसाच्या शेतात गांजाची लागवड केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला असून, पोलिसांनी गांजाची ४४४ झाडे जप्त केली आहेत. या कारवाईत सुमारे ३४ लाख ७१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन जणांना अटक करण्यात आली आहे. पंढरपूर तालुक्यातील रांझणी परिसरातील आंबे गावात उसाच्या शेतात गांजाची लागवड करण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी संबंधित शेतात कारवाई केली. या वेळी उसाच्या पिकामध्ये लपवून ठेवलेली गांजाची ४४४ झाडे आढळून आली. पोलिसांनी ही झाडे काढून जप्त केली. जप्त केलेल्या गांजाच्या झाडांचे एकूण वजन सुमारे ६९ किलो ४२४ ग्रॅम इतके आहे. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ३४ लाख ७१ हजार २०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान या प्रकरणी नितीन मोहन शिंदे (वय २१) आणि मोहन वासुदेव शिंदे (वय ५४) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघांना अटक करण्यात आली आहे. गांजाची लागवड केल्याप्रकरणी अंमली पदार्थ आणि मनःप्रभावी पदार्थ अधिनियम अर्थात एनडीपीएस कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लाळवार करीत आहेत.

### तरवडाचे झाड, फुले आणि नवरात्रोत्सव : परंपरा, जैवविविधता आणि निसर्गावरील परिणाम

भारतीय संस्कृतीत निसर्ग आणि सण-उत्सवांचे अतुट नाते आहे. नवरात्र हा शक्ती, श्रद्धा आणि भक्तीचा उत्सव असून यात देवीच्या पूजेसाठी फुले, हार आणि नैसर्गिक सजावटीला विशेष महत्त्व असते. मात्र, या परंपरा जपत असताना त्यांचा निसर्गावर होणारा परिणाम विचारात घेणे आवश्यक आहे. विशेषतः महाराष्ट्रातील कोरड्या प्रदेशात आढळणाऱ्या 'तरवड' (Tarwad/Cassia auriculata) सारख्या स्थानिक वनस्पतींचे जैवविविधतेतील महत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. तरवड ही कमी पाण्यात टिकणारी वनस्पती असून, तिच्या पिवळ्या फुलांमुळे कोरड्या भागातील सौंदर्य वाढते. ही फुले मधमाश्या, भुंगे आणि इतर परागीभवन करणाऱ्या कीटकांचे अन्नस्रोत आहेत, जे वनस्पतींच्या पुनरुत्पादनासाठी आणि परिसंस्थेच्या संतुलनासाठी महत्त्वाचे ठरतात. या झुडपांमुळे लहान जीवांना निवारा मिळतो आणि जमिनीची धूप थांबते.



सध्या नवरात्रौत्सवात पूजेसाठी आणि सजावटीसाठी फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. काही भागात तरवडाची फुलेही वापरली जातात. परंतु, हौशीपोटी रानटी फुले आणि पूर्ण फांद्या तोडल्याने कीटक व स्थानिक जैवविविधतेचे नुकसान होते. तसेच, उत्सवानंतर फुलांचा कचरा आणि प्लास्टिक नद्या किंवा मोकळ्या जागी टाकल्याने प्रदूषण वाढते.

निसर्ग आपल्याला जगण्यासाठी आवश्यक अन्न, पाणी आणि हवा देतो. त्यामुळे देवीची पूजा करताना निसर्गाचे रक्षण करण्याचा संकल्प करणे काळाची गरज आहे. पर्यावरणपूरक नवरात्र साजरी करण्यासाठी बागेतील किंवा शेतातील फुलांना प्राधान्य द्यावे. सजावटीसाठी प्लास्टिक आणि थर्माकोलचा वापर टाळावा. तसेच, निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करून त्यापासून कंपोस्ट खत बनवावे. निसर्गातील फुलांचा संसार उद्ध्वस्त न करता, परंपरा जपत जैवविविधता वाचवूया.

**- प्रा. रेश्मा माने**
**अध्यक्षा, युगंधर फाउंडेशन, सोलापूर**

# बार्शीतील पाणीप्रश्नावरील उपोषण स्थगित

## जिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन; २३ ऑक्टोबरनंतर लोकप्रतिनिधींची बैठक घेणार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १६ ऑक्टोबर -**

बार्शी शहरातील तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावर तहसील कार्यालयाजवळ तिरंगा झेंड्याखाली सुरु असलेले विरोधी पक्षातील २१ नगरसेवक आणि पाण्याने त्रस्त नागरिकांचे लाक्षणिक उपोषण गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.



जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी रात्री उशिरा विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे यांच्याशी मोबाईलवरुन संवाद साधत, 'जिल्हाधिकाऱ्यांच्या शब्दावर विश्वास ठेवा,' असे आवाहन केले. त्यानंतर खासदार ओम राजे निंबाळकर आणि आमदार दिलीप सोपल यांनीही आंदोलकांशी संपर्क साधून उपोषण स्थगित करण्याची विनंती केली. बार्शीच्या पाणीप्रश्नावर मागील दोन दिवसांपासून सुरु असलेल्या या आंदोलनादरम्यान नगरपरिषद प्रशासनाकडून गूढ नाट्यमय घडामोडी घडल्या. गुरुवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास जिल्हाधिकाऱ्यांनी आंदोलनाची दखल घेत विरोधी पक्षनेते अक्कलकोटे यांच्याशी चर्चा केली. बार्शीच्या पाणीटंचाईवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी आंदोलकांच्या मागण्यांचा विचार केला जाईल, असे आश्वासन दिले. तसेच सोमवारी पाणीप्रश्नासंदर्भात बैठक घेणार असून, २३ ऑक्टोबरनंतर स्थानिक लोकप्रतिनिधींशी बैठक घेऊन चर्चा केली जाईल, असेही सांगितले.

दरम्यान, खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार दिलीप सोपल यांनीही आंदोलकांना मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री पवार यांच्या कार्यालयांकडूनही जिल्हा प्रशासनाला तोडगाबाबत सूचना दिल्याचे सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांच्या आश्वासनाला मान देत आंदोलकांनी माध्यमांसमोर उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली. यावेळी महसूल विभागाचे प्रतिनिधी, नगरपरिषद प्रशासनाचे प्रतिनिधी आणि बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कुंभार उपस्थित होते. तहसीलदार एफ. आर. शेख यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर आंदोलकांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासंदर्भातील पत्र दिले.

### सुधारित वेतनश्रेणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

माहितीनुसार, राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयीन कर्मचाऱ्यांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने तीव्र आंदोलन पुकारण्यात आले आहे. या सुधारित वेतनश्रेणीचा अभ्यास समितीचा प्रस्ताव ३१ जानेवारी २०२५ पासून राज्य शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे. तब्बल दोन वर्षे उलटूनही शासनाने यावर कोणताही सकारात्मक निर्णय न घेतल्यामुळे कर्मचारी वर्गात तीव्र असंतोष पसरला आहे.

या पार्श्वभूमीवर, न्यायालयीन लघुलेखक, गट 'क', बेलिफ आणि चतुर्थश्रेणी कर्मचारी महासंघाने एकत्र येत १६ ऑगस्ट २०२६ रोजी शासनाला आंदोलनाची नोटीस पाठवली होती. ठरलेल्या टप्प्यांनुसार, १६ सप्टेंबर २०२६ रोजी राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून शांततेत काम केले. त्यानंतर आता दि. १७ ऑक्टोबर रोजीही कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावूनच दैनंदिन कामकाज पाहण्याचा निर्धार केला आहे. पुढील टप्प्यात, ५ नोव्हेंबर २०२६ रोजी कर्मचारी एक दिवसाच्या सामूहिक रजेवर जाणार असून, ६ आणि ७ नोव्हेंबर रोजी अन्नत्याग आंदोलन केले जाईल. तरीही मागणी मान्य न झाल्यास, १७ नोव्हेंबर २०२६ पासून सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार आहेत. या संपामुळे न्यायव्यवस्थेचे मोठे नुकसान होऊन ती कोलमडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने या प्रस्तावाचा प्राधान्याने आणि सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी मागणी सोलापूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षांनी केली आहे.

## पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रत्येक मतदाराशी संपर्क साधा : महापौर कोंड्याल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

भारतीय जनता पार्टी व महायुतीच्या पुणे पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ. स्मिताताई जाधव तसेच पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार शिक्षक मित्र कौस्तुभ गावडे यांच्या प्रचाराच्या अनुषंगाने महापौर विनायक कोंड्याल यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभाग क्रमांक १२ मध्ये मंडलाध्यक्ष, बूथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना महापौर विनायक कोंड्याल म्हणाले की, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा व कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या मतदारसंघात प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याची भूमिका महत्त्वाची आहे. सोलापूर जिल्ह्यातील पदवीधर आणि शिक्षक मतदारांपर्यंत पोहोचून उमेदवारांची माहिती द्यावी. बूथनिहाय नियोजन, मतदारांशी थेट संपर्क आणि मतदानाबाबत जनजागृती करून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनानुसार नियोजनबद्ध तसेच आमदार देवेंद्र कोठे यांच्या सूचनांनुसार प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी असेही महापौरांनी सांगितले.

बैठकीचे प्रास्ताविक नगरसेवक अक्षय अंजिखाने यांनी केले. प्रभाग १२ चे प्रभारी दिलीप पतंगे व प्रभारी माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे यांनी निवडणुकीच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी जळगाव जिल्हाध्यक्ष पदवीधर स्वप्निल मोरे, जळगाव जिल्हा महिला मोर्चा अध्यक्ष कृतिकाताई आफळे, महामंत्री पदवीधर किरण आढाव, महिला मोर्चा पदाधिकारी मायाताई सोनवणे, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, नगरसेविका सारिकाताई खजूरगी, इङअर अभिषेक चिंता, त्रिमूर्ती बल्ला, संतोष म्हमाने, व्यंकटेश नंदाल, सुनील दाते, राजू चलमिट्टी, सागर बल्ला, सुरेश नल्ला, राज ईगोली, नरेश दाते, रामदास मगर, शिवाजी कोळी, महेश रोटे, राकेश अंबल, नारायण येरवा, विनायक अल्ली व रोहित नारायणकर उपस्थित होते..

## इंटरनॅशनल रिस्क रिडक्शन डे निमित्त देवी भक्तांनी गिरविले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या वतीने इंटरनॅशनल रिस्क रिडक्शन डे निमित्त आपत्ती व्यवस्थापन या विषयावर प्रबोधन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन सोलापूर येथील श्री. रूपा भवानी देवस्थान येथे देवी भक्तांकारिता करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन पोलिस निरीक्षक सचिन यादव यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामीण प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. श्रीकांत येळेगावकर हे होते. यावेळी नगरसेवक विनायक विटकर, स्वीकृत नगरसेवक ज्ञानेश्वर मॅकल, रूपाभवानी मंदिर समितीचे ट्रस्टी मल्लिनाथ मसरे, पोलीस निरीक्षक विजय खोमणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश येणपे, सागर बामणे, गणेश इंगळे, राधा जेऊघाले आधी पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे आपदा मित्र रामचंद्र वाघमारे व बजरंग व्हटकर, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, गीतगंगा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व्यंकटेश कंची, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात गीतगंगा सोशल फाउंडेशन, सारथी युथ फाऊंडेशन, सखी वन स्टॉप सेंटर, रोटरी क्लब ऑफ सोलापूर, सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभाग, जिल्हा शलचिकेचा कार्यालय सोलापूर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष सोलापूर, डॉ. हेडगेवार रक्तपेढी सोलापूर, जिज्ञासा महानगर सोलापूर, नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन सोलापूर, निमा वुमेन्स फोरम सोलापूर, दयानंद कला व विज्ञान महाविद्यालय एनएसएस विभाग, वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय समाजकार्य विभाग, हिंदू एकता मंच, विश्व हिंदू महासभा, अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान कोल्हापूर आदी सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांचे स्वागत मल्लिनाथ मसरे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले, सूत्रसंचालन आकाश गायकवाड यांनी केले तर आभार व्यंकटेश कंची यांनी मानले.

## वीज समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढा

### तामलवाडी इंडस्ट्रीज असोसिएशनची बैठकीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ ऑक्टोबर-**

तामलवाडी इंडस्ट्रिज असोसिएशनने माळुंब्रा ते तामलवाडी दरम्यानच्या ३३ के.व्ही. वीज वाहिनीवरील वारंवार होणाऱ्या बिघाडाबाबत (फॉल्ट्स) तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी असोसिएशनने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या (महावितरण) लातूर परिमंडळाच्या मुख्य अभियंत्यांना पत्र लिहून संयुक्त बैठकीची आणि प्रत्यक्ष पाहणी दौऱ्याची मागणी केली आहे.

असोसिएशनने पत्रात नमूद केले आहे की, माळुंब्रा (२२० के.व्ही.) ते तामलवाडी (३३/११ के.व्ही.) दरम्यानची ही वीज वाहिनी सुमारे ४० वर्षांपूर्वीची असून, अत्यंत जीर्ण झाली आहे. या वाहिनीवर अनेक ठिकाणी सांधे (Joints) असून, किरकोळ वादळ-वाऱ्यातही वीज पुरवठा वारंवार खंडित होतो. यामुळे उद्योगांचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. या खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे तामलवाडी एमआयडीसी मधील सुमारे १०० हून अधिक उद्योगांना दररोज उत्पादनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

यामुळे उद्योजकांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होत असून, वीज पुरवठ्यातील वारंवार चढ-उतारामुळे कंपन्यांमधील महागडे VFD, मोटर्स आणि इतर यंत्रसामुग्री निकामी होत आहेत. या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुख्य अभियंत्यांनी अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व उप-कार्यकारी अभियंता यांच्यासह तामलवाडी येथे प्रत्यक्ष पाहणी दौरा करावा आणि असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठक घेऊन तारीख निश्चित करावी, अशी विनंती तामलवाडी इंडस्ट्रिज असोसिएशनचे सचिव संजय पतंगे यांनी पत्राद्वारे केली आहे. या पत्राच्या प्रती धाराशिवचे अधीक्षक अभियंता आणि तुळजापूर विभागाचे कार्यकारी अभियंता यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.




**असोसिएशनच्या प्रमुख मागण्या**

३३ के.व्ही. वीज वाहिनीचे संपूर्ण नूतनीकरण करावे, पर्यायी एक्स्प्रेस फीडरचा प्रस्ताव मंजूर करावा, वारंवार होणाऱ्या फॉल्ट्ससाठी तातडीने तात्पुरती देखभाल मोहीम राबवावी.

### पानगल शाळेसमोर चाकू, फायटर, रॉडने हल्ला; तरुण जखमी

**सोलापूर** - मित्राचे भांडण सोडविण्यासाठी आलेल्या तरुणास चाकू, फायटर व रॉडने मारून जखमी करण्यात आल्याची घटना पानगल शाळेच्या गेट समोर गुरुवारी रात्री साडेनऊ वाजता घडली. अबूझर बागवान(वय २५, रा. मंगळवार बाजार सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. तो गुरुवारी रात्री पानगल शाळे समोर मित्राचे भांडण सोडवण्यासाठी गेला असता त्याला सैपन नावाच्या तरुणाने मारहाण केली. त्याला उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात मित्र अब्बास कारभारी याने रात्री दाखल केले.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं.१८०/१, यांसी नवीन सर्व्हे नं.१७१/१/दक्षिण यापैकी राधाकृष्ण नगर भाग-२ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील प्लॉट नं. ३९, ४०, ४१ या तीन्ही प्लॉटचे एकूण क्षेत्र २५२.७७ चौ.मी. अथवा २७२० चौ.मी. यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - प्लॉट नं. २८, २९, ३०, दक्षिणेस-नरसिंग विडी घरकुल, पश्चिमेस रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं.३८. येणेप्रमाणे चतुःसिमा असलेली खुली प्लॉट जागा व यातील सर्व हक्कासह मिळकत.

सदर वर वर्णन केलेली मिळकत ही अतिश कृष्णराव क्षिरसागर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची होती. त्यांनी आमचे अशिल सौ. सुवर्णा राजू लंबाते वगैरे यांचेसोबत व्यवहार केलेला होता. सदर मिळकतीचा व्यवहार काही तांत्रिक अडचणीमुळे आमचे अशिल सौ. सुवर्णा राजू लंबाते वगैरे यांनी सदर जागेचे मालक अतिश कृष्णराव क्षिरसागर यांच्यासोबत व्यवहार रद्द केलेला असून, त्याच्यासोबत असलेले सर्व करारपत्र रद्द केलेला आहे.

सबब, सदर वर नमूद केलेल्या मिळकतीसंदर्भात अतिश कृष्णराव क्षिरसागर यांच्यासोबत कोणीही कसल्याही स्वरुपाचा व्यवहार करण्यास आमचे अशिलाचा कोणताही हरकत व अडथळा नाही. कोणाचीही कसल्याही प्रकारची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

ही जाहीर नोटीस दिली ता. १६/१०/२०२६.

सही/-
**ॲड. शामराव एस. बिराजदार**
**ऑफिस - शॉप नं.४, बेसकर कॉम्प्लेक्स,**
**सिव्हील लाईन, सोलापूर मो.नं. ९९७५१२४८८९०**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## आईस्क्रिमच्या बहाण्याने ७ वर्षीय बालिकेचा लैंगिक छळ; आरोपीस ५ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर -**

सोलापूर : आईस्क्रिम खायला देण्याचे आमिष दाखवून ७ वर्षीय बालिकेचा लैंगिक छळ करणाऱ्या तरूणास येथील विशेष न्यायाधीश अजितकुमार भस्मे यांनी ५ वर्षे सक्तमजुरी व ५०० रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

संजय निलाप्पा कोळी (वय ३१ वर्ष, रा. मड्डी वस्ती, कुंभारी) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे.



गुन्ह्याची थोडक्यात पार्श्वभूमी - २९ नोव्हेंबर २०१५ रोजी दुपारी संजय कोळी याने आईस्क्रिम खायला देतो असे आमिष यातील पिडीतेला दाखवून तिला कुंभारी येथील मड्डी वस्ती जवळ असलेल्या जंगलातील नविन घरकुलाच्या बांधकामाच्या ठिकाणी नेले. तिथे पिडीत बालिकेवर संजय कोळी याने लैंगिक अत्याचार करून तिचा विनयभंग केला. याबाबत पिडीत बालिकेने तिच्या नातेवाईकांना सांगितल्यानंतर नातेवाईकांनी वळसंग पोलीस ठाणे गाठून याबाबत संजय कोळीविरुध्द पोक्सोचा गुन्हा दाखल केला. वरील आरोपीला अटक करून पोलीस उपनिरीक्षक बजरंग कापसे, पोलीस शिपाई दिनेश कोळी, महिला कर्मचारी काळे यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

याची सुनावणी विशेष न्यायाधीश भस्मे यांच्यासमोर झाली. यात सरकार पक्षाच्यावतीने ६ साक्षीदार तपासण्यात आले. पिडीता, फिर्यादी, तपास अधिकारी यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या. समोर आलेला साक्षी पुरावा व सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरून विशेष न्यायाधीश भस्मे यांनी आरोपी संजय कोळी यास पोक्सोअंतर्गत ५ वर्षे सक्तमजुरी व ५०० रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

**जाहीर सूचना**

सर्व जनतेस, संबंधितांना तसेच बँक, वित्तीय संस्था आणि संभाव्य खरेदीदारांना सूचित करण्यात येते की, मिळकतीचा तपशील : जिल्हा सोलापूर, तालुका व पोटतुकडी अक्कलकोट, नगरपरिषद हद्दीतील, अक्कलकोट ग्रामीण येथील गट क्र. ९०५/४ व ९०५/५ **अ)** प्लॉट क्र. ४ क्षेत्र ८८.२० चौ.मी. यांसी चतुःसीमा :- पूर्वेस : प्लॉट क्र.३२, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : प्लॉट क्र. ३, दक्षिणेस : प्लॉट क्र. ५ व **ब)** प्लॉट क्र. ३२ चे क्षेत्र ८८.२० चौ.मी. यांसी चतुःसीमा पूर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट क्र.४, उत्तरेस : प्लॉट क्र. ३३, दक्षिणेस : प्लॉट क्र. ३१ या व अन्य दाव्यात नमूद मिळकतीबाबत मिरज येथील मे. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मिरज येथे नियमित दिवानी मुकदमा क्र. ४१/२०२५ - श्री रवींद्र ईश्वर पोळ विरुध्द सौ. ममता रवींद्र पोळ यांच्यामध्ये मिळकतीचे मालकी हक्काबाबत दावा प्रलंबित आहे. सदरहू दाव्यात सद्यस्थितीत निशाणी ५ म्हणजेच स्थगिती अर्जाच्या सुनावणीवर कामकाज चालू आहे. तरी प्रलंबित दावाच्या कालावधीत सदर मिळकतीबाबत प्रतिवादी ममता रवींद्र पोळ, रा. मिरज यांचेसोबत कुणीही विक्री, बक्षीसपत्र, गहाण, लीज किंवा इतर कोणतीही हस्तांतरणाची व व्यवहाराची कार्यवाही करू नये. तसे केल्यास मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८२ (Transfer of Property Act) च्या कलम ५२ मधील 'लिस पेंडन्स' च्या (Doctrine of Lis Pendens) सिध्दांतानुसार, या प्रलंबित दावाच्या कालावधीत सदर मिळकतीचे हस्तांतरणाची व व्यवहाराची कार्यवाही आमचे अशील वादी - श्री रवींद्र पोळ यांचेवर बंधनकारक असणार नाही. सदर व्यवहार न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या अधीन राहील. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीने, संस्थेने किंवा बँकेने सदर मिळकत संदर्भात कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार, करार, गहाण, लीज किंवा देवाणघेवाण करू नये. जर कोणी या सूचनेकडे दुर्लक्ष करून सदर मिळकतीबाबत कोणताही व्यवहार केला, तर तो व्यवहार - तसे कोणतेही हक्क-अधिकार आमचे अशील वादी - श्री रवींद्र पोळ यांचेवर बंधनकारक असणार नाही. याची नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर सूचना.

मिरज
दिनांक : १०/१०/२०२६

सही/-
**ॲड. पुजा भालचंद्र जाधव,**
**'धनश्री', महादेव कॉलनी, मिरज मालगाव रोड,**
**मिरज ४१६४१०. संपर्कः ८२०८१७३८१६**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विविध कामे**

मंडल रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, प्रतिष्ठित कंपन्या/कंट्रॅक्टर यांच्याकडून खालील कामांसाठी ई-निविदा मागवत आहेतः (1) निविदा सूचना क्र.: 34-2026-एसआरडिएनएस. कामाचे नावः दोन वर्षांच्या कालावधीसाठी एडीईएन/कलबुर्गी उपविभागांतर्गत, एसएसई (पी.वे) कलबुर्गी विभागांतर्गत विविध पी.वे ची कामे. कामाची अंदाजे किंमतः 22330722.40, अनामत रक्कमः 446600.00. (2) निविदा सूचना क्र.: 35-2026-एसआरडिएनएस. कामाचे नावः दोन वर्षांच्या कालावधीसाठी एडीईएन/कलबुर्गी उपविभागांतर्गत, एसएसई (पी.वे) गाणगापूर रोड विभागांतर्गत विविध पी.वे ची कामे. कामाची अंदाजे किंमतः 22205269.70, अनामत रक्कमः 444100.00. (3) निविदा सूचना क्र.: 37-2026-एसआरडिएनएस. कामाचे नावः वाडी स्टेशन येथे 60 खाटांच्या नवीन टीटीई विश्रामगृहाचे बांधकाम, कामाची अंदाजे किंमतः 52663975.59, अनामत रक्कमः 1053300.00. कामाचा पूर्ण होण्याचा कालावधीः अनुक्रम क्रमांक 1 साठी 24 महिने आणि अनुक्रम क्रमांक 2 व 3 साठी 12 महिने. देखभाल कालावधीः अनुक्रम क्रमांक 1 व 2 साठी लागू नाही आणि अनुक्रम क्रमांक 3 साठी 24 महिने. निविदा उघडण्याची तारीखः प्रत्येकासाठी 04.11.2026. भावी निविदाकारांना या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्र नोंदवण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार संकेतस्थळाला भेट देण्याचा सल्ला दिला जातो. संकेतस्थळः www.ireps.gov.in

EXP-38 **डीआरएम (काम), सोलापूर**

**तिकिटांसाठी रेलवन ॲप डाउनलोड करा**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## क्रीडा वृत्त...



### डायव्हिंग स्पर्धेत ज. रा. चंडक प्रशालेच्या लिगाडे बंधूचे यश

**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

मार्कंडेय जलतरण तलावावर झालेल्या शालेय शहर डायव्हिंग स्पर्धेत ज. रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या लिगाडे बंधूनी यश मिळविले. या कामगिरीवर त्यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. संकेत याने १ मीटर स्प्रिंग रोड व ३ मीटर स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड मध्ये प्रथम व रितेश याने १ मीटर स्प्रिंग बोर्ड व ३ मीटर स्प्रिंग बोर्ड व हायबोर्डमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. त्यांचा संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ व सचिवा शिल्पाताई ठोकळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना क्रीडा शिक्षक दशरथ गुरव व नफिसा शेख यांचे मार्गदर्शन लाभले.



### शालेय रायफल शूटिंग स्पर्धेत मॉडेल पब्लिक स्कूलची कामगिरी

**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

शालेय शहर रायफल शूटिंग स्पर्धेत मॉडेल पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. या कामगिरीवर त्यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक रविकिरण आवटे, प्रशिक्षक अविनाश पुरी व आलिशा पुरी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अदिती कुलकर्णी व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले. कामगिरी : १४ वर्षांखालील : कैसर शेख (पीप साईट या प्रकारात तृतीय). १७ वर्षांखालील : अर्णव सुरवसे (पिस्तूल या प्रकारात द्वितीय), स्नेहलता गौडनवरू (पिस्तूल या प्रकारात प्रथम), १९ वर्षांखालील : सोहम भावे (ओपन साईट या प्रकारात प्रथम), हर्ष साखरे (द्वितीय), दिनेश बिराजदार (तृतीय), अथर्व म्हेत्रे (पीप साईट या प्रकारात द्वितीय), यश मंद्रुपकर (पिस्तूल या प्रकारात द्वितीय), प्रितेश चव्हाण (तृतीय).

### तालुका योगासन स्पर्धेत 'एमआयटी विश्वशांती गुरुकुल'च्या वेदिका शिंदे प्रथम



**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या वेदिका महेश शिंदे हिने तालुका योगासन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे तिची आगामी जिल्हा योगासन स्पर्धेसाठी निवड झाली. वेदिकाचे प्राचार्या रुपाली हजारे यांनी तिचे कौतुक करत अभिनंदन केले. 'विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता वाढवण्यासाठी योग अत्यंत महत्त्वाचा असून, वेदिकाच्या या कामगिरीने संपूर्ण शाळेचा नावलौकिक वाढवला आहे,' असे मत व्यक्त करत त्यांनी वेदिकाला आगामी जिल्हा स्पर्धेत उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या.



### तालुका क्रीडा स्पर्धेत बार्शीच्या 'एमआयटी ज्युनिअर कॉलेजची' उल्लेखनीय कामगिरी

**बार्शी, दि. १६ ऑक्टोबर**

तालुका शालेय क्रीडा स्पर्धेत येथील 'एमआयटी ज्युनिअर कॉलेज'च्या १९ वर्षांखालील मुलांच्या व्हॉलीबॉल संघाने उपविजेतेपद संपादिले. तसेच तालुका क्रिकेट स्पर्धेतही महाविद्यालयाच्या संघाने तृतीय स्थान मिळविले. या संघांना क्रीडाशिक्षक अमोल मिरगणे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या महासचिव प्रा. स्वाती कराड-चाटे, प्रकल्प संचालिका डॉ. ज्योती ज्योतवाणी आणि प्राचार्य डॉ. सचिन चव्हाण यांनी सर्व विजयी खेळाडू व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन करून जिल्हा स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.



### ऑर्किड स्कूलला जिल्हा बॅडमिंटन स्पर्धेत उपविजेतेपद

**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलने शालेय शहर बॅडमिंटन स्पर्धेत उपविजेतेपद प्राप्त केले. यात शर्व बिराजदार, सोहम जाधव यांचा समावेश होता. या कामगिरीवर दोघांची अहिल्यानगर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा विभाग प्रमुख आनंद लिगाडे, ज्ञानदीप जाधव यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, संस्थेच्या सचिवा वर्षाताई विभुते, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, मार्गदर्शिका मीना पारखे, प्राचार्या रश्मी कुंभार यांनी शुभेच्छा दिल्या.

# भारताच्या करण सिंगचे आव्हान कायम

## आयटीएफ ३० हजार डॉलर पुरुष टेनिस स्पर्धा : रेचटमन विन्सिगुएरा, थानापट चॅनता, समीर बॅनर्जी यांचा उपांत्य फेरीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १६ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटना यांच्या वतीने आयोजित व अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना, महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या महाराष्ट्र शासन, सोलापूर महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालय पुरस्कृत एमएसएलटीए एसडीएलटीए आयटीएफ २५हजार डॉलर पुरुष टेनिस स्पर्धेत स्वीडनच्या रेचटमन विन्सिगुएरा डब्ल्यू, थायलंडच्या थानापट चॅनता, अमेरिकेच्या समीर बॅनर्जी यांनी मानांकित खेळाडूंना पराभूत करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

येथील एमएसएलटीए टेनिस कोर्ट, डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉ मध्ये एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत काल अव्वल मानांकित खेळाडूवर विजय मिळवणाऱ्या स्वीडनच्या रेचटमन विन्सिगुएरा, डब्ल्यू याने भारताच्या सातव्या मानांकित सिद्धार्थ रावतचा ४-६, ६-३, ६-२असा संघर्षापूर्ण पराभव करून आपली अनपेक्षित निकालाची मालिका कायम ठेवली. हा सामना २ तास १९ मिनिटे चालला. सहाव्या मानांकित अमेरिकेच्या समीर बॅनर्जी याने भारताच्या चौथ्या मानांकित दिग्विजय प्रताप सिंगचा ५-७, ६-३, ६-४ असा कडवा प्रतिकार केला. हा सामना २ तास ३३ मिनिटे चालला.



तिसऱ्या मानांकित भारताच्या करण सिंग याने अमेरिकेच्या अधित्य गणेशनचा ६-१, ६-0 असा एकतर्फी पराभव करून उपांत्य फेरी गाठली. थायलंडच्या थानापट चॅनता याने आठव्या मानांकित भारताच्या एस डी प्रज्वल देवचा टायब्रेकमध्ये ७-६(५), ७-६(६) असा पराभव करून आगेकूच केली. अन्य एका उपांत्यपूर्व फेरीत थायलंडच्या थानापट चॅनताने भारताच्या एस डी प्रज्वल देव(भारत)८ ७-६(५) ७-६(६) असा पराभव केला.

दुहेरीत उपांत्य फेरीत दुसऱ्या मानांकित भारताच्या आदिल कल्याणपूर याने जपानच्या रियुकी मत्सुदाच्या साथीत अमेरिकेच्या तिसऱ्या मानांकित गेरत जॉन्स व नोहा साचहतर यांचा ३-६, ६-३, ११-६ असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. भारताच्या दक्षिणेश्वर सुरेश व मनीष सुरेशकुमार यांनी अमेरिकेच्या अधित्य गणेशन व कझाकस्तानच्या ग्रिगोरी लोमकीन यांचा ६-७(३), ६-३, १३-११ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.



## व्हॉलिबॉल स्पर्धेत संगमेश्वर कॉलेज विजेता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर -**

शालेय शहर व्हॉलिबॉल स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजच्या खेळाडूंनी देगाव आश्रम शाळा ज्युनिअर कॉलेजचा पराभव करीत विजेतेपद पटकाविले.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते , प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले.

या खेळाडूंना श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी , सचिव ज्योती काडादी, शैक्षणिक सल्लागार प्रमोद दर्गोपाटील, प्र.प्राचार्य डॉ .ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

**विजयी संघ :** वैभव राजखडे, समर्थ कुलकर्णी, अखिल तळकोकुल, प्रज्वल शिंदे, विनित पाटील, रेहान अत्तार, मयूर बागलकोटे, देवराज गंटगळे, मयूर संचु, राहुल बोलबत्तीन, समीर शेख, अथर्व भोगशेट्टी.



## लक्ष्मीबाई कन्या प्रशालेच्या विद्यार्थिनींची तालुका मैदानी स्पर्धेत चमकदार कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ ऑक्टोबर-**

लक्ष्मीबाई कन्या प्रशाला यशवंतनगर येथील विद्यार्थिनींनी तालुका मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

संस्थेचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, मुख्याध्यापिका अनिता पवार आदींनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**कामगिरी : १७ वर्षे वयोगट** : ४ बाय १०० मीटर रिले तृतीय ( श्रावणी काळे, श्रावणी पाटोळे, श्रावणी साठे, संस्कृती काळे व नंदिनी इंदलकर). चालणे : भावना रणदिवे (प्रथम), वृंदा बागल (द्वितीय), थाळीफेक : सोनाली शेंडगे (प्रथम), ऋतुजा काळे (द्वितीय). ३000 मीटर धावणे : पार्वती खुडे (तृतीय),

**१९ वर्षे वयोगट :** ४ बाय १०० मीटर रिले द्वितीय (वैष्णवी पवार,कल्याणी भालके,महेक बागवान,साक्षी पाटील व प्रतीक्षा लांडगे), थाळीफेक : मयुरी काळे (तृतीय), क्रॉस कंट्री : श्रावणी काळे (पाचवा), पार्वती खुडे (सहावा).

## जिल्हा मैदानी स्पर्धेत जिजाऊ गुरुकुलच्या १६ खेळाडूंची कामगिरी



### पाच खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १६ ऑक्टोबर-**

जिल्हा शालेय मैदानी स्पर्धेत बार्शी तालुक्यातील खांडवी येथील जिजाऊ गुरुकुल सैनिक पॅटर्न स्कूलच्या १६ खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. यातून प्रथम आलेल्या पाच खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना फिजिकल कोच जे. बी. शिंदे, क्रीडा विभागप्रमुख गणेश वडेकर, क्रीडा शिक्षक निहार आणि प्रतीक यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे जिजाऊ गुरुकुलचे अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिवा वर्षाताई घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी :** १९ वर्षांखालील : समर्थ कोकाटे ( बांबू उडी, प्रथम). १७ वर्षांखालील : गौरव धालगडे ( ४00 मीटर धावणे प्रथम, १00 मीटर धावणे द्वितीय), सत्यम काळोखे (५000 मीटर चालणे, प्रथम). १४ वर्षांखालीलः राजवर्धन रेवण पारेकर (६00 मीटर धावणे प्रथम), ओम मोरे (बांबू उडी), मयूर बुद्रुक ( तिहेरी उडी), सार्थक बंड आणि सार्थक कोळी (४00 मीटर हर्डल्स तृतीय). धनराज गाढवे (५000 मीटर चालणे, तृतीय), आदित्य कोंढारे (४00 मीटर धावणे, तृतीय). ४ बाय ४00 मीटर रिले द्वितीय (स्वप्निल माने, सार्थक बंड, शिवराज शिंदे, मयूर बुद्रुक, समर्थ कोकाटे )



# कोळकुरे, चव्हाण, लिंगडे, सय्यद, श्रीमंगले व कबाडे दुहेरीचे मानकरी

### शालेय शहर मैदानी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

शालेय शहर मैदानी स्पर्धेत १७ वर्षांखालील गटात सुधीर कोळकुरे (निर्मलाताई ठोकळ), काशीनाथ चव्हाण (कुचन), सृष्टी लिंगडे (व्ही. एम. मेहता) यांनी तर १४ वर्षांखालील गटात मोहमद अयान सय्यद (राष्ट्रसंत तुकडोजी), ऋतुजा श्रीमंगले (जागृती विद्यामंदीर) व अनुष्का कबाडे (सिद्धेश्वर कन्या) यांनी प्रत्येकी दोन प्रकारात प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

नेहरूनगर शासकीय मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन महापालिका क्रीडाधिकारी नजीर शेख यांनी केले. यावेळी दैनिक तरुण भारतचे वृत्तसंपदक अजितकुमार संगवे, माजी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव राजू प्याटी, दशरथ गुरव, राहूल हजारे, सुभाष उपासे, सुर्याजी लिंगडे, सुनील चव्हाण, सुवर्णा कांबळे, पुंडलिक कलखांबकर, संतोष जाधव, डॉ. उज्वल मलजी आदी उपस्थित होते.

**पहिल्या दिवशीचे निकाल (प्रथम दोन) : (खेळ प्रकार, नाव व शाळेचे नाव याक्रमाणे)-**

**१७ वर्षांखालील मुले :** धावणे : २०० मीटर: सुधीर विजयकुमार कोळकुरे, वेदांत जगदीश मद्राशी (दोघे निर्मलाताई ठोकळ). ४00 मीटर: सुधीर विजयकुमार कोळकुरे (निर्मलाताई ठोकळ), हर्षराज गणेश पासफुले (मॉडेल स्कूल). ३000 मीटर: साईश्वर केशव गुंडुक, प्रविण प्रकाश पवार (दोघे स्वामी विवेकानंद). ५ कि.मी. चालणे: अरमान अशपाक शेख (कुमठे प्रशाला), अनुज नितीन सकपाळे (लिटल स्टार स्कूल). १०० मीटर हर्डल्स: हर्षवर्धन सुर्याजी लिंगाडे (निर्मलाताई ठोकळ), यतिराज जमादार. लांब उडी: काशिनाथ गोदुसा चव्हाण (कुचन कनिष्ठ), अविरत विनोद स्वामी (सेंट थॉमस). तिहेरी उडी: काशिनाथ गोदुसा चव्हाण (कुचन ज्यु. कॉ.), श्लोक उल्हास सुरवसे (संगमेश्वर कॉलेज). थाळी फेक: सोहम मारुती जाधव (कुमठे प्रशाला), सुशांत साळुंखे (जय जवान जय किसान). गोळा फेक: अजिंक्य भोसले (स्वामी विवेकानंद), अनिकेत अमोल रंगरेज ( एसव्हीसीएस).

**मुली :** धावणे: २०० मीटर: अक्षता प्रचंडप्पा प्रचंडे, श्रद्धा केशव गुंडुक (स्वामी विवेकानंद), ४०० मीटर: अमेछा खांडागळे (एसव्हीसीएस), साक्षी नागळगाव (स्वामी विवेकानंद). ३000 मीटर: ऋतिका मारुती होरखे (कुमठे प्रशाला), शिरीन सैफन जमादार (छ. शिवाजी). ३ कि.मी. चालणे: संजना रमेश कोळी (कुमठे प्रशाला), अनुराधा गोरख करंडे (ज. रा. चंडक). १०० मीटर हर्डल्स: सृष्टी सुर्याजी लिंगडे (मेहता प्रशाला), आदिती शिवानंद बोंगाडे (संगमेश्वर स्कूल). लांब उडी: सृष्टी सुर्याजी लिंगडे, खुशी गणेश पवार (स्वामी विवेकानंद). तहेरी उडी: विभा लालसिंग जाधव (कुमठे प्रशाला), सृष्टी अनिल विटकर (स्वामी विवेकानंद एम आयडीसी). थाळी फेक: सोनाक्षी सुनिल राठोड (कुमठे प्रशाला), जिवीका जयंत गायकवाड (भारती विद्यापीठ). गोळा फेक: काव्या सत्याश्वर पवार (शांती स्कूल), सोनाक्षी सुनिल राठोड (कुमठे प्रशाला). भाला फेक: भाग्यश्री सिद्राम नगोल्ली (कुचन प्रशाळा), तमन्ना रशिद शेख (कुमठे प्रशाला).

**१४ वर्षांखालील : मुले :** १०० मीटर: प्रोशेश संजय होराम (सिद्धेश्वर स्कूल), रतिकान्त भगवान हक्के (मल्लिकार्जुन हायस्कूल). ४00 मीटर: मोहम्मद अयान सय्यद (तुकडोजी महाराज प्रशाला), युग शहांक (सिद्धेश्वर प्रशाला). ६00 मीटर: मोहम्मद अयान म. सय्यद, अनिरुद्ध भोसले (पोतदार स्कूल). ८0 मीटर हर्डल्स: तझेन शेख (सेंट जोसेफ), अमीर हसन सगरी (संगमेश्वर स्कूल). लांब उडी: प्रेशेस संजय होराम (सिद्धेश्वर स्कूल), अयान महिबूब सय्यद (राष्ट्रसंत तुकडोजी प्र.). थाळी फेक: पुष्कराज मंगेश जाधव (ज्ञानप्रबोधिनी), लक्ष्मीकांत बिरमल बिज्जरगी (कुमठे प्रशाला). गोळा फेक: यल्लस्वामी ओराम (सिद्धेश्वर स्कूल), लक्ष्मीकांत बिज्जरगी (कुमठे प्रशाला).

**मुली :** धावणे : १०० मीटर: पवित्रा इरप्पा नागलगाव (छ. शिवाजी ), साक्षी नितीन मिसकीन (पोतदार स्कूल). २०० मीटर: ऋतुजा श्रीमंगले (जागृती विद्या मंदिर), कार्तिकी कैलास करकंटी (मल्लिकार्जुन प्रशाला). ४00 मीटर: ऋतुजा श्रीमंगळे, प्रज्ञा जमादार (छ. शिवाजी). ६00 मीटर: जेनिफर डेविड बंदगीपुडी, त्रिदेवी कृष्णा कोंडुर (छ. शिवाजी). ८0 मीटर हर्डल्स: श्रावणी चव्हाण (भारती विद्यापीठ), स्वराली काळे (सुयश सेंट्रल). लांब उडी: साक्षी नितीन मिसकीन, भक्ती संदिप देशमुख (युनिक प्रशाला). थाळी फेक: अनुष्का रविंद्र कबाडे (सिद्धेश्वर कन्या), सर्वज्ञा परशुराम चव्हाण (लिटल स्टार, कुमठे). गोळा फेक: अनुष्का रविंद्र कबाडे, आदिती गौरीशंकर सुरवसे (सहस्त्रार्जुन प्रशाला).

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### निर्मलाताई ठोकळ प्रशालेत महिला पालकांसाठी विविध स्पर्धा

**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेत नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून महिला पालकांसाठी पाककला, रांगोळी व मेहंदी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. २५० हून अधिक माता-पालकांनी या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका शिल्पा ठोकळ होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून सोलापूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, इनरव्हील क्लब सोलापूरच्या अध्यक्षा दीप्ती देसाई आणि सचिवा जेमिनी बक्षी उपस्थित होत्या. सर्वप्रथम सर्व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व स्व. निर्मलाताई ठोकळ यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. परीक्षकांसह कार्यक्रमाच्या अध्यक्षा शिल्पा ठोकळ यांनी विविध खाद्यपदार्थांचे निरीक्षण करून त्यांचा आस्वाद घेतला. पाककला स्पर्धेत कांचन धाये यांनी प्रथम, तर महादेवी वाघमारे यांनी द्वितीय तर सुजाता राठोड यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. रांगोळी स्पर्धेत जयश्री धुळराव यांनी प्रथम सोनाली गायकवाड यांनी द्वितीय तर कशिश शिरस्वार हिने तृतीय क्रमांक मिळिवला. मेहंदी स्पर्धेत अजवा पटेल यांनी प्रथम, सुरैय्या शेख यांनी द्वितीय, तर सादिया शेख यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांचा स्मृतिचिन्ह, प्रशस्तिपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रशालेचे प्राचार्य डी. डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन श्रुती मोहोळकर यांनी केले, तर आभार वैशाली पवार यांनी मानले.

### सांगोल्यात शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे विविध मार्गावरुन श्री दुर्गामाता दौड

**सांगोला, दि.१६ ऑक्टोबर-**



सांगोला शहरात शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, सांगोला विभागाच्या वतीने घटस्थापना ते विजयादशमी या कालावधीत विविध मार्गावरून श्री दुर्गामाता दौडचे आयोजन केले आहे. दरम्यान श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्रोत्सवाच्या सहाव्या माळेनिमित्त सांगोला शहरातील वासुद चौक-कर्मवीरनगर नंतर वासुद चौक या मार्गाने काढलेली श्री दुर्गामाता दौड जल्लोषाच्या वातावरणात पार पडली. यावेळी सांगोला पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे उपस्थित होते. सोहळ्याला उत्स्फूर्तपणे सर्व धारकरी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल कारखान्यावर ८ तास गव्हाण बंद

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन; चेअरमन व कार्यकारी संचालकांच्या आश्वासनानंतर स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ ऑक्टोबर -**

ऊस उत्पादकांना प्रतिटन ५ हजार रुपये दर मिळावा, साखरेची किमान विक्री किंमत प्रतिकिलो ५० रुपये आणि इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करावा, या मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने १५ ऑक्टोबर रोजी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर ८ तास गव्हाण बंद आंदोलन करण्यात आले. नंतर चेअरमन व कार्यकारी संचालकांच्या लेखी आश्वासनानंतर ते तात्पुरते स्थगित केले.



ऊस दर जाहीर न करता गाळप सुरू करण्याच्या पार्श्वभूमीवर संघटनेने आक्रमक भूमिका घेत हे आंदोलन केले. ऊस उत्पादनासाठी लागणारी खते, मजुरी, मशागत आदींच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. वाढत्या उत्पादन खर्चाचा विचार करून यंदा ऊस उत्पादकांना प्रतिटन ५,००० रुपये दर मिळणे आवश्यक असल्याची भूमिका संघटनेने मांडली. संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी हे साखरेची एमएसपी प्रतिकिलो ५० रुपये आणि इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करत आहेत. या दरवाढीमुळे साखर कारखान्यांच्या आर्थिक उत्पन्नाला हातभार लागू शकतो. त्यामुळे कारखान्यांनी राजू शेट्टी यांच्या आंदोलनाला पाठिंबा देऊन शेतकरी आणि साखर उद्योगाच्या हितासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन संघटनेने केले. ८ तासांच्या गव्हाण बंद आंदोलनानंतर श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक यांनी ऊस दराचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी तोडगा काढण्यात येईल, असे लेखी पत्र दिले. या लेखी आश्वासनानंतर संघटनेने आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे.

आंदोलन स्थगित केले तरी ऊस दराच्या प्रश्नावर संघटनेचे लक्ष कायम राहणार आहे. लेखी आश्वासनानुसार कारखाना व्यवस्थापनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन ऊस उत्पादकांना न्याय द्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

> **ऊस दराबाबत 'नो कॉम्प्रमाइज'**
>
> राजकारणात युती-आघाडी कोणासोबतही असली, तरी ऊस दराच्या बाबतीत नो कॉम्प्रमाइज..! राजू शेट्टी मागतील तो दर मिळालाच पाहिजे.
>
> **- सचिन पाटील, शेतकरी नेते, स्वाभिमानी शेतकरी संघटना.**

## माढा तालुक्यात डॉ.रोंगे यांना शिक्षक मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

### ज्ञानयात्रींच्या विचारांना शिक्षकांकडून हिरवा कंदील

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ ऑक्टोबर -**



कमी अवधीत जास्त शिक्षकांशी संवाद साधता यावा आणि ज्ञानयात्री डॉ. बी.पी.रोंगे यांचे विचार प्रत्येक शिक्षकांपर्यंत पोहचावे या उदात्त हेतूने त्यांच्या कार्यकर्त्यांसह डॉ.रोंगे यांचे अख्खे कुटुंब कामाला लागले आहे. आमदार होण्यापूर्वीच डॉ. रोंगे यांनी शिक्षकांचे प्रश्न सोडविल्याने माढा तालुक्यातील शिक्षण संस्थांमधून तसेच शिक्षक वर्गांमधून त्यांना उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात एका जागेसाठी ३० जण उमेदवार रिंगणात असले तरी ज्ञानयात्री डॉ.बी.पी. रोंगे सरांना मानणारा मोठा शिक्षकवर्ग आहे. डॉ. रोंगे सरांचे पारदर्शी कार्यावर लक्ष आहे. येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर गुरुवारी माढा तालुक्यातील जवळपास २५ शाळा महाविद्यालयांना भेटी देऊन त्यांची भूमिका स्पष्ट केली. डॉ. रोंगे यांच्यावतीने त्यांच्या सुविद्य पत्नी प्रेमलता रोंगे यांनी गेल्या आठवड्यात भेटी गाठीवर लक्ष केंद्रित केले. सर्वत्र प्रचंड प्रतिसाद असल्याचे जाणवते आहे. प्रेमलता रोंगे यांनी काल कुर्डुवाडीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, महात्मा ज्योतीबा फुले उच्च माध्यमिक व कला प्रशाला कुर्डुवाडी, लीड स्कूल कुर्डूवाडी, प्रगती पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज कुर्डू, शरद विद्यालय बारलोणी, प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे, श्रीमान लक्ष्मणराव पवार माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रोपळे, संजयमामा शिंदे माध्यमिक विद्यालय भोगेवाडी, छत्रपती शिवाजी विद्यालय वडशिंगे, न्यू इंग्लिश स्कूल वडशिंगे, मातोश्री माध्यमिक विद्यालय म्हैसगाव, न्यू इंग्लिश स्कूल रिधोरे यासह इतर शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांच्यासमवेत अर्जुन खटके, भारत माने यांच्यासह डॉ.रोंगे यांच्यावर मनापासून प्रेम करणारे अनेक शिक्षकवृंद उपस्थित होते.

## बार्शीतील हिंगलाज माता मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान

### नवरात्रोत्सवात महिलांची लक्षवेधी उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ ऑक्टोबर -**

बार्शी शहरातील मंगळवार पेठ परिसरात स्थित हिंगलाज माता मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. भावसार क्षत्रिय समाजाची कुलस्वामिनी असलेल्या हिंगलाज मातेच्या दर्शनासाठी भाविकांची श्रद्धेने उपस्थिती असते. नवरात्रोत्सवात मंदिरात भक्तिमय वातावरण निर्माण होते.

हिंगलाज देवीचे मूळ स्थान पाकिस्तानातील बलुचिस्तान प्रांतात हिंगोल नदी परिसरात असल्याची धार्मिक मान्यता आहे. हिंगलाज माता हे ५१ शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. त्यामुळे या देवीला भाविकांच्या श्रद्धेत विशेष स्थान आहे.

नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत




मंदिरात देवीची आरती मोठ्या भक्तिभावाने केली जाते. यावेळी भाविक एकत्र येऊन देवीची उपासना करतात. आरतीवेळी मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारून जातो. विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षवेधी असते. महिला मोठ्या श्रद्धेने आरतीत सहभागी होऊन देवीचे दर्शन घेतात आणि सुख, समृद्धी व कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना करतात. मंदिरात भक्ती, श्रद्धा आणि धार्मिक परंपरेचा सुंदर संगम पाहायला मिळतो.



## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतले श्री रूपाभवानीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर -**

सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी श्री रूपाभवानी मातेचे दर्शन घेऊन सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी सुखी होण्यासाठी प्रार्थना केली. दुष्काळमुक्ती, मुबलक पाऊस आणि भरपूर पाणी मिळावे, यासाठी त्यांनी मातेला साकडे घातले.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांचा श्री रूपा भवानी मातेची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मल्लिनाथ मसरे यांच्याशी चर्चा त्यांनी चर्चा केली.

बाळासाहेब मुस्तारे, मनीष मसरे, सारंग मसरे आणि प्रतीक मसारे उपस्थित होते.





## शेगाव येथे ललिता पंचमीनिमित्त कुंकुमार्चना

### श्री लायव्वा देवी नवरात्र महोत्सव मंडळाचा उपक्रम; मंदिरात धार्मिक विधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

शेगाव, ता. अक्कलकोट : ललिता पंचमीनिमित्त शेगाव येथील श्री लायव्वा देवी मंदिरात गुरुवारी कुंकुमार्चना कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

श्री लायव्वा देवी नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने झालेल्या या कार्यक्रमात देवीची विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली.

ललिता पंचमीच्या निमित्ताने मंदिरात कुंकुमार्चनेचा धार्मिक विधी पार पडला. यावेळी देवीला कुंकू अर्पण करून पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी भाविक मंदिरात उपस्थित होते. त्यांनी देवीचे दर्शन घेऊन पूजाविधीत सहभाग नोंदविला.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमामुळे मंदिर परिसरात धार्मिक वातावरण होते. श्री लायव्वा देवी नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने धार्मिक परंपरेनुसार कुंकुमार्चना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा आज सोलापूर दौरा

### शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर -**



भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण हे शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक आढावा बैठक होत आहे.

चव्हाण यांचे पहाटे ४ वाजता डोंबिवली येथील निवासस्थानाहून मोटारीने सोलापूरकडे प्रयाण होणार आहे. सकाळी ९ वाजता सोलापूर येथील हॉटेल बालाजी सरोवर प्रीमियर येथे आगमन व राखीव वेळ ठेवला आहे. सकाळी ९.३० वाजता हॉटेल बालाजी सरोवर प्रीमियर येथे पुणे विभाग शिक्षक व पदवीधर निवडणूक संदर्भात संघटनात्मक आढावा बैठक होणार आहे. बैठकीनंतर दुपारी १.३० वाजता मोटारीने सोलापूर विमानतळाकडे प्रयाण होणार असून, दुपारी १.४५ वाजता विमानतळावर आगमन होईल. दुपारी २ वाजता विशेष विमानाने मुंबईकडे प्रयाण होणार आहे.

दुपारी ३ वाजता मुंबई विमानतळावर आगमन होऊन मोटारीने डोंबिवली येथील निवासस्थानाकडे प्रयाण करण्याचे नियोजन आहे. शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दौऱ्याला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

## राज्यभरात एकाच वेळेस स्वामी नामस्मरण

### ललिता पंचमीनिमित्त उपक्रम; विश्वशांतीसाठी प्रार्थना

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ ऑक्टोबर -**

श्री स्वामी समर्थ महाराजांचा अक्कलकोट नगरीतील आगमन दिवस (ललिता पंचमी) मोठ्या भक्तीमय वातावरणात ओम श्री स्वामी समर्थ नामस्मरण लोकापूरे मंगल कार्यालय येथे करण्यात आले. विश्वशांती व मनशांती करिता अक्कलकोटहून संदेश देत राज्यभरामध्ये एकाच दिवशी एकाच वेळेस नामस्मरण झाले.

सकाळी ११ वाजता सोलापूर रोडवर श्री स्वामी समर्थ महाराजांचे पाण्याचा सडा मारून, रांगोळी काढून, पुष्प वाहून, आरती करत श्रीफळ अर्पण करून स्वामीनामाच्या गजरात स्वागत करण्यात आले. नजीकच्या खत दुकानात स्वामी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली. याप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र ढाकणे, दक्षिण पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक विनोद घुमे, बस आगाराचे व्यवस्थापक सत्यजित खताळ, संस्थापक अध्यक्ष सैदप्पा इंगळे, शेखर आडवीतोटे, अप्पू पराणे आदीसह मोठ्या संख्येने भक्तांनी स्वागत केले .

सायंकाळी पाच वाजता लोकापूरे मंगल कार्यालय येथे एकत्रित नामस्मरण सोहळा पार पडला. श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरचे चेअरमन महेश इंगळे, चोळाप्पा महाराजांचे वंशज अण्णू महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थापक अध्यक्ष सैदप्पा इंगळे यांच्या नियोजनुसार श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करत मंत्रोपचाराने महाराजांची आरती झाली. सायंकाळी ५:२५ वा नामस्मरणात सुरुवात झाली. प्रथम अकरा वेळा ओम श्री गुरुवे नमः जप घेऊन ओम श्री स्वामी समर्थ नामाचे दोन माळा नामजप केले. दुष्काळाबद्दल श्रींच्या चरणी प्रार्थना करण्यात आली. तारक मंत्राने या सोहळ्याची सांगता झाली . ४०० अधिक भक्तांनी सहभाग घेतला होता .

सोहळ्यासाठी सुखदा ग्रामोपाध्ये, कावेरी धरणे ,अश्विनी शिंपी ,मंगल भंडारे, सुवर्णा इंगळे, अनघा इंगळे, सुभाष तारापुरे, कुमार पतंगे, डॉ. मनोहर मोरे, प्रमोद लोकापुरे, शेखर आडवितोटे, राजू एकबोटे, श्रीपाद इंगळे, प्रसाद इंगळे, राहूल होटकर आदींनी परिश्रम घेतले



> **अमेरिकेतील टेक्सास येथेही सोहळा**
>
> अक्कलकोट, सोलापूर, बार्शी, सांगोला, मिरज, तासगाव, आराळा, हातकणंगले, कोल्हापूर, कारंबा, चांदेकरवाडी, गारगोटी, देवगड, वायनळी, रत्नागिरी, चिपळूण, मालवण, पनवेल, ठाणे, बोरिवली, मुंबई, पुणे, इंदापूर, वालचंदनगर, नाशिक, सिन्नर, धुळे, नांदेड, नागपूर, चंद्रपूर, जळगाव, औरंगाबाद आदींसह अमेरिकेतील टेक्सास येथेही हा सोहळा एकाच दिवशी एकाच वेळेस झाला.



## पहिली उचल साडेचार हजारांची द्या

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर -**

सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पहिली उचल प्रतिटन ४,५०० रुपये आणि अंतिम ऊसदर प्रतिटन ५,००० रुपये मिळावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. साखर कारखानदारांनी तातडीने दर जाहीर करावा, अन्यथा जिल्ह्यातील एकही साखर कारखाना सुरू करू देणार नाही, असा ठाम इशारा संघटनेने दिला आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आक्रमक पवित्रा घेत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना निवेदन दिले.ऊस उत्पादक शेतकरी दुष्काळ, वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणींनी आधीच त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत ऊस गाळप सुरू करण्याची घाई करणाऱ्या कारखानदारांनी दर जाहीर करण्याबाबत मात्र चुप्पी साधल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन साखर कारखानदार आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींची तातडीने बैठक आयोजित करावी व ऊसदरावर तोडगा काढावा, अशी मागणी निवेदनातून केली.

या वेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे, युवा जिल्हाध्यक्ष मोहसिन पटेल, इकबाल मुजावर, चिदानंद पाटील, धाराशिव जिल्हाध्यक्ष शहाजी सोमवंशी, अक्कलकोट तालुका युवक अध्यक्ष मलकारी उमदी, चन्नाप्पा बगले आदी उपस्थित होते.

> **जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने बैठक घ्यावी**
>
> जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने बैठक घेऊन ऊस दराचा प्रश्न मार्गी लावावा. अन्यथा जिल्ह्यातील एकही साखर कारखाना सुरू होऊ देणार नाही. हा शेतकऱ्यांच्या हक्काचा लढा असून, दर जाहीर होईपर्यंत आमचा संघर्ष थांबणार नाही.
>
> **- विजय रणदिवे, जिल्हाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना.**

## निधन वृत्त...

### लक्ष्मीबाई बगले



**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

भवानी पेठ परिसरातील बसवनगर येथील रहिवासी लक्ष्मीबाई बगले (वय ८५) यांचे शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. रुपाभवानी रोडवरील लिंगायत स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंतिमसंस्कार करण्यात आले.

### ज्ञानेश्वर सोळंकी



**पंढरपूर,दि.१६ ऑक्टोबर -**

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या आस्थापनेवरील कर्मचारी ज्ञानेश्वर सोळंकी यांचे शुक्रवारी (दि.१६) अल्पशा आजाराने निधन झाले. मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले असा परिवार आहे. ज्ञानेश्वर सोळंकी हे मागील २० वर्षांपासून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या आस्थापनेवर सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत होते.

### इंद्रजीत भोसले



**सांगोला, दि.१६ ऑक्टोबर-**

चिंचोली (ता.सांगोला) येथील इंद्रजीत भोसले (वय-८०) यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक विवाहित मुलगा, दोन विवाहित मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चिंचोली ग्रा. पं.सदस्य गोपाळ भोसले यांचे ते वडील होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





**स्वामी समर्थ प्रकटदिन देखावा...**
सोलापूर : शहरातील कस्तुरबा मार्केट परिसरातील श्री अंबिका नवरात्र महोत्सव व्यापारी मंडळ ट्रस्टच्या वतीने स्वामी समर्थ प्रकट दिन देखावा सादर करण्यात आला.



**सरस्वतीदेवीचे रुप...**
विव्हको प्रोसेस येथील महालक्ष्मी मंदिरात देवीला सरस्वतीदेवी रुपात सजवण्यात आले होते.



**हारे का सहारा...**
सोलापूर : शहरातील उत्तर कसबा परिसरातील टिळक रोड येथील नवशक्ती नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने खाटू श्याम बाबाची रहस्यमय कथा देखावा सादर करण्यात आला.

## महत्वाचे...

### ...या योजनांचा जनतेला काय फायदा झाला? खा.प्रणिती शिंदे यांचा सवाल

**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
दुहेरी जलवाहिनी, स्मार्ट सिटी आणि नगरोत्थान योजनांवर निधी खर्च होऊनही सोलापूरकरांना नियमित पाणी मिळत नसेल, तर या योजनांचा जनतेला काय फायदा झाला? असा सवाल खासदार प्रणिती शिंदे यांनी उपस्थित केला. दरम्यान, दररोज पाणीपुरवठ्याचे आश्वासन देणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी खर्च झालेल्या निधीचा हिशेब द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. दुहेरी जलवाहिनी योजनेमुळे सोलापूरकरांना दररोज पाणी मिळेल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आता नियमित पाणीपुरवठ्यासाठी पाण्याच्या टाक्या उभारण्याची गरज भासत असेल, तर यापूर्वीचे नियोजन नेमके काय होते? स्मार्ट सिटी, नगरोत्थान आणि दुहेरी जलवाहिनी यांसारख्या योजनांवर मोठा निधी खर्च होऊनही पाणीप्रश्न कायम असेल तर या कामांचा हिशेब जनतेसमोर मांडावा, असेही त्या म्हणाल्या. पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागत असताना पाण्याची मागणी करणाऱ्या नागरिकांवर गुन्हे दाखल करणे योग्य नाही. नागरिकांवर कारवाई करण्याऐवजी प्रशासनाने पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे आणि प्रत्येक भागाला पुरेसे पाणी मिळेल यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, असे आवाहनही खा.प्रणिती शिंदे यांनी केले.



### उसाला प्रतिटन ५ हजार १ रुपये दर द्या अन्यथा...

**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
गळीत हंगाम २०२६-२७ साठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ५ हजार १ रुपये दर द्यावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दक्षिण सोलापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष भीमाशंकर जमादार, तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्षा रेणुका बिराजदार यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. खते, कीटकनाशके, मजुरी, पाणी, वीज, ऊसतोडणी आणि वाहतूक खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे. कारखान्यांना साखरेच्या उत्पादनाबरोबरच मळी, बगॅस, प्रेसमड आणि इथेनॉल यांसारख्या उपपदार्थांतूनही उत्पन्न मिळते. त्यामुळे या उत्पन्नाचा आणि वाढलेल्या उत्पादन खर्चाचा विचार करून शेतकऱ्यांना प्रतिटन ५,००१ रुपये दर निश्चित करावा, असेही त्यांनी सांगितले. यावेळी राघवेंद्र बिराजदार, नागनाथ रामपुरे आदी उपस्थित होते.

### रात्री गार्डनमध्ये बोलत बसलेल्या दाम्पत्याला सर्पदंश

**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
रात्रीच्या सुमारास सोसायटीतील गार्डनमध्ये बोलत बसलेल्या एका दाम्पत्याला सर्पदंश झाल्याची घटना होटगी रोडवरील युनायटेड ग्रीन सोसायटीत गुरुवारी रात्री पावणे अकरा वाजता घडली. अश्फाक शमशोधन पटेल (वय-४७), शबाना अश्फाक पटेल (वय-३५, दोघेही रा.युनायटेड ग्रीन सोसायटी, सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत ते दोघे गुरुवारी रात्री सोसायटीतील गार्डनमध्ये बसले असताना त्यांच्या पायाला सापाने चावा घेतला. त्यांना उपचाराकरता शासकीय रुग्णालयात भाऊ असिफ याने दाखल केले.

# दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीसाठी करावा लागतोय अटींचा सामना

**मंत्री महोदय म्हणतात तातडीने द्या शुल्क**

**विद्यापीठाने मागविली माहिती**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**
सोलापूर जिल्ह्यातील सर्वच्या सर्व म्हणजे ११ तालुक्यात दुष्काळ जाहीर झाला असून या जिल्ह्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी अथवा परत मिळण्यासाठी अनेक अटीचा सामना करावा लागत आहे. या अटींच्या पुर्ततेसाठी विद्यार्थ्यांना शासकीय कार्यालयात हेलपाटे मारावे लागणार आहेत. यामुळे अनेक पात्र विद्यार्थ्यांनी शुल्क माफीकडे पाठ फिरविली आहे.





शुल्क माफीसाठी अथवा परत मिळण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने २७ आक्टोबरपर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव दाखल करण्यास सांगितले आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क तातडीने परत करावेत अशा सूचना सर्व विद्यापीठाना दिल्या आहेत. परंतु पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काची रक्कम अद्यापर्यंत तरी मिळाली नाही.

**पात्रतेसाठी या आहेत अटी :** शुल्क माफीसाठी विद्यार्थ्यांचा अर्ज, पालकाचा सद्यस्थितीत रहिवाशी असल्याचा दाखला अथवा ग्रामसेवकाचा दाखला, पालकाचे उत्पन्न ८ लाखाच्या आत असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र, तालुक्याचे रहिवाशी प्रमाणपत्र, परीक्षा शुल्क भरल्याची पावती.

**कोणता विद्यार्थी अपात्र :** अन्य योजनेतून परीक्षा शुल्क मिळणारे विद्यार्थी, रिपीटर व बहिस्थ विद्यार्थी, पालक शहरात, नोकरी अथवा धंदा करतात परंतु त्यांच्या नावे गावी शेतजमीन आहे.

**४५ हजार विद्यार्थी व ५.५ कोटी रुपये**

शासनास आर्थिक भार किती पडणार आहे. यासाठी १५ आक्टोबरपर्यंत आम्ही माहिती मागितली होती. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील ४५ हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सुमारे साडे पाच कोटीपेक्षा जास्त रक्कम मंजूर होणार आहे. यात कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यात शासनाकडून मिळणारे सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थीही आहेत, असे विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव यांनी सांगितले.

**कागदपत्रांच्या अटीमुळे अनेक पात्र विद्यार्थी वंचित**

प्रत्यक्षात पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ अथवा विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयाने फी शुल्क मिळण्यासाठीचे प्रस्ताव पाठविताना कोणतीही कागदपत्रे मागितली नसली तरी प्रस्ताव पाठविताना पात्र की अपात्र याची खात्री करुन विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पाठवावेत अशा सूचना आहेत. त्यामुळे सर्व महाविद्यालयांनी हे प्रस्ताव पाठविताना विद्यार्थ्यांना अर्जासह पात्रतेसाठी प्रमाणपत्रे देण्याच्या सूचना काढल्या आहेत. विद्यापीठात सुमारे ७० हजार विद्यार्थी आहेत. त्यामुळे अनेक पात्र विद्यार्थी शुल्क परत मिळण्यासाठी अथवा माफीसाठी अर्ज करू शकणार नाहीत, असे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.सचिन गायकवाड यांनी सांगितले.

## जिल्ह्यातील ७२ हजार १७० विद्यार्थी दहावीची तर ४९ हजार ६६२ विद्यार्थी देणार बारावीची परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**
फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या परीक्षेसाठी सोलापूर जिल्ह्यात दहावीचे ७२ हजार १७० विद्यार्थी प्रविष्ट होणार आहेत. यात ३८ हजार ७१७ मुले व ३३ हजार ४५३ मुलींचा समावेश आहे. बारावीच्या परीक्षेसाठी ४९ हजार ६६२ विद्यार्थी प्रविष्ट होणार आहेत. यात २५ हजार ९५१ मुले व २३ हजार ७११ मुलींचा समावेश आहे, अशी माहिती 'माध्यमिक'चे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.

राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या दहावी व बारावीच्या परीक्षांसाठी परीक्षा शुल्क माफ करण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांकडून पुढील आदेश होईपर्यंत परीक्षा शुल्क न घेता ऑनलाइन आवेदनपत्रे भरुन घेण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

पंढरपूर तालुक्यात सर्वाधिक ७ हजार ९५२ विद्यार्थी, माळशिरस ७ हजार ३५९, बार्शी ६ हजार ७५, सांगोला ५ हजार ७२८, माढा ५ हजार ५९७, उत्तर सोलापूर ५ हजार १५२, अक्कलकोट ४ हजार ७२२, मोहोळ ४ हजार ६०२, दक्षिण सोलापूर ४ हजार ३४३, मंगळवेढा ३ हजार ८२४ आणि करमाळा तालुक्यात ३ हजार ३५५ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट होणार आहेत. ग्रामीण भागातील दहावीच्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ५८ हजार ७०९ आहे.

बारावीच्या परीक्षेसाठी ग्रामीण भागात पंढरपूर तालुक्यात ६ हजार १५७, माळशिरस ४ हजार ९८२, बार्शी ४ हजार ७९१, सांगोला ४ हजार १५२, माढा ३ हजार ९१८, उत्तर सोलापूर २ हजार ७८८, मोहोळ २ हजार ७६४, मंगळवेढा २ हजार ५५३, दक्षिण सोलापूर २ हजार ५०८, अक्कलकोट २ हजार ४२३ आणि करमाळा तालुक्यात २ हजार ६१ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट होणार आहेत. ग्रामीण भागातील बारावीच्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३९ हजार ९७ आहे.

सोलापूर शहरातील यूआरसी-१ अंतर्गत दहावीचे ७ हजार ५८२ व बारावीचे ५ हजार ५८६ विद्यार्थी, तर यूआरसी-२ अंतर्गत दहावीचे ५ हजार ८७९ व बारावीचे ४ हजार ९७९ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट होणार आहेत, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# समर्थ सहकारी बँक निवडणूक; सहकार परिवार पॅनलतर्फे प्रचार फेरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
समर्थ सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने सहकार परिवार पॅनलच्या वतीने शुक्रवारी दत्त चौक ते मेकॅनिक चौक या मार्गावर प्रचार फेरी काढण्यात आली होती. पॅनल प्रमुख राम तडवळकर, राकेश टोळ्ये, केतन व्होरा यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली निघाली.

राकेश टोळ्ये याप्रसंगी बोलताना म्हणाले, समर्थ सहकारी बँक पुन्हा नावारुपाला आणण्यासाठी सहकार परिवर पॅनल कटिबद्ध आहे. या पॅनलच्या उमेदवाराच्या कपबशी या चिन्हावर मतदान करून भरघोस मताने विजयी करा. सभासदांनी, खातेदारांनी समर्थ सहकारी बँक वाचली पाहिजे. त्यासाठी आम्ही आवश्यक ते सहकार्य आपणास करु, अशी ग्वाही दिली.

या प्रचार फेरीत उमेदवार किरण करकमकर, डॉ.प्रशांत बागेवाडीकर, दिलीप दुलंगे, अमित कामतकर, युवराज माने, सुजाता इनामदार यांच्यासह समर्थ बँकेवर बिनविरोध निवडून आलेले प्रकाश बंडगर तसेच निशिकांत खेडकर, अरुण गोगी, दिलीप पेठे, नितीन कवठेकर, दत्ता कुलकर्णी, बजरंग कुलकर्णी, दूधगीकर, शिवानंद परगे, रुद्रेश बोरामणी, शशी थोरात, प्रभाकर पडळकर, विठ्ठल बडगंची, अजय कुलकर्णी, संपदा जोशी, सिंधू कोनापुरे, अमृता गोसावी आदी सामील झाले होते.

## समर्थ बँक निवडणुकीसाठी एकूण १२ मतदानकेंद्रे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
समर्थ सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते संध्याकाळी ४ यावेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यासाठी सोलापुरात ८ तर पुणे, ठाणे, पंढरपूर, कोल्हापुरात प्रत्येकी एक असे एकूण १२ मतदान केंद्रांवर तयारी करण्यात आली, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांनी दिली.



सर्वसाधारण मतदार संघातून एकूण १५ तर महिला राखीव गटातून ३ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. यापूर्वी ३ जागा बिनविरोध झाल्या आहेत. आता १५ जागांवर १८ उमेदवार मैदानात लढणार आहेत. मतदानादिवशी एक अधिकारी आणि दोन कर्मचाऱ्यांची मागणी करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्रावर दोन सशस्त्र पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## जिल्हा बँक निवडणुकीत २५४९ जणांची अंतिम यादी

**६५ मतदारांची नव्याने वाढ**

**पंढरपूर, सांगोल्यातील दूध संस्थाचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी २ हजार ५४९ मतदारांची मतदारांची अंतिम यादी बुधवारी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत ३२१ वैयक्तिक मतदार असून उर्वरित संस्था प्रतिनिधी मतदारांचा समावेश असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने दिली.

२ हजार ५४९ मतदारांची ही यादी पुणे विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक तसेच जिल्हा बँकेत प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रारुप मतदारयादीत २ हजार ४८५ मतदारांची नावे होती. या यादीतील नावावर हरकती दाखल झाल्या होत्या.

यावर झालेल्या सुनावणीनंतर अक्कलकोट तालुक्यातील एका पतसंस्थेच्या प्रतिनिधीचे नाव कमी करण्यात आले तर पंढरपूर तालुक्यातील ४० दूध संस्था प्रतिनिधींच्या नावांचा तर सांगोला तालुक्यातील २५ दूध संस्था प्रतिनिधींचा अशा एकूण ६५ नावांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे.

## रुपाभवानी मंदिरात महिला भाविकांची गर्दी





**सहाव्या माळेनिमित्त देवी मातेला सुकामेव्याची आकर्षक आरास**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
शारदीय नवरात्रोत्सवाच्या सहाव्या माळेनिमित्त शुक्रवारी सोलापूरची कुलस्वामिनी श्री रूपाभवानी मातेच्या दर्शनासाठी महिला भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळपासूनच मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. 'आई राजा उदे उदे' आणि 'सदानंदाचा उदे उदे'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

शुक्रवारी पहाटे देवीची काकड आरती झाली. त्यानंतर महापूजेला प्रारंभ झाला. सकाळी ९ वाजता देवीला पंचामृत, सुकामेवा आणि उसाच्या रसाचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर विशेष नित्योपचार पूजा करण्यात आली.सहाव्या माळेचे मुख्य आकर्षण म्हणजे देवी मातेला करण्यात आलेली विविध प्रकारच्या सुकामेव्याची आकर्षक आरास पुजारी मसरे परिवाराच्यावतीने ही आरास सजविण्यात आली होती.

देवीच्या दर्शनासाठी महिला भाविकांनी पहाटेपासूनच रांगा लावल्या होत्या. ओटी भरणे, पूजा-अर्चा करणे आणि देवीचे दर्शन घेण्यासाठी महिलांचा उत्साह दिसून आला. नवरात्रोत्सवामुळे मंदिर परिसरात दिवसभर धार्मिक आणि उत्सवी वातावरण होते. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन श्री रूपाभवानी मंदिर ट्रस्ट आणि प्रशासनाच्या वतीने दर्शन रांगांचे नियोजन करण्यात आले होते.

# जिल्ह्यातील १३९ गावांना १३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
सोलापूर जिल्ह्यात टंचाई निवारणार्थ १३९ गावे व ७५२ वाड्यांमधील २ लाख ६२ हजार ४४९ नागरिकांना व ९५ हजार ९३२ पशुधनाला १३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. ४० विहिरी व २१ बोअर असे एकूण ६१ जलस्रोत अधिग्रहित करण्यात आले आहेत, असे माहिती जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर यांनी दिली.

तालुकानिहाय गावे व टँकर्सची संख्या याप्रमाणे; मंगळवेढा-३७ गावे, ४० टँकर, सांगोला-२६ गावे, ३४ टँकर, अक्कलकोट-१५ गावे, ८ टँकर, माढा-१४ गावे, १६ टँकर,

### पाणीटंचाईचे संकट गडद

जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट गडद झाले असून १३९ गावे आणि ७५२ वाड्यांमधील २ लाख ६२ हजार ४४९ नागरिकांची तहान भागविण्यासाठी १३५ टँकर कार्यरत आहेत. ९५ हजार ९३२ पशुधनासाठी पाण्याची व्यवस्था करावी लागणार आहे. जिल्ह्यातील ४० विहिरी आणि २१ बोअरवेल असे एकूण ६१ जलस्रोत अधिग्रहित करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर यांनी दिली.

### दोन तालुक्यात निम्म्याहून अधिक टँकर्स तैनात

तालुकानिहाय परिस्थितीचा विचार करता मंगळवेढा आणि सांगोला तालुक्यांत पाणीटंचाईची तीव्रता अधिक आहे. मंगळवेढा तालुक्यातील ३७ गावांना ४० टँकर, तर सांगोला तालुक्यातील २६ गावांना ३४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. जिल्ह्यातील एकूण टँकरपैकी निम्म्याहून अधिक टँकर या भागांत तैनात आहेत. बार्शी-१३ गावे, ३ टँकर, करमाळा-१२ गावे, ९ टँकर, माळशिरस-१० गावे, १० टँकर, उत्तर सोलापूर-५ गावे, ७ टँकर, दक्षिण सोलापूर-५ गावे, ६ टँकर, मोहोळ-२ गावे, २ टँकर. पंढरपूर तालुक्यात एकही टँकर सुरू नाही.





## काँग्रेसकडून 'मत वाचवा, देश वाचवा'च्या घोषणा

**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
लोकशाहीचे रक्षण, मतदारांच्या मतदानाच्या अधिकारांचे संरक्षण आणि सर्वसामान्यांच्या मूलभूत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सोलापूर शहर काँग्रेसने रस्त्यावर उतरत भाजपविरोधात आक्रमक भूमिका घेतली. खा.प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या रॅलीद्वारे 'मत वाचवा, देश वाचवा' अशा घोषणा दिल्या.

या रॅलीत काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौरद्वय संजय हेमगड्डी, आरिफ शेख, सुशीला आबुटे, नगरसेवक प्रा.नरसिंह आसादे, ज्येष्ठ नेतेद्वय प्रा.अशोक निंबर्गी, बाबा मिस्त्री यांच्यासह राहुल वर्धा, श्रीशैल रणधीरे, जुबेर कुरेशी, गणेश डोंगरे, भीमाशंकर टेकाळे, सागर उबाळे, तिरुपती परकीपंडला, नागनाथ कदम, युवराज जाधव, रुपेश गायकवाड, विवेक खन्ना, वाहिद बिजापुरे, महेश लोंढे, सुभाष वाघमारे, ॲड.करीमुन्निसा बागवान, प्रा.भोजराज पवार, हारुन शेख, रमेश कैरमकोंडा, उदयशंकर चाकोते, देविदास गायकवाड, बाबुराव म्हेत्रे, दिनेश म्हेत्रे, शिवशंकर आंजनाळकर, परशुराम सतारेवाले, भरत जाधव आदी सामील झाले होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर | शनिवार, १७ ऑक्टोबर २०२६
▌dainiktarunbharat.com
▌epaper.dainiktarunbharat.com


दसरा, दिवाळीनिमित्त
यल्लम्मा 20% पर्यंत सूट
हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं.१ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो.9371289887
शाखा नं.२ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो.९३७२३५१८६०

## आज शहर-जिल्ह्यात

### * धार्मिक कार्यक्रम

उत्तर कसबा, भोगडे गल्ली येथील श्री कसबा देवी देवस्थान नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने देवीची त्रिपुरासुंदरी रुपात पूजा, कुंकूमार्चन, महिलांचा ओटीभरण कार्यक्रम. सायंकाळी ५ वाजता.

### * रुक्मिणी नवरात्री संगीत महोत्सव

**पंढरपूर :** श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने पं.राम विधाते, पं.बजरंग विधाते यांची अभंगवाणी, पं.शंकर विधाते यांचे शास्त्रीय गायन सायंकाळी ५.३० आणि रात्री ७.३० वाजता.

## सिमोल्लंघन मिरवणुकीच्या अनुषंगाने आज बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
हिंदू धर्म रुढीनुसार विजयादशमीच्या दिवशी सोलापूर शहरात गेल्या अनेक वर्षांपासून सिमोल्लंघन मिरवणूक काढण्यात येते. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक मध्यवर्ती नवरात्र मंडळाच्या वतीने शनिवार, दि.१७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता शिवानुभव मंगल कार्यालय येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

सध्याची दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेता, उत्सवात साधेपणा कसा जपता येईल? पारंपरिक वाद्यांचा योग्य वापर आणि संपूर्ण मिरवणूक शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात कशी पार पाडता येईल? यासंदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे. तरी विविध नवरात्रोत्सव मंडळांचे पदाधिकारी-कार्यकर्ते उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष विजय पुकाळे, सचिव दत्तात्रय मेनकुदळे यांनी केले.

# पंढरपूर कॉरिडॉर
# पहिल्या टप्प्यात १०० कोटींचा निधी वर्ग






### जागेच्या बदल्यात जागा, दुकानाच्या बदल्यात दुकान

बाधित नागरिक आणि व्यापाऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी प्रशासनाकडून जागेच्या बदल्यात जागा, दुकानाच्या बदल्यात दुकान तसेच नियमानुसार रोख भरपाई देण्याच्या पर्यायांवर चर्चा सुरु असल्याचे सांगण्यात आले.

## आठवडाभरात निघणार भूसंपादनाची अधिसूचना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ ऑक्टोबर-**
पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या पंढरपूर कॉरिडॉर या प्रकल्पासाठी राज्य शासनाने एकूण ४ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात १०० कोटींचा निधी सोलापूरचे जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आला. दरम्यान, येत्या आठवडाभरात भूसंपादनाची अधिसूचना निघणार असून आता या प्रकल्पाला गती मिळणार असल्याचे सांगण्यात येते.

पंढरपूर हे महाराष्ट्रातील प्रमुख असून तीर्थक्षेत्र श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री या चार प्रमुख यात्रांच्या काळात वाहतूक, दर्शन, निवास आणि आरोग्य व्यवस्थेवर मोठा ताण येतो. ही बाब लक्षात घेऊन उज्जैन, वाराणसीच्या धर्तीवर कॉरिडॉर आराखडा तया करण्यात आला आहे. या कॉरिडॉरसाठी सुमारे ६०० कोटी रुपये हे केवळ भूसंपादन आणि पुनर्वसनासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

चौफाळा ते महाद्वार घाट या मार्गाच्या दोन्ही बाजूला ६५ मीटर रुंदीकरण केले जाणार आहे. मंदिर परिसराकडे जाणारे २१ छोटे रस्तेही विकसित केले जाणार आहेत. रस्ते रुंदीकरणासह भाविकांसाठी आधुनिक सुविधा निर्माण करणे, गर्दीचे नियोजन करणे, मंदिर परिसरातील ऐतिहासिक व पुरातन वास्तूंचे जतन-संवर्धन करणे; ही त्याची मुख्य उद्दिष्टे आहेत. या कॉरिडॉरमुळे सुमारे ३०० हून अधिक नागरिक आणि ४५० व्यापारी बाधित होण्याची शक्यता आहे.

### अधिकाऱ्यांकडून कॉरिडॉर बाधितांना मिठाई

भूसंपादन करण्यासाठी ३० टक्के निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आला आहे. यामुळे कॉरिडॉर बाधित नागरिकांच्या घरी शासकीय अधिकारी मिठाई घेऊन जाणार आहेत, असे जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी पंढरपूर येथील पत्रकार परिषदेमध्ये केले होते.

### वायफळ चर्चांना मिळाला पूर्णविराम

राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे या प्रकल्पाला निधी मिळणार नाही, कॉरिडॉरचे काम लांबणीवर पडेल किंवा प्रकल्प रद्द होईल, अशा चर्चा सुरु होत्या. मात्र, निधी वर्ग झाल्याने वायफळ चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

## आजचा कलर करडा



वेदा अबोली पंकज साखरे

## नवरात्रोत्सवाला आले सामाजिक स्वरुप



पूर्वीचे नवरात्र कौटुंबिक भक्ती आणि घरातील विधींपुरते मर्यादित होते. मात्र, आज या सणाला व्यापक सामाजिक स्वरुप प्राप्त झाले आहे. यानिमित्ताने महिलांच्या कलागुण, वक्तृत्व आणि नेतृत्वाला वाव देणारे मोठे व्यासपीठ बनला आहे, असे प्रतिपादन श्रीकृष्ण शैक्षणिक व उद्योग समूहाच्या सचिवा स्वाती हनुमंत निकम यांनी सांगितले.

सक्षमीकरण म्हणजे केवळ स्वावलंबी होणे नव्हे तर स्वतःचे विचार ठामपणे मंडण्याचे स्वातंत्र्य, निर्णयप्रक्रियेतील सक्रिय सहभाग आणि समाजात आत्मसन्मानाने जगण्याचा आत्मविश्वास होय. एक सुशिक्षित स्त्री संपूर्ण कुटुंबाचा आणि समाजाचा कायापालट करु शकते, असा त्यांना ठाम विश्वास आहे.



संकलन
प्रभाकर क्षीरसागर

महिलांचे दैनंदिन प्रश्न आणि आव्हाने संवेदनशीलतेने सोडवण्यासाठी राजकीय क्षेत्रात महिला प्रतिनिधींची आवश्यकता आहे. कौशल्य विकास, स्थानिक रोजगार, आरोग्य आणि सुरक्षिततेवर अधिक भर दिला पाहिजे. श्रीकृष्ण समूहाच्या माध्यमातून महिलांना दर्जेदार शिक्षण आणि स्वयंरोजगार देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असे त्या सांगतात.प्रत्येक महिलांमध्ये एका दुर्गेचे रुप असते. शिक्षण, कौशल्य आणि कर्तृत्वाच्या बळावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा. कारण जेव्हा स्त्री पुढे जाते, तेव्हाच संपूर्ण समाज प्रगती करतो, असेही त्या सांगतात.

केवळ शहरातच नव्हे, तर ग्रामीण भागातील प्रत्येक भगिनीपर्यंत शिक्षण आणि रोजगाराच्या संधी पोहोचल्या पाहिजेत. जेव्हा प्रत्येक स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल आणि स्वतःचे निर्णय स्वतः घेईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने एक बलशाली, सुजाण आणि प्रगतीशील समाज निर्माण होऊ शकेल.



## वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाच्या वतीने भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
भारतरत्न तथा माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिन म्हणून साजरा केला जातो. यादिवशी सोलापूर शहर वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाच्या वतीने डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्याकामी बालपणी वृत्तपत्र विक्री करायचे. वृत्तपत्र विक्रेता ते राष्ट्रपती पदापर्यंतचा त्यांचा प्रवास अनेकांच्या दृष्टीने प्रेरणादायी असा आहे.

ऊन, वारा, पाऊस किंवा कडाक्याची थंडी अशा कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत वृत्तपत्र विक्रेते दररोज भल्या पहाटे उठून घराघरांमध्ये वृत्तपत्र पोहोचविण्याचे काम करतात, असे यावेळी सांगण्यात आले.

सोलापूर शहरातील दत्त चौक येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अंबादास दुस्सा, श्रीनिवास कस्सा, श्रीनिवास बोगा, शशिकांत जंगम, सुनील साका, श्रीकांत कांती, राहुल बारटक्के, अशोक संत, देविदास मिठ्ठा, चंद्रशेखर वंगारी, प्रभाकर भंडारी, अनिल सोमा, अंबादास कोंडा, रमाकांत पामुल, प्रभाकर बिज्जरगी,नरेश दोंता, गोपाळ दोंता, अंबादास रविंद्र गवळी, गणेश हारके, विजय कामुर्ती, चंद्रशेखर येमुल, बोडा, दशरथ मोने, अशोक बुरा, गेनसिध्द दुर्वेकर, गोपाळ राऊळ, व्यंकटेश दुस्सा, चंद्रकांत शेरला, सुधीर जाधव, अशोक गुमास्ते, संतोष रायचुरकर, विजय गड्डम, महेश साबळे आदी उपस्थित होते.



गणेश पेठेतील श्रीहिंगुलांबिका देवालयात देवीस धनलक्ष्मी रुपदर्शन करण्यात आला होता.



तामलवाडी येथील कटारे परिवारच्या श्रीमहालक्ष्मी मंदिरात देवीला श्री विद्या सरस्वतीचे रुप देण्यात आले होते.

## रुग्णसेवेचे व्रत ते संभव फाउंडेशन

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते, ही म्हण राणी अतीश शिरसट यांच्या बाबतीत केवळ पाठिंब्यापुरती मर्यादित नसून खांद्याला खांदा लावून संघर्षाला दिशा देणारी ठरली आहे. मूळच्या सोलापूरच्या असलेल्या राणीताईंनी बारावीनंतर नर्सिंग कोर्स पूर्ण केला. रुग्णांची वेदना समजून घेत त्यांनी एका खासगी हॉस्पिटलमधून रुग्णसेवेचे व्रत स्वीकारले. याच काळात त्यांची भेट रस्त्यावरील बेवारस मनोरुग्णांसाठी धडपडणाऱ्या अतीश लक्ष्मण शिरसट यांच्याशी झाली. या भेटीचे रुपांतर पुढे विवाहबंधनात झाले. हा संसार केवळ वैयक्तिक सुखाचा नव्हता, तर माणुसकीच्या एका मोठ्या ध्येयाचा सहप्रवास ठरला.



२०१६ मध्ये सुरु झालेल्या या सेवाप्रवासातून पुढे सोलापूरमध्ये संभव फाउंडेशनची अधिकृत स्थापना झाली. रस्त्यावरील अत्यंत अस्वच्छ आणि दयनीय अवस्थेतील मनोरुग्णांना जवळ करणे, त्यांना स्वच्छ करुन अन्न, औषधोपचार आणि मानसिक आधार देणे ही कठीण जबाबदारी राणीताईंनी संयमाने स्वीकारली. या समर्पित कार्याच्या जोरावर त्यांनी आजवर ३०० हून अधिक बेवारस मनोरुग्णांचे कौटुंबिक पुनर्वसन झाले असून, १००० हून अधिक लोकांना अन्न व औषधोपचार मिळाले आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, बिहार अशा अनेक राज्यांतील हरवलेल्या व्यक्तींना त्यांनी त्यांच्या कुटुंबापर्यंत पोहोचवले आहे. संभव अन्नपूर्णा योजना आणि वंचित महिलांसाठीच्या एक दिवा समतेचा या उपक्रमातही त्यांचा सक्रिय सहभाग आहे. प्रसिध्दीच्या झगमगाटापासून दूर राहून, संभव फाउंडेशनच्या सचिवा म्हणून शांतपणे काम करणाऱ्या राणीताई ह्या शेकडो उपेक्षितांच्या आयुष्यातील मायेचा आधार बनल्या आहेत.



नारी तू नारायणी
आरती कुसेकर

## संस्कार विधीद्वारे संस्कृतीची पेरणी

डॉ. अपर्णा कल्याणी ह्या सोलापूरच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील एक प्रतिष्ठित नाव आहे. गेल्या २९ वर्षांपासून त्या ज्ञान प्रबोधिनीच्या सोलापूर केंद्रातून पौरोहित्याचे कार्य करत आहेत. एकूण ६० प्रकारच्या संस्कार विधींमधून लोकांमध्ये जीवनमूल्ये आणि संस्कृतीची पेरणी करण्याचे काम करतात.

सोलापूरसह महाराष्ट्रच नव्हे चेन्नई, बडोदा, गोवा, बंगळुरु, हैद्राबाद यांसारख्या विविध राज्यात त्यांनी पौरोहित्याची शिबीरे घेतली. कोव्हिड काळापासून त्यांनी ऑनलाईन वर्गही सुरु केले. या वर्गांना दुबई, कतार, अमेरिका, मसकद आणि सिंगापूरमधूनही मोठा प्रतिसाद मिळत आहे.



या वर्गांमधून त्या श्रीसूक्त, रुद्र, दुर्गासप्तशती, ललित सहस्त्रनाम तसेच शुध्दलेखन व शुध्द उच्चारांचे धडे देतात. त्यांच्या या प्रवासाची सुरुवात एका छोट्या जाहिरातीमुळे झाली. मुलगा अवघा ६ महिन्यांचा असताना, त्यांनी दैनिक 'सोलापूर तरुण भारत'मधील जाहिरात पाहून ज्ञान प्रबोधिनीची तीन दिवसांची कार्यशाळा केली. तिथे त्यांच्यातील सुस्पष्ट उच्चार, उत्तम आवाज आणि लेखनशैली ओळखून डॉ.स्वर्णलता भिशीकर आणि डॉ.अण्णा ताम्हणकर यांनी त्यांना ज्ञान प्रबोधिनीच्या पौरोहित्य विभागात सामील करुन घेतले.

एम.ए., पीएच.डी. पर्यंत शिक्षण घेतलेल्या अपर्णाताईंनी, दत्तअवतारी संतश्रेष्ठ श्रीमाणिक प्रभू यांच्या साहित्यावर आधारित 'सकळमत संप्रदाय: साहित्य व तत्वज्ञान' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला आहे. अपर्णाताई उत्तम लेखिकाही आहेत. त्यांनी ५०० पानांचा श्री दुर्गा सप्तशती ग्रंथ तयार केला असून, यात संस्कृत पोथीचा पदच्छेद, अर्थ आणि देवीच्या ५० स्तोत्रांचा समावेश आहे. या ग्रंथाच्या तीन आवृत्त्या प्रकाशित झाल्या असून चौथी आवृत्ती प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

बालपणी सोलापुरातील देवी मंदिरांमध्ये घागरी फुंकणे आणि भोंडला खेळत नवरात्र अनुभवणाऱ्या अपर्णाताई आज खऱ्या अर्थाने समाजाला संस्कारित करत आहेत. त्यांचा मुलगा वकील तर सून मानसोपचार तज्ज्ञ म्हणून कार्यरत आहे. अपर्णाताई ह्या सोलापुरातील पाच संस्थांच्या विश्वस्त असून अनेक प्रतिष्ठित पुरस्कारही त्यांना मिळाले आहेत.

डॉ.अपर्णाताई कल्याणी ह्या सन २०१२ पासून विजापूर रोड येथील श्रीकृष्णांबिका मंदिराच्या ट्रस्टी म्हणून कार्यरत आहेत. या मंदिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याचे संपूर्ण व्यवस्थापन केवळ महिलाच सांभाळतात आणि धार्मिक कार्यातही फक्त महिलांनाच सहभागी करुन घेतले जाते. मंदिरात दररोज विधिवत पूजा, भजनी मंडळ, कुमारी पूजन आणि श्रीसूक्त हवन यांसारखे धार्मिक कार्यक्रम महिलांच्या पुढाकाराने पार पडतात.

## कौटुंबिक पाठबळ; ग्रामविकासाचा ध्यास

स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना एमएसी ॲग्री शिक्षण पूर्ण केलेल्या मयुरी निंगफोडे-पाटील यांना उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी गावी ग्रामविकास अधिकारी म्हणून काम करण्याची सुवर्णसंधी मिळाली. सुरुवातीपासूनच समाजसेवा आणि ग्राम विकासाची आवड असल्याने, त्यांनी या पदाला केवळ नोकरी न समजता समाजसेवा करण्याची संधी मानले. या जबाबदारीच्या पदावर काम करताना ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या त्यांना जवळून अनुभवता आल्या. अफाट लोकसंपर्क आणि कामाची आवड यामुळे त्यांनी या पदाला सन्मान मिळवून दिला. मात्र त्यांच्या मागे असलेला कुटुंबाचा खंबीर पाठिंबा अन् पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांचे सहकार्य हीच त्यांच्या कामाची खरी ताकद असल्याचे सांगतात.



महिला सक्षमीकरण प्रत्येक क्षेत्रात होणं गरजेचं आहे यासाठी त्यांनी महिलांना प्रोत्साहन देत विविध उपक्रम राबविले. पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि गावाच्या सुरक्षेला त्यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले. रस्त्यांवर पथदिव्यांची सोय आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी बचतगटांना प्रोत्साहन देऊन लघुउद्योग, कौशल्य विकास आणि शासकीय आर्थिक योजनांची माहिती थेट महिलांपर्यंत पोहोचवली.

महिलांचा ग्रामसभा, महिला सभा आणि विशेष बैठकांमध्ये सक्रिय सहभाग वाढवून, गावच्या विकासात्मक निर्णय प्रक्रियेत त्यांचे स्थान निश्चित केले. महिलांनी शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, स्वतःचे कायदेशीर हक्क, आरोग्य आणि डिजिटल साक्षरतेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. राजमाता जिजाऊ, महाराणी ताराराणी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, सिंधुताई सपकाळ, गानकोकिळा लतादिदी या महान व्यक्तींचा त्यांच्या संघर्षाचा, त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आइ-वडिलांचे संस्कार व पतीराजांचे पाठबळ घेऊन मी ग्रामविकास अधिकारी पदावर काम करीत असल्याचे त्या अभिमानाने सांगतात.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### बार्शीत वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा

**बार्शी, दि.१६ ऑक्टोबर -**
बार्शी शहर व तालुका वृत्तपत्र विक्रेता संघटना बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी शहरात डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांनी मिठाई वाटप केली. ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते शिवाजी वैकुंठे व नागनाथ कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन शाम थोरात यांनी केले. आभार अध्यक्ष सचिन बाबर यांनी मानले. यावेळी जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटना सचिव सचिन बाबर, श्याम थोरात, बाबा जाधव, अक्षय खरात, तोहर काजी, सादिक शेख, शाहिद शेख, बंडू नागटिळक, शिवाजी वैकुंठे, माथेकर, सचिन शेटे, सोमनाथ गाढवे, सचिन साबळे, शरद काकडे, सिद्धेश्वर माळवदे, नागनाथ कांबळे, ज्योतीराम बारुंगुळे आदी उपस्थित होते.




### सासवड माळी शुगर फॅक्टरीचा गाळप हंगाम प्रारंभ

**माळीनगर, दि. १६ ऑक्टोबर -**
येथील दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लिमिटेड या साखर कारखान्याच्या ९३ व्या गळीत हंगामाचा आरंभ कारखान्याचे नूतन चेअरमन मोहनराव लांडे यांच्या हस्ते बॉयलरमध्ये अग्नी देऊन करण्यात आला. प्रारंभी बॉयलर होम हवन पूजा प्रविण बोरावके व पत्नी अनिता यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर गणेश इनामके, पूर्ण वेळ संचालक निखिल कुदळे, व्हाईस चेअरमन विशाल जाधव, संचालक निळकंठ भोंगळे, राहुल गिरमे, इंडिपेंडंट डायरेक्टर मुरलीधर राऊत, कारखान्याचे वर्क्स मॅनेजर सुरेश जगताप, चीफ केमिस्ट संतोष पांढरे, इलेक्ट्रिक इंजिनिअर अनिल जाधव, शेतकी अधिकारी रोहित जावळे, जनसंपर्क अधिकारी अनिल बनकर, परचेस अधिकारी सचिन टिळेकर, डिस्टलरी इन्चार्ज अविनाश गायकवाड, सिव्हिल इंजिनिअर महेश शिंदे, सिक्युरिटी ऑफिसर शब्बीर शेख आदी उपस्थित होते.



### नवीन मराठी शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा

**बार्शी, दि.१६ ऑक्टोबर -**
माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी नवीन मराठी शाळा, बार्शी येथे वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. वक्ते अमोल कुलकर्णी यांचे 'पुस्तक वाचन व वाचनाने होणारी प्रगती' या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाला इयत्ता तिसरी ते सातवीतील विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली. यावेळी अमोल कुलकर्णी यांनी विविध उदाहरणे व दाखल्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले. ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश्वर खुने यांनी वाचनाविषयी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश नायकुडे यांनी, तर आभारप्रदर्शन कुलदीप काकडे यांनी केले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विनायक देशपांडे, मुख्याध्यापक तुकाराम आगवणे यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते.



### मंगळवेढ्यात नोटीस न देता रेशन बंद केल्याचा आरोप

**मंगळवेढा, दि. १६ ऑक्टोबर -**
तालुक्यात दुष्काळाचे गंभीर संकट असताना जवळजवळ अडीच हजार नागरिकांचे रेशन बंद झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेसतर्फे केला आहे. शासनाच्या पुरवठा विभागाकडून पूर्व सूचना न देता रेशन बंद केल्याचेही म्हटले आहे. काँग्रेस व रेशन कार्डधारक शेतकऱ्यांच्या वतीने तालुका पुरवठा अधिकारी नवनाथ चव्हाण यांना याबाबत निवेदन देण्यात आले. राज्यात रेशन लाभार्थ्यांसाठी ई-केवायसी अनिवार्य केले असून, ती पूर्ण न झाल्यास रेशनचे धान्य बंद होण्याची शक्यता असल्याचे पुरवठा विभागाचे निर्देश आहेत. तथापि, बाधित नागरिकांना यापूर्वी योग्य सूचना देण्यात आली नाही, अशी तक्रार निवेदनात केली आहे. यावेळी रविकिरण कोळेकर, संदीप पवार, शाहरुख बेग, पांडुरंग मासाळ, गोविंद गडगे, बिरा बिराजदार, सचिन घोडके, चांगदेव डोके, ईश्वर तोडर आदी उपस्थित होते.

# नुसता आढावाच नको; प्रत्यक्ष कृती करा

**सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांचे निर्देश; दक्षिणची दुष्काळ निवारण आढावा बैठक**

**चारा बियाणे, मुरघास खरेदी, टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर -**
जिल्ह्यात दुष्काळ आणि पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना केवळ आढावा बैठका घेऊन चालणार नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून शेतकरी आणि पशुधनाला दिलासा देण्याची गरज आहे, अशी सूचना जिल्हा परिषद कृषी व समाजकल्याण समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी प्रशासनाला दिली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील टंचाई व दुष्काळाच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी नुकतीच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्यालयात बैठक घेण्यात आली. यावेळी तातडीच्या उपाययोजना राबविण्यावर भर दिला. यावेळी चिवडशेट्टी आक्रमक झाले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे सभापती संदीप टेळे, जिल्हा परिषद सदस्य सोनाली कडते, श्रुती भोरगुंडे, सविता उंबरजे, पंचायत समिती सदस्य, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ आणि गटविकास अधिकारी मनोज राऊत उपस्थित होते.

चारा निर्मितीसाठी बियाण्यांचा पुरवठा तातडीने करावा, मुरघास खरेदीची प्रक्रिया गतीने पूर्ण करा आणि पाणीटंचाईग्रस्त भागात टँकर सुरू करा, असे चिवडशेट्टी म्हणाले. उपलब्ध पाण्याचा वापर चारा पिकांसाठी करण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याचे निर्देशही कृषी विभागाला दिले.

**ऊसतोडीचा पर्याय अव्यवहार्य**

बैठकीत काही पंचायत समिती सदस्यांनी साखर कारखाने बंद करून उपलब्ध ऊस जनावरांसाठी चारा म्हणून वापरण्याची मागणी केली. मात्र, ही मागणी व्यावहारिक नसल्याचे चिवडशेट्टी यांनी स्पष्ट केले. पाणीटंचाईमुळे ऊस जळून गेल्यास त्याचा चारा म्हणून उपयोग होणार नाही. शिवाय, ऊस उत्पादकांचे व साखर कारखानदारीवर अवलंबून असलेल्या मजुरांनाही आर्थिक अडचणी येतील, असे त्यांनी सांगितले.

**फळबागांसह ऊस शेतीचेही पंचनामे करण्याची मागणी**

पालकमंत्र्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांकडे फळबागांसह ऊसशेतीच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी करणार आहे. नुकसानग्रस्त शेतकरी पंचनामे आणि नुकसानभरपाईच्या प्रक्रियेपासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने कार्यवाही करावी, असे सांगितले.



# अवैध दारु विक्रीवर कारवाई

**२१ हजारांचा मुद्देमाल जप्त, एकजण ताब्यात**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ ऑक्टोबर -**
बार्शी शहर पोलीस ठाणे येथील पोकाँ अजीज शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, गुरुवारी रात्री ११ वा. चे सुमारास रिंगरोड येथील श्री गणेश पानपट्टीच्या आडोश्याला, आरोपी अभय सरकाळे, वय ३०, रा. झाडबुके मैदान, बार्शी हा विना परवाना बेकायदेशीररित्या देशी-विदेशी दारूची विक्री करताना मिळून आल्याने त्याचे विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा द१खल केला आहे.

जप्त केलेला मुद्देमाल- रुपये २१,०००/- त्यामध्ये हायवर्डस बिअरच्या २४ बाटल्या रु. ३७४०/-, हायवर्डस बिअर ५०० मिलीच्या ६० बाटल्या रु. ७५००/-, किंगफिशर बिअरच्या बाटल्या ४८००/-, रॉयल स्टॅग व्हिस्कीच्या ३८ बाटल्या र. २८५०/-, रॉयल स्टॅग व्हिस्कीच्या ७ बाटल्या रु. १०५०/-, टॅंगो पंच देशी दारु ८० बाटल्या रु. ३२००/-, ढोकी संत्रा देशीच्या २४ बाटल्या रु. २४८०/-, टॅंगो पंचच्या ७ बाटल्या रु. ५६०/-, ढोकी संत्राच्या ४ बाटल्या रु ३२०/- असा एकूण २१,१००/- रुपयांचा देशी-विदेशी दारूचा साठा जप्त केला.

सदरची कारवाई अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, विजय कबाडे, अपर पोलीस अधीक्षक, सुहास जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी, बार्शी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश कुंभार, स.पो.फौ. वरपे, पो.ना. जाधव, पो.काँ, पो.काँ शेख, पो.काँ बोंदरम यांनी केली. गुन्ह्याचा तपास पो.ना. जाधव हे करीत आहेत.

# विद्यार्थ्यांसह युवा वर्गाला व्यसनमुक्त करण्याचा संकल्प

**जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ ऑक्टोबर -**
ड्रग आणि सायबर क्राईम याविरुद्ध मोहीम उघडली असून विद्यार्थ्यांसह युवा वर्गाला व्यसनमुक्त करण्याचा संकल्प असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली.

पत्रकार परिषदेत जिल्हा पोलीस अधीक्षक कुलकर्णी बोलत होते. अक्कलकोट तालुक्यात आळगी गावात एक कोटीहून अधिकचा गांजा पकडला ही बाब अभिनंदनीय कामगिरी केल्याचे सांगत पोलीस उपविभागीय अधिकारी राजेंद्र टाकणे आणि पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांचे त्यांनी कौतुक केले. यामधील तिन्ही आरोपींना अटक केली आहे. तालुक्याच्या उत्तर आणि दक्षिण भागांमध्ये कायदा आणि सुव्यवस्था अतिशय उत्तम प्रकारे ठेवली आहे. कोणी कायदा सुव्यवस्था बिघडवत असेल आणि ड्रग सायबर यासंदर्भात गुन्हे करत असतील तर त्यांची माहिती त्वरित पोलिसांना कळवली जावी, असे आवाहनही पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी केले.

पत्रकार परिषदेला पोलीस उपविभागीय अधिकारी राजेंद्र टाकणे, दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे, उत्तर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अविनाश पवार, वळसंग विभागाचे पोलीस अधिकारी राहुल डोंगरे यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल माने, प्रशांत बधे, मिठापल्ली, कुंभार, गोपनीय शाखेचे गजानन शिंदे, केदारनाथ सुतार उपस्थित होते.

# कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्या

**माजी आमदार संजयमामा शिंदे यांची उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१६ ऑक्टोबर -**
करमाळा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासह शेतीसाठी पाणी व सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन केली.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ या योजनांमधील जाचक अटी व तांत्रिक त्रुटींमुळे अनेक पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत. तिन्ही योजनांतील पात्र लाभार्थ्यांच्या अडचणींचा पुनर्विचार करून, त्यांना कर्जमुक्तीचा लाभ द्यावा, अशी मागणी शिंदे यांनी केली.



करमाळा तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या दहिगाव सिंचन योजनेचे रब्बी आवर्तन तातडीने सोडावे, कुकडी प्रकल्पातून करमाळा तालुक्यासाठी विशेष आवर्तन मंजूर करून ते तातडीने सोडण्यात यावे, अशी मागणी केली.

# बळेवाडी येथे नवदुर्गांचा झाला सन्मान

**विविध क्षेत्रांतील ९ कर्तबगार महिलांचा गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १६ ऑक्टोबर -**
श्री स्वामी समर्थ मंदिर, बळेवाडी (ता. बार्शी) येथे नवरात्र महोत्सव आणि आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी दिनाचे औचित्य साधून 'नवदुर्गा शक्ती सन्मान सोहळा अत्यंत दिमाखदार वातावरणात पार पडला.

निवृत्त पोलीस उपविभागीय अधिकारी नानासाहेब कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा विशेष कार्यक्रम झाला. या प्रसंगी एकता महिला मंचच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची व परिसरातील मान्यवरांची आवर्जून उपस्थिती होती.

**९ कर्तबगार 'नवदुर्गांचा' स्वाती डोईफोडे यांच्या हस्ते गौरव**

सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक आणि शेती क्षेत्रात आपल्या अतुलनीय कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या एकता महिला मंचच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह ग्रामीण भागातील



९ महिलांना या सोहळ्यात 'नवदुर्गा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बार्शी तालुका पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस पोलिस अंमलदार स्वाती डोईफोडे यांच्या शुभहस्ते या सर्व नवदुर्गांना सन्मानित करण्यात आले.

**सन्मानित नवदुर्गा :**
लक्ष्मी सुतार (प्रमुख पदाधिकारी, एकता महिला मंच), गीतांजली जोशी (प्रमुख पदाधिकारी, एकता महिला मंच), रंजना गवळी (प्रमुख पदाधिकारी, एकता महिला मंच), राजश्री बानगुडे (प्रमुख पदाधिकारी, एकता महिला मंच), लक्ष्मी मोरे (प्रमुख पदाधिकारी, एकता महिला मंच), मिनाक्षी यादव (ग्रामीण शेतकरी महिला), डॉ. शितल कागदे, सुषमा काळदाते, संध्या चवरे व सुगंधा आगवणे

आयोजक नानासाहेब कदम यांनी ग्रामीण भागातील महिलांचे विविध क्षेत्रांतील कार्य कौतुकास्पद आहे. नवरात्र महोत्सव व आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी दिनाचे औचित्य साधून त्यांच्या या कार्याचा सन्मान व्हावा, याच उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन केल्याचे सांगितले. बार्शी तालुक्यातून व बळेवाडी परिसरातून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# पशुधनासाठी पाण्याच्या टँकरची संख्या वाढवा

**आमदार आवताडे; पालकमंत्र्यांकडून तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१६ ऑक्टोबर-**
पंढरपूर-मंगळवेढातील पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जनावरांसाठी पाण्याचे टँकरची संख्या वाढवून पुरेसा पाणीपुरवठा करावा, अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी पालकमंत्री गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्यावर पालकमंत्र्यांनी संबंधित विभागाला तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

शासनाच्या सध्याच्या निकषांनुसार मोठ्या देशी जनावरांसाठी दररोज ३५ ते ४० लिटर, तर लहान जनावरांसाठी १० ते १५ लिटर पाणी गृहीत धरले जाते. संकरित गाईसाठी दररोज १०० ते ११० लिटर, तर लहान संकरित गाईसाठी ३५ ते ४० लिटर



पाणी आवश्यक असते. मात्र, सध्याच्या निकषांनुसार मंजूर होणारे पाणी अपुरे पडत असल्याचे आमदार आवताडे यांनी निवेदनात निदर्शनास आणून दिले आहे. दुष्काळाच्या काळात पशुधनाचे संरक्षण होण्याबरोबरच पशुपालकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी हा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

### घरासमोर बांधलेली म्हैस रात्रीतून चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
राहत्या घरासमोरील गोठ्यात बांधलेली एक लाख १० हजार रूपये किंमतीची म्हैस अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही चोरी ९ ऑक्टोबर रोजी रात्री ११ ते १० ऑक्टोबर रोजी पहाटे ५.३० वाजण्याच्या दरम्यान सिद्धरामेश्वर नगरातील झाली. दरम्यान या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी बाबुराव लवटे (वय ४२ रा. सिद्धरामेश्वर नगर, सोलापूर) यांचा म्हशी पालनाचा व्यवसाय आहे. ते घराबाहेर म्हशी बांधून ठेवतात. ९ ऑक्टोबर रोजी सर्वजण घरात झोपी गेले असता चोरट्यांनी गोठ्यात जावून म्हैस बाहेर आणली. तिला मोठ्या टेम्पोमध्ये घालून चोरून नेली. सकाळी बाबुराव व त्यांचे कुटुंबिया बाहेर आले असता, त्यांना म्हैस चोरी गेल्याचे लक्षात आले. त्यांनी पोलिसात फिर्याद दिली. म्हैस चोरीची तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी शेजारी असलेल्या घरावरील सीसीटीव्ही कॅमेरा तपासला त्यात त्याच परिसरातील तरूणांनी म्हैस चोरून नेतानाचा व्हिडीओ दिसून आला. संबंधित तरूणांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून म्हैस व टेम्पो ताब्यात घेतला. म्हैस फिर्यादीकडे सपुर्द केली आहे.

# मतमोजणी अचूक पार पाडा : तेली-उगले

**पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणी प्रक्रियेबाबत प्रशिक्षण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर-**
विधान परिषदेसाठी होणाऱ्या पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी, असे निर्देश विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिले.

पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने अल्पबचत भवन सभागृहात मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण झाले. यावेळी त्या बोलत होत्या. प्रशिक्षणास सहआयुक्त संजय पलांडे, महाऊर्जाचे अतिरिक्त महासंचालक अरुण आनंदकर



यांच्यासह विभागातील तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मतमोजणीची प्रक्रिया वेळबद्ध असली, तरी घाई करून चुका करण्यापेक्षा प्रत्येक टप्पा नियमानुसार पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही एका कर्मचाऱ्याच्या चुकीमुळे संपूर्ण पथकाचे श्रम आणि वेळ वाया जाऊ शकतो. त्यामुळे सर्वांनी एकजुटीने आणि जबाबदारीच्या जाणीवेतून काम करावे.

मतमोजणी प्रक्रियेत टेबलवरील पर्यवेक्षक, सहाय्यक, संबंधित अधिकारी आणि माहिती संकलन करणाऱ्या पथकांमध्ये समन्वय ठेवावा, मतमोजणीच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यक पडताळणी करावी, नोंदी व्यवस्थित ठेवाव्यात आणि संबंधित मतमोजणी प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या घेण्याची दक्षता घ्यावी, असे विभागीय आयुक्तांनी सांगितले.

सह आयुक्त पलांडे यांनी प्रशिक्षणादरम्यान मतमोजणी प्रक्रियेचे विविध टप्पे, कामानुसार जबाबदाऱ्यांची विभागणी, नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये, वैध व अवैध मतपत्रिकांबाबतच्या तरतुदी, मतमोजणीच्या वेळी घ्यावयाची दक्षता तसेच निवडणूक आयोगाचे नियम व कार्यपद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

आनंदकर यांनी शिक्षक व पदवीधर मतदारसंघासाठी येत्या २६ ऑक्टोबर रोजी बालेवाडी येथे प्रत्यक्ष प्रशिक्षण होणार आहे. यामध्ये मतपेट्या उघडणे, ५० मतपत्रिकांचे गठ्ठे तयार करणे आणि मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया यांचे प्रात्यक्षिक देण्यात येणार आहे.

मतमोजणी निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मतमोजणी प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यांबाबत त्यांनी माहिती दिली. मत मोजणी प्रक्रियेत सहभागी अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचीही पलांडे व आनंदकर यांनी उत्तरे दिली.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**श्रीसुक्त पठण...**

सोलापूर : नवरात्रोत्सवनिमित्त डफरीन चौक येथील मयुरा तारे यांच्या निवासस्थानी शुक्रवारी कुंकुमार्चन, श्रीसुक्त पठण करण्यात आले. यावेळी राजश्री तारे, वसुंधरा सांगलीकर, मंदाकिनी बुलबुले, लता इनामदार, शुभदा गोडबोले, प्रिया भिडे, अनुराधा कुलकर्णी, निर्मला कुसेकर, गौरी आमडेकर, भावना डिंगरे, अनुजा कुलकर्णी, कल्पना आवारे, रश्मी देशमुख आदी.



## महत्त्वाचे...



अकलूज : आज आश्विन शुद्ध षष्ठी अकलूज ग्रामदैवत श्री अकलाई देवीची गरुडवाहिनी स्वरूपात अलंकार महापूजा.



गौडगाव : एकता महिला मंच' आयोजित भव्य नवरात्र महोत्सवाअंतर्गत 'नवरंग' या उपक्रमात गौडगाव येथील एकता महिला मंचाच्या प्रमुख पदाधिकारी कविता दसवंत, वसुधा कुंभार, संगीता काजळे, सविता काजळे, सुखनंदा सुरवसे, वैष्णवी सुरवसे, सविता दसवंत, अंकिता काजळे, प्रज्ञा दसवंत, कोमल काजळे आदी.



शेळगाव (आर ) : येथील उपक्रमात प्रमुख पदाधिकारी वैशाली साळुंके, रंजना गवळी, सोनाली गायकवाड, मनिषा गवळी, राणी गवळी, गीतांजली जोशी, आशा विभुते, आशा मोटे, सुरेखा सपाटे, राजश्री बादगुडे, पंचशीला बनसोडे, सारिका जाधव आदी.



झरेगाव : येथील उपक्रमात प्रमुख पदाधिकारी लक्ष्मी संकपाळ, अश्विनी कपडे, राणी संकपाळ, छाया पोटभरे, जयश्री संकपाळ, स्मिता संकपाळ, निलावती संकपाळ, सरस्वती संकपाळ, सुलभा संकपाळ, सूदेशना संकपाळ, सुलभा संकपाळ, मंगल पोटभरे, शितल संकपाळ आदी.



मानेगाव : येथील उपक्रमात प्रमुख पदाधिकारी अमृता वाघमारे, स्वाती वाघमारे, उषा भांगे, लक्ष्मी मोरे, मंगल डाके, अनिता डाके, लोचना डाके, इंदुमती डाके आदी.



झाडी : येथील उपक्रमात प्रमुख पदाधिकारी कोमल वाघमारे, पल्लवी जगदाळे, पुनम माने, संध्या सरवदे, आशा चव्हाण, अंजना सांगुळे, सिंधु मते आदी.



सोलापूर : सामाजिक न्याय भवन महिला कर्मचारी.

# अक्कलकोटमध्ये घरकुलाची केवळ २९ टक्के कामे पुर्ण

## रखडलेल्या कामांना गती देण्याचे सी.ई.ओं.चे निर्देश

### ग्रामपंचायतींना कंबर कसण्याची सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑक्टोबर -**

अक्कलकोट पंचायत समिती येथे आढावा बैठक पार पडली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी तालुक्यात घरकुलाच्या ११ हजार ८६ मंजूर घरकुलांपैकी आतापर्यंत ३ हजार २३५ घरेच पूर्ण झाल्याचा (२९.०३ टक्के) उल्लेख करत अपुर्ण कामे तातडीने पुर्ण करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सक्त निर्देश दिले.

बैठकीत त्यांनी विविध विभागांच्या कामकाजांचाही आढावा घेतला. ग्रामीण विकासाच्या योजनांना केवळ प्रशासकीय मंजुरीपुरते मर्यादित न ठेवता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करा. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २.० आणि घरकुल योजनांमधील प्रलंबित कामांना गती देऊन पात्र लाभार्थ्यांना दिलासा द्या, असे स्पष्ट निर्देश दिले. ग्रामपंचायत स्तरावरील अंमलबजावणीवर भर दिला.

प्रधानमंत्री आवास योजना टप्पा-२ अंतर्गत अक्कलकोट तालुक्यातील घरकुलांच्या प्रगतीचा आढावा घेताना मंजुरी, अनुदान वितरण आणि प्रत्यक्ष बांधकाम यांमधील स्थिती समोर आली. एकूण ११ हजार १४२ घरांचे उद्दिष्ट असताना ११ हजार ८६ घरांना मंजुरी दिली आहे. मंजुरी मिळाल्यानंतरही बांधकाम सुरू न झालेल्या घरकुलांचा प्रश्न मार्गी लावण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे. अनुदान वितरणाबरोबरच प्रत्यक्ष बांधकामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे, कामातील अडथळे दूर करणे आणि प्रलंबित प्रकरणांचा वेळेत निपटारा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



**अनुदानाचे हप्ते वितरित; बांधकाम पूर्णत्वावर भर**

घरकुल योजनेअंतर्गत १० हजार ७३१ लाभार्थ्यांना पहिला हप्ता, ६ हजार ६७९ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, ४ हजार ७९१ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता, तर १ हजार ४३७ लाभार्थ्यांना चौथा हप्ता वितरित केला आहे. घरांची संख्या वाढविण्यासाठी बांधकाम सुरू न केलेल्या लाभार्थ्यांशी संपर्क साधावा, अडचणींचे निराकरण करावे आणि बांधकामाची नियमित पाहणी करावी, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी जैन यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना दिल्या.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २.० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अक्कलकोट पंचायत समिती येथे उभारलेल्या नियंत्रण कक्षाचे उद्घाटन जैन यांच्या हस्ते झाले.

बैठकीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) सूर्यकांत भुजबळ यांनी ग्राम पंचायत अधिकाऱ्यांना अभियानाची उद्दिष्टे, ग्रामपंचायत स्तरावरील जबाबदाऱ्या आणि आवश्यक कार्यवाही याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्येक ग्रामपंचायतीने अभियानातील कामांचे नियोजन करून नियमित आढावा घ्यावा आणि निर्धारित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी समन्वयाने कार्यवाही करावी, असे आवाहन केले.

बैठकीस जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, गटविकास अधिकारी शंकर कवितके, सहाय्यक गटविकास अधिकारी अमोल मुंडे, गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे, पाणीपुरवठा विभागाचे अभियंता विद्याधर राठोड, पशुसंवर्धन अधिकारी दीपक कडवे, बांधकाम विभागाचे उपअभियंता विशाल लेंगरे, जलसंधारण विभागाचे अधिकारी, विविध विभागांचे विस्तार अधिकारी आणि ग्राम पंचायत अधिकारी उपस्थित होते.

### रेल्वेच्या धडकेत तरुणी ठार

**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर -**

रेल्वेच्या धडकेत तरुणी जागीच ठार झाल्याची घटना बोरोटी रेल्वे स्टेशनजवळ आज शुक्रवारी दुपारी दोन वाजता उघडकीस आली. हुवक्का हिरकुर (वय २८, रा. उडगी, ता. अक्कलकोट) असे तरुणीचे नाव आहे. ती आज शुक्रवारी बोरोटी रेल्वे स्टेशनजवळ रेल्वेच्या धडकेत मार लागून मृत आढळून आली. हवलदार एन. एस. राठोड यांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला.

# श्रीपूरमध्ये शेतकरी संघटनेचे रास्ता रोको आंदोलन

### ऊसाला पाच हजार रुपये प्रतिटन, साखरेची एमएसपी ५० रुपये किलो देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १६ ऑक्टोबर -**

श्रीपूर येथील छत्रपती चौकात शेतकरी संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी संघटनेचे नेते राहूल बिडवे यांनी ऊसाला ५ हजार रुपये प्रतिटन, साखरेची एमएसपी ५० रुपये किलो मिळेपर्यंत आंदोलन चालूच ठेवण्याचा निर्धार बोलून दाखवला.



याप्रसंगी रयत क्रांती संघटनेचे दीपक भोसले, समाधान फाटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे उदयसिंह माने देशमुख, बाळासाहेब धाईंज, विरेंद्र पाटील, मदनसिंह जाधव, कमलाकर माने -देशमुख, रिपाइंचे प्रा. नरेंद्र भोसले, भाजप ओबीसी नेते सतिश कुलाळ, गोपाळ धार्गे-देशमुख, मराठा आरक्षण समितीचे सयाजी गायकवाड, स्वाभिमानीचे दत्ता भोसले, शिवम काशीद, भिम भुसनर, सुरज पाटील, विशाल साठे, दिनेश लोखंडे, अविनाश साठे आदी उपस्थित होते.

**शेतकऱ्याचे मरण हे सरकारचे धोरण**

सद्यस्थितीत शेतकरी अडचणीत आहे. अशा परिस्थितीत तामिळनाडूचे मुख्यमंत्री थलपती हे ऊसाला ७०० रुपये अनुदान देतात. मात्र शेतकऱ्यांचे कैवारी म्हणणारे आपले सरकार दुर्लक्ष करते हे विदारक चित्र आहे. **- समाधान फाटे, शेतकरी नेते.**

आज ऊस उत्पादक दुष्काळ, खतांच्या वाढत्या किमतीने त्रस्त आहे. दुसरीकडे कारखान्यांकडून बँकेचे हप्ते, टॅक्स व राजकारणासाठी वापरून उरलेल्या पैशातून शेतकऱ्यांना भाव देत आहे. असे काम करू देणार नाही, असा इशाराही बिडवे यांनी दिला. समाधान फाटे, दिपक भोसले यांनी कारखाने काटामार करतात असा आरोप केला. आंदोलनानंतर पोलिसांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन पोलिस उपनिरिक्षक विक्रम साळुंखे, करिष्मा वनवे यांनी स्वीकारले. पोलिस निरिक्षक नीरज उबाळे यांनी बंदोबस्त ठेवला.

# रुक्मिणी मातेस पारंपारिक कमलादेवी पोषाखासह अलंकार

## नवरात्र सहावी माळ; अलंकारांनी सजले श्री विठ्ठलाचेही रुप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१६ ऑक्टोबर -**

नवरात्र महोत्सवात सहाव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान केले आहेत. रूक्मिणी मातेस कमलादेवी पोषाख परिधान केला असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेठ जोड, हिऱ्याचे कंगनजोड, बालाजी नाम, मोत्याची कंटी एक पदरी, मोत्याची कंठी दोन पदरी, मोत्याचा तुरा, मारवाडी पेट्याचा मोत्याचा हार, मस्त्य जोड, तोडेजोड, तुळशीची माळ तीन पदरी, तुळशीची माळ एक पदरी, शिरपेच मोठा, शिरपेच मोठा दहा लोक असलेला इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान केले आहेत.

रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, जडावाचा हार, खड्यांची वेणी, चिंचपेटी हिरवी, तन्मणी मोठा, सरी लहान, सूर्य मोत्याचा कंठा, बाजीराव गरसोळी, पेठयांची बिंदी, मन्यामोत्याच्या पाटल्या जोड, मोत्याचे मंगळसूत्र, सोन्याचे बाजूबंद, मस्त्य जोड, रूळ जोड, पंजन जोड, मोठी नथ, कर्णफुले जोड, तारामंडळ, सोन्या मोत्याचे ताणवाड जोड इत्यादी अलंकार परिधान केले आहेत.



मंदिरातील राधिका मातेस नक्षी टोप, पुतळ्यांची माळ, मोहरांची माळ, जवेची माळ, चिंचपेटी तांबडी, ठुशी व सत्यभामा देवीला सिद्धेश्वर टोप, जवेची माळ, जवमणी पदक, हायकोल, पुतळ्यांची माळ इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान केले आहेत. मंदिरातील श्री व्यंकटेशास चांदीचा मुकुट, लॉकेट, गोफ मोठा, अष्टपैलू मोत्याची तीन पदरी, तांदळा हार सात पदरी, मोहरांची माळ, पैंजण रोड, मोठी बोरमाळ तीन पदरी, साखळ्या जोड, लक्ष्मी हार इत्यादी अलंकार परिधान केले आहे.

**महालक्ष्मी मातेसह विविध अलंकार; देखणे रुप**

महालक्ष्मी मातेस सोन्याचे गंठण, मोत्याची कंटी एक पदरी, इमिटेशन नेकलेस, दंडपेट्या जोड, चंद्रहार १५ पदरी, एकदाणी, जवेची माळ दोन पदरी, तोरडी जोड, राणीहार, लॉकेट, चांदीचे छत्री इत्यादी अलंकार परिधान केले आहे.

मंदिर समितीच्या अखत्यारीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख केल्याचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगितले.



जुळे सोलापूर येथील श्री स्वामी समर्थ महिला भजनी मंडळ.



विभागीय कृषी संशोधन केंद्र सोलापूर येथील सुरेखा मलाबदे, अश्विनी बोंदर, आम्रपाली भगत, संगीता लोहार, कमल वानोळे, सोनाली चव्हाण आणि सावित्री बिराजदार.

# पंढरपुरात आज रंगतरंग दांडिया नाईट

## बिग बॉस फेम जान्हवी किल्लेकर यांच्या हस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१६ ऑक्टोबर -**

नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर पंढरपूर शहरात यंदा प्रथमच भव्य ना भुतो ना भविष्यति अशा रंगतरंग दांडिया नाईट स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धेच्या उद्घाटनासाठी बिग बॉस फेम अभिनेत्री जान्हवी किल्लेकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

सदर स्पर्धा पंढरपूर तालुक्यातील रसिकांसाठी आतापर्यंत झाली नाही अशी होणार आहे. प्रशस्त ग्राऊंड, पार्किंगची सोय आहे. स्पर्धा फक्त महिला, मुली व कपलसाठीच असणार आहे. काटेकोर नियम पाळूनच स्पर्धेची सुरूवात होणार आहे. कार्यक्रमाचे नियोजन अपर्णा व श्रीकांत बागल, नेहा व शिवम पाटील, भाग्यश्री व आदर्श आकुनुरी हे करणार आहेत. महोत्सवाचे उद्घाटन दि. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते ११ वाजता, डीव्हीपी स्क्वेअर, सरगम चौक, पंढरपूर येथे होणार आहे.

कार्यक्रमासाठी यश गोल्ड हे स्पॉन्सर आहेत. पंढरपुरातील प्रसिध्द व्यापारी परंपरा, शुध्द सोन्याचे व्यापारी असा त्यांचा नावलौकिक आहे. त्यास संलग्न असे ग्रीन सह्याद्री, आर.व्ही. पॅलेस, हृदयस्पंदन हॉस्पिटल, एस.के.फुडस, आरंभ रेसिडेन्सी, पुजारा मोबाईल, डॉ. अमरजित गोडसे, चाईल्ड हुड ब्रदर्स, वरद अर्बन, कदम आयु.चिकित्सालय अशा नामवंत व्यावसायिकांनी यासाठी सहकार्य केले आहे.

कार्यक्रमात बक्षिसांची बरसात होणार आहे. स्टार ऑफ नाईट स्कुटी, सोलो टी.व्ही, कुलर, ड्रायर तर कपलसाठी गिफ्ट व्हाऊचर, मिक्सर हीटर व ग्रुपसाठी साउंड बॉक्स, ट्रॉली बॅग, होम थिएटर राहणार आहेत. लहान मुलांसाठी सायकल, स्केटींग, क्लॉथ व्हाऊचर, कलर बॉक्स, स्टडी टेबल राहणार आहेत. बेस्ट ड्रेससाठी व्हाऊचर, पर्स, ड्रायर इ.राहणार आहेत. रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून आपली तिकीटे बुक करावीत असे आयोजकांसह रंगतरंग मंडळाच्या वतीने सुचवले आहे.

पारंपरिक लोककलेला आधुनिकतेची जोड देत हा कार्यक्रम आयोजित केला आहे. आकर्षक विद्युत रोषणाई, साऊंड सिस्टीम आणि सुरक्षिततेची विशेष व्यवस्था केली आहे. स्पर्धेत आकर्षक बक्षिसे आणि सन्मानचिन्हे देण्यात येणार आहेत. इच्छुक स्पर्धकांनी ७३८७५३८१०३, ९६९५५७०९०९, ९५५२४९२०३४ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, असे सांगितले आहे.